# आधी होता बुकर मग झाला काळीर

लेखक : परशुराम रामचंद्र गोखले.

## मनोगत

चरित्र लेखनाचा उद्देश काय असावा हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. माझे मत आहे की लोकोत्तर पुरुषांचे चांगले विचार, चांगली कृत्ये आणि चांगले कार्य लोकांसमोर माडणे हाच फक्त चरित्र लेखनाचा उद्देश असावा. यामुळे लोकांना चांगले काम करण्याची प्रेरणा मिळाली पाहिजे. पण साधारणपणे असे दिसून येते की स्वतःची विद्वत्ता दाखवण्याकरीता चरित्र लेखक चरित्रनायकाचे गुणदोष , दोषच जास्त , दाखवतात.त्याच प्रमाणे एखाद्या महान पुरुषाचे चरित्र प्रसिद्ध झाले की त्या चरित्रनायकाचे दोष हुडकून काढण्याची साहित्यकांमध्ये अहमअहमिका लागते. भगवान श्रीकृष्णापासून ते लोकमान्य टिळक,स्वातंत्र्यवीर सावरकर,महात्मा गांधी,विनोबा भावे, डॉ. राधाकृष्णनन्, डॉ. राजेद्रप्रसाद, चर्चिल हे देखील अशा प्रकाराच्या टीकेतून सुटले नाहीत. वेद अपौरुषेय आहेत की मानवरचीत आहेत हा वाद आहेच पण वेद कसे विकृतीयुक्त आहेत , भगवत् गीता कशी दोषयुक्त आहे हे दाखवण्यातच काही विद्वान आपली विद्वत्ता खर्च करीत असतात. नीरक्षीर विवेक सामान्य माणसात कमी प्रमाणातच असतो आणि छापील मजकुर अगदी खरा असतो ही भावना मनात पक्की असते म्हणून त्यांची मनस्थिती द्विधा होते. काहीजण तर सुपारीचे बोकाणे भरतांना लोकमान्यांचे उदाहरण देऊन स्वतःच्या कृतीचे समर्थन करीत असतात.

बुकरची प्रसिद्ध झालेली चरित्रे  याला अपवाद नाहीत. प्रथम बुकर ने ‘माय लाईफ अॅन्ड वर्क’ हे आत्मचरित्र १९०० साली लिहिले. त्यानंतर १९०१ मध्ये त्याचे ’’अप फ्रॉम स्लेव्हरी’’ हे दुसरे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. या दोनीही आत्मचरित्रांची लुईस हारलान याने दोन खंडात समिक्षा करून चांगले वाभाडे काढले. एवढेच नव्हे तर रेमंड स्मॅक याचे सहकार्याने ‘ दी बुकर टी. वाशिंग्टन पेपर्स ’ या नांवाने १३ खंड प्रसिद्ध करून बुकर कसा स्वार्थी होता, गोऱ्यांचे लांगुलचालन करून स्वतःचे महत्व कसे वाढवले, पडद्याआडून अपल्या प्रतिस्पर्ध्यांचा कसा घात केला याचे अगदी विस्तारपूर्वक वर्णन केले. या  अगाध कर्तुत्वाबद्दल त्याला बुकर पदक पण मिळाले.

मी स्वत: अशा प्रकारच्या चरित्रलेखनाचे विरुद्ध आहे. अशा प्रकारच्या चरित्र लेखनामुळे वाचकांचे मनावर विपरीत परीणाम होतो. चरित्र लेखनाचा एकमेव उद्देश सामान्य लोकांपुढे थोरांचे चांगले विचार, चांगली कृत्ये यावीत हाच असला पाहिजे . श्रीकृष्णापासून ते लोकमान्यांपर्यंत पाहिले तर काकदृष्टीच्या लेखकाला दोष जरूर सापडतील . चांगल्या चरित्रलेखकाने नीरक्षीर विवेक वापरून केवळ चांगले तेच लोकांसमोर मांडले पाहिजे.

बुकरच्या चरित्राचा सखोल अभ्यास करून, त्याच्या कार्यस्थळाला भेट देऊन, त्याचे विषयी प्रसिद्ध झालेली पुस्तके वाचून आणि लोकांना त्याचे चरित्रपासून काही शिकता येईल हे उद्दिष्ट समोर ठेऊन मी हे चरित्र लीहले आहे.

अमेरिकेच्या दक्षिणेकडे व्हर्जीनिया नांवाचा एक प्रांत आहे. त्या प्रांतात फ्रँकलीन नांवाचे एक लहानसे खेडे आहे. येथे पूर्वी गोऱ्या कापूस मळेवाल्यांच्या गुलामांची वस्ती होती. अशाच एका गुलामाचे घरात बुकरचा जन्म १८५९ साली झाला. गुलामीत जन्म घेतलेला हा बुकर पुढे स्वतःच्या कर्तुत्वाने, परिश्रमाने निग्रोंचा एक उद्धारकर्ता होईल हे कोणाला स्वप्नात पण वाटले नसेल. हे कसे झाले, त्याकरीता बुकरने काय काय प्रयत्न केले, कोणकोणत्या हालअपेष्टा भोगल्या याची कथा म्हणजे बुकरचे चरित्र आहे.

आज एक पूर्वाश्रमीचा निग्रो अमेरिकेचा अध्यक्ष झाला आहे. पण निग्रोंची ही उन्नती होण्याकरीता बुकरने जे प्रयत्न केले, जे अमाप हालाखीचे दिवस काढले याची पुसटसुद्धा कल्पना अमेरिकेतील निग्रोंना नाही आणि आमच्या पैकी बऱ्याच जणांना बुकर कोण होता हे पण माहीत नाही. ज्याच्या ज्यांच्याशी मी बुकरचा विषय काढला त्या सर्वांना बुकर म्हणजे ज्याचे नांवाने साहित्यातील बुकर परितोषक दिले जाते तो बुकरच माहीत होता. किंवा बुकर टी. वाशिंग्टन म्हंटले की कुऱ्हाड घेऊन झाडे तोडणारा अमेरिकेचा अध्यक्षच आठवतो. त्यामुळे बुकरचे असामान्य कर्तुत्व सर्वांना माहित व्हावे हे मला प्रकर्षाने जाणवले.

योगायोगाने मला २००० साली अमेरिकेत बुकरच्या कार्यस्थळाला भेट देण्याचा योग आला. बुकर ज्या अलबामा प्रांतात लहानाचा मोठा झाला, जेथे त्याला निग्रोंचे उन्नतीकरीता काम करण्याचे

प्रोत्साहन मिळाले त्या मॅसाचुटेस, व्हर्जीनिया वगैरे प्रांतात दोन महीने भटकता आले. बुकर सबंधीच नव्हे तर एकूण निग्रो समाजाविषयी माहिती करून घेता आली आणि त्यांनी केलेल्या प्रगतीची वाटचाल पाहता आली. त्या सर्वांचे फलित म्हणजे हे बुकरचे चरित्र आहे.


परशुराम रामचंद्र गोखले.

स्पॅन,१९०एन् -१

बी सेक्टर सेडको,

औरंगाबाद ४३१००३

फोन ०२४०-२४८६९३१ .


०१ मार्च २००९

# प्रकरण पहिले

अमेरिकेत दक्षिणेकडे व्हर्जीनिया नांवाचा एक प्रांत आहे. या प्रांतामधे जेम्सटाऊन नांवाचे एक शहर आहे. या शहराच्या सागर किनाऱ्याला १६१९ च्या जून-जुलैच्या सुमारास एक डच जहाज येऊन लागले. या जहाजावर आता डचांना नको असलेले २० निग्रो गुलाम विक्रीकरीता उपलब्ध होते.  यावेळी व्हर्जिनिया प्रांतात इंग्रजांची नवीनच वसाहत सुरु झाली होती. या इंग्रजांचा कापुस पिकवणे हाच मोठा धंदा होता . या कापसाचे शेतावर काम करण्याकरीता मजुरांची खूप गरज होती. नेमके याच वेळी डचांचे जहाजावर निग्रो गुलाम अगदी स्वस्तात मिळत होते. इंग्रजांनी हे सर्व २० गुलाम ताबडतोब खरेदी केले. ही अमेरिकेतील गुलामगिरीची सुरवात होती. इंग्रज वसाहतदारांची गुलांमाची मागणी दिवसेंदिवस वाढत होती. आफ्रिकेतून  निग्रोंना पकडून गुलाम म्हणून विकण्याचा धंदा जोरात सुरु झाला. आता जहाजे भरभरून निग्रो गुलाम अमेरिकेत येऊ लागले. थोड्याच दिवसात निग्रो गुलाम विकत घेण्याचा आणि विकण्याचा धंदा  फक्त व्हर्जिनीया प्रांतापुरता मर्यादित न राहता सर्व दक्षिण भागात पसरला.

शेतावर काम करणाऱ्या निग्रो गुलामांना राहण्याकरीता इंग्रज मालकांनी शेताजवळच काही झोपड्या बांधल्या होत्या. या झोपड्या  नांवापुरत्याच झोपड्या होत्या आणि त्यात कोणत्याही प्रकारच्या सोई नव्हत्या. थंडीत या झोपड्यात भयंकर गारठा असे तर उन्हाळ्यात अंगातून घामाच्या धारा लागत. पावसाळ्यात सर्व झोपडीत पाणी जमत असे.व्हर्जीनिया प्रांतातील फ्रँकलीन शहरातील शेत मळ्यावरील अशाच एक झोपडीत १८५९ साली बुकरचा जन्म झाला. बुकर म्हणतो, ‘ हे देखील मी अंदाजानेच सांगतो पण माझा जन्म मात्र नक्की झाला हं .’ निग्रो कुटुंबातील अनेक निग्रो मुलांप्रामाणे बुकरला आपले वडील कोण  हे माहित नव्हते. असाच कोणीतरी एखादा इंग्रज मळेवाला असावा. गुलामांची आणि विशेषतः गुलाम स्त्रियांची काय परिस्थिती होती पहा. गुलाम म्हंटला की त्याला एखाद्या जनावरापेक्षाही वाईट तऱ्हेची वागणूक मिळत असे.

या झोपडीत बुकर, त्याचा मोठा भाऊ जॉन, बहीण अल्मडा आणि आई येवढे रहात असत. बुकरला सावत्र वडील होते.त्यांनी काहीतरी करून फ्रँकलीनहून सुटका करून घेऊन पश्चिम व्हर्जिनीया प्रांतात माल्डेन येथे मिठाच्या खाणीवर नोकरी मिळवली होती.  ते कधीकधी येऊन जाऊन असत. बुकर चांगला धष्टपुष्ट होता. सतत कोणालातरी बुकलाबुकली करीत असे म्हणून सर्व त्याला बुकर म्हणु लागले. नांव ठेवणे, बाप्तीस्मा करणे असा काही प्रकार नव्हताच. मालक मनाला येईल त्या नांवाने हाक मारीत असे आणि तेच नांव रुढ होत असे. पुनः अडनाव, वडीलांचे नांव वगैरे काही प्रकार नव्हता. सर्व जॉन, अल्मेडा,जेम्स असेच. आणि समजा एकाच नांवाचे दोन जेम्स असले तर मळेवाल्याच्या नांवावरून त्याला मर्फीचा जेम्स नाहीतर थॉमसचा जेम्स असे ओळखले जायचे.

बुकरच्या आईकडे मळ्यावरील सर्व गोऱ्या आणि काळ्या निग्रोंचा स्वयंपाक करण्याचे काम होते.आई स्वयंपाक झोपडीतच करीत असे. झोपडी कशी होती ते तुम्हाला सांगीतलेच आहे. झोपडीत सतत धूर भरलेला असे. उन्हाळ्यात झोपडीतील शेगड्यांमुळे अंग अगदी भाजून निघत असे तर हिवाळ्यात शेगडी असून देखील गारठून जात असे. झोपडीला एक दार पण होते आणि मांजरीला जाण्या येण्याकरीता एक लहानसा दरवाजा पण होता. तशी त्याची काहीच गरज नव्हती . झोपडीला इतक्या फटी होत्या की मांजर कशीही आतबाहेर करु शकत होती. झोपडीची जमीन नुसती खाच खळग्याची होती. अशाच एका मोठ्या खळग्यात आई रताळी वगैरे साठवून ठेवीत असे. बुकर तसा काही साधासुधा नव्हताच तो जमेल तेंव्हा एखादे रताळे लंपास करीत असे. अशाच जमीनीवर कापडाच्या चिंधोट्या पसरून सर्वजण झोपत असत. जेवण्याकरीता ताट,वाटी असला काही प्रकार नव्हताच .पत्र्याच्या तुकड्यावर किंवा हातात घेऊनच जेवण असे. कधी कधी बुकरची आई मळ्यावरून एखादी कोंबडी चोरून आणत असे तेव्हाच या कुटुंबाला काही चांगले खावयाला मिळत असे नाहीतर एरवी भाकरीचा तुकडा आणि कसल्यातरी पाल्याची भाजी यावरच गुजराण करावी लागत असे.

बुकर आणि त्याच्या भावाला घालावयाला जाडे भरडे कपडे असत. इंग्रज मळेवाल्यांना कमीतकमी खर्चात गुलामांना सांभाळावयाचे असे. मग खाणे, राहणे आणि कपडे तसेच असणार. शर्ट आणि चड्डी करीता एकच चांगले जाडजुड कापड असे आणि ते पण खूप दिवस टीकेल असेच असे. अशा कापडाचा शर्ट घातला की बुकरची मान  चोळवटून निघत असे. यावर उपाय म्हणून बुकरचा मोठा भाऊ जॉन तो शर्ट काही दिवस वापरत असे आणि मग जरा नरम पडला की बुकरला वापरावयाला देत असे

आई दिवसभर कामात गुंतलेली असे. मुलांकडे लक्ष द्यावयाला तिला मुळीच वेळ नसे. वयाने लहान असली तर या मुलांना सतत काहीतरी काम करत राहावेच लागे. बुकर कडे धान्य दळून आणण्याचे काम असे. एका गाढवाचे पाठीवर धान्याचे पोते लादून लांबच्या चक्कीवरून ते दळून आणायचे असे. रस्ता बराच लांब होता आणि तोपण जंगलातून  जात होता. बुकर तसा वस्ताद होता. तो काय करावयाचा गाढवाच्या पाठीवर धान्याचे पोते लादले की स्वतः पण गाढवावर स्वार होत असे. कधी सर्व प्रवास सुरळीत पार पडावयाचा पण जर कधी गाढवाच्या चालण्याने, बुकरच्या हालचालीने किंवा रस्त्यावरील खाचखळग्याने धान्याचे पोते बुकरसकट खाली पडले की बुकरला देव आठवायचा. कारण त्याला धान्याचे पोते पुनः चढवणे शक्य नसे .  कोणीतरी येऊन मदत करीपर्यंत खूप ऊशीर होत असे. अंधार पड्डु लागला की बुकर अगदी घाबरून जात असे त्यात पुनः ऊशीर केल्यावद्दल शिक्षा ही  होणारच.असे होते बुकरचे लहानपण. बिचारा सतत धास्तावलेला असे. खावयाला पुरेसे नाही, घालावयाला चांगले कपडे नाहीत, वयापेक्षा जास्त काम आणि ते पण जरा चुकले की शिक्षा. बुकरला मोठेपणी कुणीतरी विचारले,‘ काय हो ! तुम्ही तुमचा लहानपणचा वेळ कसा घालवत होता ?’ तेंव्हाच प्रथम बुकरला समजले की वेळ हा घालवावा लागतो, मुलांना खेळावयाला वेळ असतो, त्यांना काही छंद असतात. बुकरला तर सतत काम, काम आणि कामच किंवा कुठे काही खाण्याकरता मिळते का हे शोधणे कारण पोटात भूक सतत लागलेलीच असे.

थोडा मोठा झाल्यावर बुकरला मालकाचे बंगल्यावर कामा करीता जावे लागले. मालकाची मुले शाळेत जात असत. बुकर त्यांचे दप्तर घेऊन जात असे. बुकरला स्वतः शाळा काही नव्हती. पण या निमित्ताने त्याचा शाळेशी सबंध येत होता. त्याला पण मालकाच्या मुलांप्रमाणे चांगले कपडे घालून शाळेत जावे असे वाटत होते . पण तो होता एक गुलाम.गुलामाने शिक्षण घ्यावे हे कोणाच्या स्वप्नात सुद्धा येत नसे. शाळेतून परत आली की मालकाची मुले जेवायला बसत असत त्यावेळी माशा वारण्याचे काम बुकर कडे असे. जेवणातील नाना प्रकारचे पदार्थ पाहून बुकरच्या तोंडाला अगदी पाणी सुटत असे. एकदा मालकाची मुले जिंजर ब्रेड खात होती. बुकरच्या डोक्यातून जिंजर ब्रेड काही केल्या जाईना. आईने खूप समजाऊन सांगीतले. एक दोन रट्टे पण मिळाले. बुकरने तेंव्हाच निश्चय केला की मोठा झालो की खूप जिंजर ब्रेड आणायची आणि सर्वांनी अगदी पोटभर खायची.

बुकरला मालकाच्या मुलांबरोबर खेळण्याची परवानगी होती. पण त्याचे खेळणे म्हणजे धाऊन धाऊन बॉल आणणे आणि मुलांचे खेळाचे सामान संभाळणे. पुनः बॉल जरा इकडे तिकडे गेला की मुलांच्या थपडा मिळाल्याच. असे दिवस जात होते. दिवसभर अशी कामे करून आणि मार खाऊन थकला भागला बुकर घरी आला की गाढ झोपी जात असे. एक दिवस त्याला अचानक जाग आली. पाहतो तो काय त्याची आई येशुच्या तसबीरीपुढे बसून प्रार्थना करीत होती, ‘ प्रभु! अब्राहम लिंकनला यश मिळू दे. त्याला सर्व मदत कर.’ बुकरला काही कळेना की आई अशी काय प्रार्थना करते आहे. बुकर म्हणाला, ‘ आई तू अशी काय प्रार्थना करते आहेस ? हा अब्राहम लिंकन कोण ? त्याला मदत करावयाला तू प्रभुला का सांगते आहेस ? ’ आई म्हणाली , ‘ बाळा ! उत्तरेकडे अब्राहम लिंकन नांवाचा एक थोर पुरुष आहे. तो आमची गुलामगिरीतून सुटका करण्याकरीता दक्षिणेतील लोकांशी लढत आहे. त्यांचे मोठे युद्ध सुरु आहे. लिंकन जर जिंकला तर आपण सर्व गुलामगिरीतून मोकळे होऊ. मग तुम्ही सर्व स्वतंत्र आणि माणूस म्हणून जगु शकाल म्हणून मी लिंकनच्या विजयासाठी प्रार्थना करत असते.’ बुकरला फारसे काही समजले नाही. पण त्याला एवढे मात्र कळले की लिंकन जे काही करतो आहे ते आपल्या भल्यासाठीच आहे मग तो देखील लिंकनच्या विजयासाठी प्रार्थना

करु लागला.  लिंकन काळा आहे की गोरा, तो कसा दिसतो हे बुकरला काही माहित नव्हते. तो चांगले काम करतो आहे ना ! मग झाले.

दक्षिणेतील गोरे  काळ्यांशी काही फार वाईट वागत नव्हते. दक्षिणेकडील गोऱ्या लोकांची राज्ये जरी गुलामगिरीच्या प्रथेच्या बाजूने असली तरी गोरे आणि काळे यांत फारसे वितुष्ट नव्हते. मळ्यांच्या मालकांची मुले दक्षिणेकडील राज्यांच्या बाजूने लढत होती. काही मुले जखमी होऊन परत आली तेंव्हा गोऱ्यांचे बरोबरीने काळे गुलाम पण त्यांची देखभाल करीत असत. गोरे मालक जेंव्हा लढाईवर गेले तेंव्हा काळ्या निग्रो गुलामांनीच त्यांच्या  घरांचे रक्षण केले. बऱ्याच गोऱ्या मालकांच्या कुटुंबांचे रक्षण करताना काळ्या गुलामांनी आपले प्राण पण गमावले होते. मालकाच्या गैरहजेरीत एखाद्या काळ्या गुलामाला जर घराच्या आणि कुटुंबाच्या रक्षणाकरीता घरात थांबायला सांगीतले तर तो गुलाम आपला मोठा बहुमान समजत असे. मालकांचा हा त्याचेवरील विश्वास काळ्या गुलामांनी पण अगदी खरा ठरविला. गोऱ्या मालकांना खात्री होती की कुणी जर कुटुंबातील बायकापोरांना इजा करण्याच  प्रयत्न केला तर त्यांना काळ्या निग्रोचे प्रेतच तुडवून जावे लागेल. बुकरच्या शेतमालकाचा मोठा मुलगा बिली जेंव्हा जखमी होऊन लढाईवरून परत आला तेंव्हा घरच्या लोकांबरोबरच काळ्या गुलामांनी पण त्याची अगदी मनापासून देखभाल केली. त्याचे प्रयत्नांना यश काही आले नाही आणि बिली गेला तेव्हा काळे गुलाम देखील मालकाच्या दु:खात मनापासून सहभागी झाले. निग्रोंचा मनाचा सच्चेपणा कसा होता याची बुकरला पुढे एकदा प्रचिती आली. एका निग्रो गुलामाचा आणि त्याचे मालकाचा करार झाला होता की गुलामाने मालकाला काही ठराविक रक्कम हप्त्याहप्त्याने द्यायची. रक्कम पूर्ण झाली की मालकाने गुलमाला गुलामगिरीतून मुक्त करायचे. मालकाने गुलामाला जादा पैसे मिळवण्या करीता फावल्या वेळात इतरत्र काम करायची परवानगी दिली होती. गुलामाने काही हप्ते फेडले. तेव्हढ्यात गुलामगिरी संपली.आता त्या गुलामाला मालकाचे उरलेले पैसे देण्याची काही गरज नव्हती . पण नाही. करार ठरला होता ना ! म्हणून  त्या गुलामाने मुक्त झाल्यानंतर देखील मालकाचे पूर्ण हप्ते चुकते केले.

उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील राज्ये यांच्यात तुंबळ युद्ध सुरु होते पण शेतमळ्यावर मात्र नेहमीचेच जीवन सुरु होते. यशापयाशाच्या काही बातम्या कानावर पडत असत आणि सर्व निग्रो अगदी मन लाऊन या बातम्या ऐकत असत. थोड्या दिवसांनी दक्षिणेकडील राज्ये हरु लागली आणि त्यांची पिच्छेहाट सुरु झाली . परत येणारे दक्षिणेकडील सैनिक तुरळक दिसु लागले आणि ते उत्तरेच्या विजयाच्या बातम्यांना पुष्टी देत . हे पळपुटे सैनिक म्हणजे गावातील लोकांना एक त्रासच झाला होता. हे सैनिक पळता पळता जमेल तेव्हढी लुटालुट करीत होते. शेवटी गोऱ्या शेतमालकांनी आपले सोने नाणे, जडजवाहीर रानात पुरुन ठेवण्यास सुरवात केली . याची राखण मात्र काळे निग्रोच करीत होते. असेच काही दिवस गेले मग उत्तरेकडील सैनिक देखील गावात दिसु लागले. आता मात्र सर्वांना खात्री पटली की उत्तरेचा म्हणजेच लिंकनचा विजय नक्कीच आहे. काळे निग्रो गुलाम या उत्तरेकडील सैनिकांचे मोठ्या आनंदाने स्वागत करु लागले. आनंदाने स्वातंत्र्य गीत गाऊ लागले. पूर्वी पण ते असेच एक स्वातंत्र्य गीत गात असत ते अंतीम मुक्ती मिळावी म्हणून गात असत आता मात्र हे गीत गुलामीतून मुक्त होण्याकरीता होते.

शेवटी एकदा तो मुक्ततेचा दिवस येऊन ठेपला. आदल्या रात्री गावातील एक पण निग्रो गुलाम झोपला नव्हता. सर्व जण नाचत, बागडत सूर्योदयाची, मुक्ततेची वाट पहात होते. भल्या पहाटे सर्व गुलाम आवरून, होतील तसे चांगले कपडे घालून गावाच्या मुख्य ठीकाणी जमले. थोड्यावेळाने अमेरिकेच्या संघराज्याचा एक अधिकारी आला. एका उंच ठीकाणी उभे राहून त्याने मुक्ततेचा जाहिरनामा वाचून दाखवला. सर्वांना समजाऊन सांगीतले की या क्षणापासून कोणीही गुलाम नाही. सर्व स्वतंत्र आहेत. अधिकाऱ्याचे भाषण पूर्ण होत नाही तोच सर्व निग्रोंनी एकच जल्लोष केला. काहीनी आपल्या टोप्या हवेत भिरकाऊन नाचायला सुरवात केली. काही आनंदाने हमसाहमशी रडु लागले. काही जमीनीवर गुडघे टेकून प्रभुची प्रार्थना करु लागले. बुकरची आई देखील आपल्या मुलांना घेऊन सभेला आली होती. तीच्या डोळ्यातून तर सारखा अश्रुप्रवाह सुरु होता. आईसकट सर्वांनी गुडघे टेकून प्रभुची मनोभावे प्रार्थना केली. शेजाऱ्या पाजाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आणि मग आपल्या मालकाचा निरोप घेण्याकरीता मालकाचे घराकडे निघाली. रस्ताभर बुकरची आई आनंदाने

रडत होती . हा मुक्ततेचा दिवस दाखवल्याबद्दल प्रभुचे आभार मानत होती. आजपासून ती आणि तिची मुले गुलाम नव्हती. सर्व स्वतंत्र होती. आता त्यांचेवर कुणी जबरदस्ती करणार नव्हते. आता कुणी त्यांना फटके मारणार नव्हते की झोडपणार नव्हते. आता ते कुठेहि जाऊ शकणार होते. त्यांना कुणाची परवानगी घ्यावी लागणार नव्हती. त्याचे मनात येईल ते काम करु शकणार होते. बुकरच्या आईच्या डोळ्यासमोर हे सर्व चित्र अगदी स्पष्ट दिसत होते. आपल्या मुलांना आता खूप मोठे करण्याचा, त्यांना उत्तम शिक्षण देण्याचा तीने  ठाम निश्चय केला.

मालकाचे सर्व कुटंब आपल्या गुलांमाचा निरोप घेण्याकरीता वऱ्हांड्यातच जमले होते. मालक आणि गुलाम दोघांच्याहि डोळ्यात पाणी होते. दोन दगड जर खूप दिवस एकत्र राहिले तर ते एकमेकांना चिकटतात. इथे तर दोन चालती बोलती, जीव असलेली  माणसे इतके वर्ष एकत्र राहिली होती. मालकांचे काही झाले तरी या गुलामांवर एकप्रकारचे प्रेम जडले होतेच. गुलामाबद्दल एक प्रकारची माया निर्माण झाली होती. थोडेसे  कठोरपणाने का होईना त्यांनी या गुलामांना सांभाळले होते. आता ते कायमचे दुर जाणार म्हणून त्यांचे डोळ्यात पाणी येत होते. मालक कीतीही रागावला तरी तो आपली थोडीतरी काळजी घेत होता. अडचणीला मदत करीत होता. दुखलखुपल पहात होता. याची जाणीव निग्रो गुलामांना पण होती आणि ते पण डोळ्यात पाणी आणून आपल्या मालकाचा निरोप घेत होते. आजचा आनंदाचा दिवस चांगल्या प्रकारे साजरा करता यावा म्हणून मालकांनी प्रत्येक निग्रो कुटूंबाला भरघोस खाण्याचे पदार्थ आणि रोज लागणाऱ्या वस्तु भेट म्हणून दिल्या. थोडे थोडे पैसे आणि कापडचोपड  दिले. मालकाचा अश्रुपूर्ण डोळ्यांनी निरोप घेऊन बुकरची आई आपल्या झोपडीत परत आली. आता ही झोपडी  त्यांना सोडावी लागणार होती. आता ते काही मालकाचे शेतावर राबणारे गुलाम नव्हते मग झोपडीत कसे राहणार आणि करणार तरी काय ? उद्याचे उद्या पाहु असा विचार करून बुकरच्या आईसकट सर्व निग्रोंनी मुक्ततेचा दिवस अगदी आनंदात घालवला. सारा दिवस नाचगाणे, मेवा मिठाई खाणे, एकमेकांचे गळ्यात गळे घालून उगीचच इकडून तिकडे भटकणे यातच गेला. पण काही केल्या  उद्याचा विचार बुकरचे आईचे डोक्यातून जात नव्हता. सारी रात्र आणि पुढचे काही दिवस ती याच विचारात होती. शेजारी पाजारी असलेल्या लोकांना विचारण्यात

काही अर्थच नव्हता. उद्याचा विचार त्यांचे पुढे मुळीच नव्हता.गुलामीतून मुक्त झाल्यानंतर सर्व गुलाम अगदी आनंदात होते. काय करु आणि काय नाही असे त्यांना झाले होते.त्यांना या अर्निबंध स्वातंत्र्याचा मनसोक्त उपभोग घ्यायचा होता. आतापर्यंत गुलामांना एका ठिकाणाहून दुसरीकडे जायचे असेल तर मालकाची परवानगी लागत असे. तो परवानगीचा कागद सतत जवळ बाळगावा लागत असे. आता ते स्वतंत्र होते. मग काही गुलामांनी खूप दूर जाऊन आम्ही स्वतंत्र आहोत हे दाखवण्याचे ठरविले. थोडयाच दिवसात मात्र त्यांचा भ्रमनिरास झाला. एकतर त्यांना स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याची पात्रता नव्हती. जवळ काही पैसाअडका पण नव्हता आणि काही करागिरी, कौशल्य पण नव्हते. आतापर्यंत मालक सांगेल ते आणि सांगीतले तसे काम करत असत.स्वतःची बुद्धी वापरून आपल्या मनाने काही काम करायची त्यांना सवय नव्हती.  कुठे डोके वापरावे लागत नव्हते. मालक राहण्याकरीता कशी का असेना एक झोपडी देत होता. पोट भरण्याकरीता आणि जगण्याकारीता खायला देत होता. फाटकेतुटके का होईना अंग झाकायला कपडे देत होता. आता हे सर्व स्वतःच मिळवायचे होते. ते बऱ्याच निग्रोंना काही जमले नाही. विशेषतः वयस्क निग्रोंचे तर फारच हाल होऊ लागले. आणि शेवटी बरेचसे निग्रो पुनः आपल्या जुन्या मालकाकडे परत गेले. नवीन करार करून पुनः जुन्या कामावर रुजु झाले. बुकरची आई या सगळ्यांपेक्षा फारच वेगळी होती. ती देखील एक गुलामच होती. त्यात पुनः एक स्त्री असल्यामुळे जास्तच यातना भोगल्या होत्या.  शिक्षणाचा काही गंध नव्हता. तरी देखील तिला माहित होते की आपली मुले शिकली तरच त्यांची प्रगती होईल. इतकेच नव्हे तर तिला याची देखील जाणीव होती की आपल्या जमातीला जर प्रगती करायची असेल, गोऱ्यांचे बरोबरीने सन्मानाने जगावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. याची सुरवात स्वतःच्या घरापासूनच करायला हवी. फ्रॅकलीन येथे राहून मुलांचे शिक्षण होईलच याची तिला खात्री वाटत नव्हती.  खूप विचार करून करून डोक अगदी फुटायची वेळ आली.   शेवटी ती काही तरी एका निर्णयाप्रत आली . तिने घेतलेला निर्णय धाडसी होता . मागेपुढे न पहाता  लागलीच तिने पुढचे पाऊल  उचलले.

## प्रकरण २ रेः बुकरचा प्रवास

बुकरच्या आईने  फ्रॅकलिन गाव सोडण्याचा निर्णय घेतला होता. बुकरच्या सावत्र वडीलांनी खूप दिवसापूर्वीच युद्ध सुरु असतांना पश्चिम वर्जिनीयात स्थलांतर केले होते. म्हणजे गुलाम असतानांच पळून गेले होते आणि  उत्तरेकडील शिपायांचे सोबतीने  माल्डेन या गावात स्थिरावले होते.  एक लहानशी झोपडी घेऊन रहात होते.  एका मिठाच्या खाणीवर काम पण मिळाले होते. बुकरच्या आईने माल्डेनला  जाण्याचे ठरविले. फ्रॅकलिन पासून माल्डेन चे अंतर काही कमी नव्हते. पाचशे मैल होते. प्रवासाची साधने पण नव्हती. जवळ पुरेसा पैसा नव्हता. बुकरची आई खूप धीराची बाई. सर्व अडचणी विचारात घेऊन तिन माल्डेनला जाण्याचा ठाम निश्चय केला. आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांचा निरोप घेतला. गोऱ्या मालकाला पण भेटून त्यांचा निरोप घेतला आणि माल्डेन कडे प्रस्थान ठेवले. सर्व प्रवास पायीच करावयाचा होता. घोडा गाडी करता पैसे कोणाजवळ होते ?

फ्रॅकलिन ते माल्डेन हा प्रवास सोपा नव्हता. रस्ता बऱ्याच ठिकाणी आडवळणाचा होता. बराच प्रवास जंगलातून करावयाचा होता. बरोबर साधन सामुग्री अपुरी होती शिवाय सोबत तीन लहान मुले होती. पण बुकरची आई खरच धीराची म्हणावी लागेल. कशालाही न घाबरता, अडचणींवर मात करीत सर्वांनी प्रवास सुरु केला. सुरवातीला बुकरला खूप मजा वाटत होती. प्रवासात इकडेतिकडे हुंदडायला मिळत होते. आई सतत जवळ होती. गप्पा गोष्टी करीत प्रवास सुरु होता. जस जसे दिवस उलटु लागले तस तसा प्रवासाचा शीण जाणवु लागला. लहानग्या बुकरचे पाय दुखु लागले. जवळचे खाण्याचे जिन्नस पण संपुन गेले. झाडाखाली  थंडीने काकडत असताना झोप  नीट येत नव्हती. कधी कधी एखादी रिकामी झोपडी सापडायची. मग सर्व जण काहीवेळ अशा झोपडीत आराम करीत असत. एकदा तर गम्मतच झाली. आईला एक रिकामी झोपडी दिसली. मुले अगदी थकून गेली होती.

आईने झोपडीत मुक्काम करावयाचा विचार केला. स्वयंपाक करण्याकरीता चुल पेटवली तोच छपरातून एका मोठा थोरला काळा साप धाडकन जमीनीवर पडला. चुलीच्या उबेने तो बाहेर आला होता. सर्व जाम घाबरले आणि झोपडी बाहेर पळाले. झोपडीची आशा सोडून सर्वांना पुनः झाडाखालीच रात्र काढावी लागली.

सतत चालण्यामुळे पायातले बुट फाटुन गेले होते. जंगलातून प्रवास करताना पायाला काटे टोचत होते. बुकरच्या आईने एक युक्ती केली. केळी सारख्या झाडाची पाने तोडून मुलांच्या पायाला गुंडाळली. हे बुट फारच मजेदार होते. पान सैल झाले की बुकर धाडकन घसरून पडत असे आणि सर्व जण बुकरची थट्टा करीत असत. जवळचे खाण्याचे जिन्नस जवळपास संपलेच होते. बुकरच्या आईला झाडापाल्याची बरीच माहिती होती. कुठे असे झाडझुडुप दिसले की आई त्याचा पाला, मुळे, कंद गोळा करून ठेवत असे आणि मग रात्री तेच शिजवून मुलांना खावयाला घालत असे. असे दिवस चालले होते. प्रवासाने सर्वजण अगदी गलीतगात्र झाले होते. मुले तर एक पाऊल पुढे टाकावयाला तयार नव्हती. बऱ्याच वेळा गोड बोलून तर कधी धाकधपटशा करून आईने प्रवास सुरु ठेवला होता. शेवटी एकदाचा तो कंटाळवाणा प्रवास संपला आणि  सर्वजण माल्डेनला पोहोचले.

बुकरच्या वडीलांची झोपडी पाहून मात्र सर्वांचा  अपेक्षाभंग झाला. शेतावरच्या झोपडीपेक्षा ही झोपडी  भिक्कार होती. आजुबाजुला थोडी देखील मोकळी जागा नव्हती. एकाला एक लागून सर्व झोपड्या होत्या. सगळीकडे घाण, चिखल आणि नुसती दलदल होती. जुन्या फुटक्या डब्यांच्या पत्र्याचे छप्पर आणि भिंती होत्या. शेजारी सर्व खाणीवर काम करणारे लोक होते. काही अगदी गरीब गोरे लोक देखील होते. सर्वांचा दिनक्रम अगदी ठरलेला होता. उजाडले की मिळेल ते खाऊन असेल ते फडक्यात बांधून पुरुष मंडळी मिठाच्या खाणीवर जात. उरलेसुरले खाऊन घरातील इतर मंडळी खाण्याकरीता काही मिळते का  ? काही तुटकफुटक सामान मिळत का हे शोधत हिंडत असत. मुल जमेल तसा आईच्या उद्योगाला हातभार लावीत नाहीतर माऱ्यामाऱ्या करीत वेळ घालवीत. संध्याकाळी पुरुषमंडळी येता येताच दारुच्या दुकानातून दारु ढोसून येत. असेल ते खात आणि मग बायकापोरांना बदडून काढून झोपी जात. जे काही शिल्लक उरले असेल ते खाऊन आई आणि मुले उपाशी पोटी

झोपण्याचा प्रयत्न करीत. यात काहीच बदल होत  नव्हता. बुकरची आई मात्र याला अपवाद होती. जमेल तशी तीने झोपडीची डागडुजी केली. आजुबाजुचा  परीसर होईल तितका स्वच्छ केला. नवऱ्याचे मागे लागून बुकरचे मोठ्या भावाला जॉनला आणि बुकरला देखील खाणीवर काम मिळवून दिले. आता घरात थोडी फार सुबत्ता आली होती. झोपडी पण चांगली वाटत होती. बुकरच्या आईने पण गावात हिंडुन एका ठिकाणी धुणे भांड्याचे काम मिळवले होते. बुकरचे आईला आता जरा कुठे थोडी उसंत मिळाली होती. तीने आता मुलांच्या शिक्षणाचा विचार सुरु केला. पोरांना शिक्षण घेण्याकरीता वेळच कुठे होता ?  बुकरचा दिवस पहाटे ४ वाजल्यापासून सुरु होत असे तो रात्री १०-१२ वाजता संपत असे. बुकर थकला भागला असला तरी आई त्याला काही गोष्टी सांगत असे. जमेल तशी प्रार्थना करावयाला शिकवत असे. बुकरला आईची शिक्षणाची आस्था कळली  होती. त्याला पण शिक्षणाची गोडी होती. मिठाची खाण शाळेच्या रस्त्यावरच होती. बुकरला छान छान ड्रेस घालुन जाणारी मुले रोज दिसायची. आपण देखील  त्याच्या सारखे शाळेत जावे असे वाटे.   शाळेत जात नसून देखील मिठाचे खाणीवर काम करताकरता बुकर काहीतरी शिकतच होता. खाणीत काम करणाऱ्या मजुरांना मीठ जमा करण्याकरीता डबे दिले होते . प्रत्येक मजुरला एक नंबर होता आणि तोच नंबर  डब्यावर टाकलेला होता. नुसते पाहुन पाहुन बुकर वडीलांचा डब्यावरचा नंबर ओळखायला शिकला. हुळु हळु त्याला बरेच आकडे पाठ झाले. आता त्याला अक्षरे वाचावयाची ओढ लागली. बुकरने आईचे मागे तगादा लावला की त्याला वाचण्याकरीता पुस्तक हवे. इकडे तिकडे शोधता शोधता एका कचराकुंडीत आईला एक फाटकेतुटके  अंकलीपीचे पुस्तक मिळाले. त्यात नुसतीच काही ab,ed अशी अक्षरे होती. बुकरची चिकाटी काही औरच होती. आपल्या मनानेच अक्षरे जुळवून त्याने थोड्याच दिवसात सर्व मुळाक्षरे पाठ केली. आता बुकरला बऱ्यापैकी वाचता येऊ लागले होते. त्याला आता शिकण्याची खरी गोडी लागली होती.

या सर्व निग्रो कामगारात एक तरुण निग्रो होता. त्याला थोडेफार वाचता येत होते. संध्याकाळी काम संपले की तो कामगारांना वर्तमान पत्र वाचून दाखवीत असे. सर्व निग्रो त्याला फार मान देत. केवळ वाचता येते म्हणून त्या निग्रोला मान मिळतो हे पाहुन बुकरला पण शिकण्याची जास्तच ओढ

लागली.  बुकरची आई पण याच प्रयत्नात होती. इतर बरेच निग्रोपण शिकण्याचा ध्यास घेऊन होते. या निग्रोंना शिकवणार कोण ? सर्व निग्रोंची शिकण्याची धडपड वेगवेगळ्या कारणाकरीता होती.केवळ शिकण्याकरीता, ज्ञानाचे उद्देशाने शिकणारे फार थोडेच होते. बरेच निग्रो केवळ बायबल वाचता यावे म्हणुन शिकत होते. कारण एकदा का बायबल वाचता यावयाला लागले की मग लोक खुप मान देत असत आणि थोडे पैसे पण मिळत असत.  जवळपास सर्व निग्रोंनी ख्रिस्ती धर्म स्विकारला होता . त्यांना वाचता येत नसल्यामुळे बायबल फक्त ऐकले होते, बायबल वाचावयाचे होते म्हणून काही निग्रोंना  वाचायला  शिकावयाचे होते. बुकरचे काम मात्र वेगळेच होते. त्याला खुप शिकावयाचे होते. खुप ज्ञान मिळावयाचे होते. अगदी इंग्रज लोकांचे बरोबरीने ज्ञान संपादन करावयाचे होते. त्याकरीता त्याची सारी धडपड होती. असे किरकोळ शिक्षण घेउन त्याचे भागणार नव्हते. त्याकरीता शाळेत जायलाच हवे होते. बुकरची ही सर्व धडपड आईला दिसत होती. ती बुकरला शाळेत कसे जाता येईल या प्रयत्नात होती. कुणी परका निग्रो गावात आला की आई जाऊन त्याची चौकशी करीत असे तो शिकलेला आहे का ?  त्याला काही काम येते का ? वगैरे वगैरे.काय वाटेल ते करून बुकरला शिकवायचेच असा आईचा ठाम निश्चय होता आणि कीतीही  कष्ट पडले तरी शिक्षण हे मिळवावयाचे असा बुकरचा पण होता.   आईची आणि बुकरची धडपड शेवटी एकदा फळाला आली.

## प्रकरण ३ बुकरचे शिक्षण

मनात चांगली इच्छा असली की देव पण मदत करतो. बुकरचे बाबतीत असेच झाले पण लगिलच मात्र नाही. त्याला थोडा वेळ जावा लगला. योगायोगाने सैन्यातून निवृत्त झालेला एक सुशिक्षित निग्रो कसा कोण जाणे माल्डेनला आला. त्याला काही काम धंदा नव्हता आणि पोटापाण्याची चिंता होती. सर्व निग्रोंनी मिळून त्याच्याकडून शिक्षण घ्यावयाचे ठरवीले. शिकवण्याचे बदल्यात त्या निग्रोची जेवण्याची आणि राहण्याची व्यवस्था करवयाची होती. राहण्याकरीता एक लहानसे झोपडे मिळाले. जेवण्याचे काय करावयाचे ? सर्वांनी मिळून ठरविले की रोज एका कुटुंबाने त्या निग्रोला जेवायला घालावयाचे. अशा रीतीने बुकरचे आणि इतर निग्रोंचे शिक्षण थोडे फार मार्गी लागले. सर्व निग्रोंना शिकावयाला मिळते याचा खूप आनंद होता. आपल्याला या शिक्षकामुळेच शिकावयाला मिळते याची सर्व निग्रोंना जाणीव होती.शिक्षक ज्या दिवशी जेवायला येणार असे त्या दिवशी ते कुटुंब जमेल तसा चांगला सैपाक करीत असे.बुकर तर आपल्या घरी शिक्षक कधी जेवायला येणार याची वाटच पहात असे. शिक्षक जेवायला असल्यामुळे जेवण जरा खास असेना।

आता कोणाचा विश्वास बसणार नाही पण या एक शिक्षकीय शाळेत चिक्कार गर्दी असे. ५ वर्ष वयाच्या लहान मुलांपासून ते ७० वर्ष वयाचे आजोबा पण शिक्षण घेत होते.आजोबा आणि नातु एकाच वर्गात शिकत होते. एक पूर्ण जमात शिक्षणाचे वेडाने झपाटली होती.बुकरला मात्र या शाळेत जाता येत नव्हते. बुकरच्या वडीलांचा बुकरने शाळेत जाण्याला विरोध होता. बुकरच्या या शाळेच्या वेडामुळे घरात एका नव्याच वादाला तोंड लागले. आईचे मत होते की बुकरने शाळेत जावे. जर बुकर शाळेत गेला तर त्याला मिठाचे खाणीवरील नोकरी सोडावी लागली असती. नोकरी गेली की बुकरमुळे घरात येणारे पैसे बंद होणार होते. हे काही बुकरचे वडीलांना पटत नव्हते. त्यांचा म्हणून बुकरचे शाळेत जावे याला विरोध होता. घरात हा वाद सुरु असताना बुकर काही स्वस्थ बसला नव्हता. त्याने खाणीत काम करणाऱ्या एका सुशिक्षित निग्रोला खाणीतील काम संपले की संध्याकाळी शिकवणी

घेण्यास राजी केले. बुकर मुळातच फार हुशार होता. एवादी गोष्ट तो चटकन आत्मसात करीत असे. थोड्याच दिवसात बुकरने शिक्षकाडून शिकण्यासारखे जेवढे होते तेवढे सर्व शिकून घेतले. त्याला आता पुढील शिक्षणाची ओढ लागली होती. त्या करीता शाळेत जाणे जररुरीचे होते. अशा प्रकारे बुकरचे शाळेवरून पुनः  घरात रोज कुरुबुर सुरु झाली .बुकर काही शाळेत जाण्याचा हट्ट सोडत नव्हता.त्याची शाळेत जाण्याची धडपड सुरुच होती. मग त्याने खाणमालकाला भेटुन आपली शाळेत जाण्याची इच्छा सांगीतली. मालक म्हणाला, ‘ हे बघ मी तुला सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शाळेत जाण्याकरीता सुटी देईन पण त्या करीता तुला पहाटे ४ ते ९ आणि संध्याकाळी ५ ते १० असे १० तास काम करावे लागेल. तयारी असेल तर तू शाळेत जा. ’ खर तर येवढ्या लहान वयात सतत १० तास काम आणि शाळा करणे कोणालाच जमले नसते. बुकरची शाळेची ओढ जबरदस्त होती. त्याने चटकन होकार दिला आणि बुकरची शाळा सुरु झाली. घरातला शाळेवरून होणारा वाद तात्पुरता थांबला. बुकरला मात्र या करीता अगदी पहाटे पासून ते रात्री उशीरा पर्यंत ढोर महिनत करावी लागत होती. शाळेत जाण्याचे आनंदापुढे बुकरला याचे काहीच वाटत नव्हते. बुकर तसा वस्तादच होता. व्हायच काय की मालकाने ९ ते ५ शाळा करावयाला मुभा दिली होती. अगदी शेवटच्या मिनीटापर्यंत काम करावे लागत असे. शाळा जवळपास ३ मैल दूर होती. ९ वाजेतोपर्यंत काम करून बुकर शाळेत  पोहोचला तर वर्गाचा एखाद तास होऊन गेलेला असे. मग आता यावर उपाय काय करावयाचा. बुकरने एक मजा केली. मालकाचे घड्याळ बुकरने १० मिनीटे  समोर करुन ठेवले. काही दिवस बुकर शाळेत अगदी वेळेवर पोचत होता. लवकरच मालकाच्या लक्षात बुकरची युक्ती आली . मालकाने घड्याळच लपवून ठेवले.

बुकरचे शाळेत जाणे काही सरळसरळ झाले नव्हते. त्यात अनंत अडचणी आल्या. सर्वात गंभीर अडचण आली  ती बुकरच्या नांवाची. बुकरला फक्त बुकर ऐवढेच नांव होते. शाळेत स्वतःचे नांव, वडीलांचे नांव आणि अडनाव पण लावावे लागे. इथे कोणाला इतकी सगळी नांवे होती. बुकरने मजाच केली. स्वतःचे नांव बुकर, वडीलांचे नांव म्हणून आई लाडाने हाक मारीत असे ते टॅलीफॅलीओ आणि अडनांवाचे जागी त्याचा आवडता वाशिंग्टन याचे नांव लावले.असा बुकरचा बुकर टी.

वाशिंग्टन झाला . पुढे मोठा झाल्यावर बुकर गमतीने म्हणत असे , 'पहा बर माझे नांव मी स्वतःच ठेवले की नाही ?' ही अडचण मिटली तर नवीन अडचण उभी राहीली. शाळेत टोपी घालणे सक्तीचे होते. आता टोपी कुठून आणावयाची. इतर मुले बाजारातून छान छान टोप्या घेऊन आले . बुकरला काही ते शक्य नव्हते. टोपीला पैसे पडतात. ते कुठून आणावयाचे. आई बुकरच्या मदतीला आली. एका जाडसर कापडाची आईने एक छान टोपी बुकरला शीवुन दिली. बाजारात मिळणाऱ्या टोपीसारखी ती नव्हती पण बुकरला त्या टोपीचे फार अप्रुप होते कारण ती टोपी आईने स्वतः हाताने शीवुन दिली होती. मोठा झाल्यावर बुकरने अनेक टोप्या वापरल्या पण बुकर म्हणतो , ' त्या टोपीची सर कशालाच आली नाही.'

बुकरची शाळा मोठी मजेदार होती. या शाळेत ५वर्षापासून ते ७५ वर्षापर्यंत विद्यार्थी होते. आजोबा आणि त्यांचा नातु एकाच वर्गात शिकत होते. ऐक संपूर्ण जमातच्या जमात शिकण्यासाठी धडपडत होती. शाळेला एकच शिक्षक होता. अभ्यासाची पुस्तके पण नव्हती. त्या एका शिक्षकाचे ज्ञान यथा तथाच होते.एवढे असून सुद्धा सर्व निग्रो अगदी मन लाऊन शिकत होते. अशा शाळेत देखील बुकरला काही नीटपणे शिकता आले नाही. काही दिवसांनी बुकरची बदली मिठाचे खाणीवरून कोळशाचे खाणीत झाली. मिठाच्या भट्यासाठी कोळासा लागत असे. कोळाशाचे खाणीत काम करून शाळा करणे शक्य नव्हते. बुकरच्या वडीलांना बुकरने नोकरी सोडणे मुळीच खपत नव्हते. बुकर मिळवत असलेले पैसे कोण सोडणार ? पुनः बुकरच्या शाळेचा वांधा निर्माण झाला. बुकरची शाळा बंद झाली. त्यात पुनः हे कोळशाच्या खाणीतले काम फार भयंकर होते. खाणीत काम करतांना अंगावर कोळशाचा दाट थर बसत असे. धुताधुता तो निघत नसे. या खाणीत काम करताना बुकर अगदी घाबरलेला असे. खाणीत शिरण्याचा बोगदाच जवळपास एक मैल लांबीचा होता. नंतर कोळसा खणण्याकरेता वेगवेगळे बोगदे होते. ही खाण म्हणजे एक भुलभुलय्याच होती. बुकर तर सुरवातीला बाहेर येण्याचा रस्ताच चुकत असे. खाणीत खूप अंधार असे. अशा अंधारात रस्ता चुकला की बुकर घाबरून मोठमोठ्याने रडत असे. आपण आता खाणीतच अडकून पडणार या भीतीने बुकर मग

जोरजोराने ओरडत असे. त्याचे ओरडणे आणि रडणे ऐकून मग कोणीतरी बुकरला खाणीतून बाहेर नेत असे.

शाळेत जाता येत नसल्यामुळे बुकर खूप उदास असे. गावातल्या गोऱ्या मुलांना रोज शाळेत जाताना पाहून बुकर म्हणत असे, मी जर एखाद्या श्रीमंत गोऱ्या कुटुंबात जन्म घेतला असता तर काय मजा झाली असती । मस्त पैकी छान छान कपडे घालून रोज शाळेत जाता आले असते. छान छान पुस्तके वाचता आली असती. बुकरला या गोऱ्या मुलांचा खूप हेवा वाटत असे. हाच बुकर पुढे मोठा झाल्यावर म्हणतो की, ‘ लहानपणी जरी मला गोऱ्या मुलांचा हेवा वाटला असला तरी आज मात्र माझी पक्की खात्री झाली आहे की मी गरीब होतो, गोऱ्या लोकांच्या द्रष्टीने अगदी कस्पटासमान होतो तरी तो मला शाप नसून एक प्रकारचे वरदानच होते असे वाटते. गोऱ्या मुलांप्रमाणे जर मला सर्व काही श्रम न करीता मिळाले असते तर कदाचित मी जो स्वकर्तुत्वावर , खूप मेहनत घेऊन मोठा झालो आहे तो कदाचित झालो नसतो. काळ्या निग्रो मुलांना काही हुशारी नसते. निग्रो म्हणजे जणु काय काम करणारे एक जनावरच ही गोऱ्यांची पक्की समजूत होती. गोरा मुलगा काय कोणतेही काम सहज करून दाखवील. काळ्या निग्रो मुलाला कधीच जमणार नाही अशी गोऱ्यांची ठाम समजुत होती. बुकरने आपल्या उदाहरणाने ही समजुत कीती खोटी आहे हे दाखवून दिले. पण हे सगळे विचार नंतरचे. सध्या तरी बुकर अगदी निराश झाला होता. आपल्याला आता कधीच शाळेत जाता येणार नाही अशी त्याला भिती वाटु लागली.

खाणीत काम करतांना बुकर लोक काय बोलतात, कसली चर्चा करीतात हे अगदी लक्षपूर्वक ऐकत असे. असेच एकदा खाणीत काम करण्याऱ्या दोन तरूण माणसांचे बोलणे त्याचे कानावर पडले. एक दुसऱ्याला सांगत होता , ‘ अरे जवळचे हॅम्पटन गाव आहे ना। तीथे खास निग्रो मुलांकरीता एक शाळा उघडली आहे. शाळेत राहण्याची आणि जेवणाची पण सोय करतात. फी वगैरे काही नाही फक्त भरपूर काम करावे लागते.’ हे बोलणे ऐकून बुकरने फक्त नाचाचेच बाकी ठेवले. खाणीतून परत घरी आल्यावर बुकरने जाहीर करून टाकले की तो हॅम्पटनच्या शाळेत शिकण्यासाठी जाणार.कोणाला कितीही राग आला, कितीही अडचणी उभ्या केल्या तरी तो जाणार म्हणजे जाणार.

आईने विचारले , ‘ अरे बुकर तू हॅम्पटनला जाणार कसा ? हॅम्पटन  काही चटकन चालत जाता येईल इतके जवळ नाही. घोडगाडी करून जावे लागेल. तुला कपडे लागतील. प्रवासात खाण्यापिण्याकरीता पैसे लागतील. आहेत का तुझ्या जवळ काही पैसे ? खर तर बुकर खाणीत काम करून पैसे मिळवत होता पण  ते सर्व घरखर्चात संपून जात.’  ‘ ते काही नाही. मी हॅम्पटनला शिकावयाला जाणार म्हणजे जाणार. ’ बुकरने आपला हट्ट चालुच ठेवला.आईला पण बुकरने हॅम्पटनला जाऊन शिकावे असेच वाटत होते. पण पैशाची अडचण होती. बुकरच्या वडीलांना मात्र बुकरने नोकरी सोडून शिकावयाला जाणे पसंत नव्हते कारण मग घरात येणारा पैसा थांबला असता.

बुकरच्या आईला बुकरचे येवढ्या लहान वयात कोळशाच्या खाणीत काम करणे आवडत नसे. रोज संध्याकाळी बुकर खाणीतून परत आला की त्याचे कोळशामुळे काळे झालेले कपडे, तोंड आणि रडवेला चेहरा पाहून आईलाच  रडु येत असे. गरीबी पुढे काही इलाज नव्हता. बुकरला जरा बऱ्यापैकी, कमी श्रमाची नोकरी ती शोधतच होती.

बुकरने आपले खाणीतले काम चालुच ठेवले होते मनाने मात्र तो केंव्हाच हॅम्टनला पोहचला होता. रोज रात्री त्याला आपण  हॅम्पटनला येऊन पोहोचलो आहोत, रोज शाळेत जात आहोत, इतर मोकळ्या वेळी शेतावर काम करीत आहोत, सर्व शिक्षक काय हुशार मुलगा आहे हा  म्हणून तारीफ करीत आहेत अशी स्वप्न पडत असत. बुकरची आई बुकरकरीता दुसरी नोकरी शोधत होतीच. तीच्या कानावर आले की खाणीचे मालक जनरल रफनर यांचे घरी एका नोकराची गरज आहे. आईने बुकर करीता तीथे प्रयत्न करावयाचे ठरवीले. खर तर रफनर बाईंची प्रसिद्धी खूप खाष्ट आणि रागीट बाई अशी होती. बुकर  तीथे टिकाव धरु शकेल की नाही याची पण तीला खात्री नव्हती. प्रयत्न करावयला काय जाते ? आई बुकरला घेऊन रफनर बाईंच्या घरी गेली. बुकर कडे पाहून सुरवातीला तर रफनर बाईंनी नाकच मुरडले. एवढासा पोरगा काय काम करणार ? दिसतो पण किती कळकट.चोऱ्यामाऱ्या  तर करणार नाही ना असे सुरवातीला बरेच आढेवेढे घेतले. खर तर रफनर बाईंना नोकराची खूप गरज होती. कुठलाही नोकर त्यांना चालला असता. त्यांचे स्वभावामुळे एक पण नोकर त्यांचेकडे जास्त दिवस टिकत नसे. आईने पण बुकरची खूप

तरफदारी केली आणि बाईंनी बुकरला नोकरीवर ठेवून घ्यावयाचे कबुल केले. बुकरची खाणीतल्या नोकरीतुन सुटका झाली . बुकर रफनर बाईंकडे कामावर रुजु झाला. पहिल्याच दिवशी बाईंनी बुकरला बजावले, ' हे बघ बुकर । सगळे काम कसे अगदी नीट नेटके झाले पाहिजे. कुठेही थातुरमातुर काम चालणार नाही. सगळ्या खोल्या, फरश्या, फर्नीचर अगदी स्वच्छ झाल्या पाहिजे. कुठे जरा सुद्धा धूळ दिसता कामा नये. विचारल्याशिवाय कुठल्याही वस्तुला हात लावायचा नाही. तोड फोड मुळीच खपणार नाही. कामात जरा देखील चालढकल केली तर लागलीच हाकलून देईन आले लक्षात।' बुकर तर अगदी घाबरून गेला. ही सर्व कामे त्याने कधीच केली नव्हती. रफनर बाई जरी बोलावयला कठोर असल्या तरी मनातून त्यांना बुकरची कणवच येत होती. बाईंनी बुकरला सर्व काम नीट समजाऊन सांगीतले. चुकले तर पुनः पुनः सांगुन नीट करून घेतले. बुकर मुळात हुशारच होता. बाईंना आपल्याबद्दल काही तरी वाटते हे त्याने चटकन ओळखले. काहीही करून बाईंच प्रेम संपादन करण्याचा त्याने पक्का निश्चय केला. कोणतेही काम तो अगदी मन लाऊन करीत असे. साधे खोली झाडण्याचे काम का असेना तो प्रत्येक खोली अगदी तीन तीनदा झाडत असे. फर्नीचर, आरसे, कपाटे अगदी घासून घासून पुसत असे. रफनर बाईंना बुकरचे काम आवडु लागले. कोणतेही काम अगदी मन लाऊन करण्याच्या आणि अगदी उत्तम करण्याच्या रफनर बाईंच्या या शिकवणुकीने बुकरच्या आयुष्याला पुढे खरी कलाटणी मिळाली.

आजकाल रफनर बाई बुकरशी थोडफार बोलु लागल्या होत्या. बोलता बोलता त्यांना समजले की बुकरला शिक्षणाची खूप आवड आहे. त्याला खूप शिकावयाचे आहे. रफनर बाईंना बुकरच्या या शिकण्याच्या आवडीचे खुप कौतुक वाटले. त्यांनी बुकरला मदत करावयाचे ठरवीले. रफनर बाईंबरोबर तो लहान लहान पुस्तके वाचु लागला. रफनर बाईंनी बुकरला काही पुस्तके देऊनच टाकली. बुकरने एक लाकडाची पेटी मिळवली. त्यात तो ही पुस्तके नीट कव्हर घालून ठेवीत असे. बुकरची ही पहीली लायब्ररी होती. रफनर बाई बुकरवर इतक्या खुष होत्या की हिवाळ्यात काम कमी असे तेंव्हा त्यांनी बुकरला शाळेत जाण्याची पण परवानगी दिली. बुकरचे अगदी छान बस्तान बसले होते. बुकरबाई मायेने बुकरचे करीत होत्या. शाळेत पण जावयाला मिळत होते. दुसरा कोणी

मुलगा असता तर आयुष्यभर हेच काम करीत राहीला असता. पण बुकर काही सर्वसाधारण मुलगा नव्हता. त्याला खूप शिकावयाचे होते. हॅम्पटनला जाऊन खरखुर चांगले शिक्षण घेण्याचा त्याने ठाम निश्चय केला होता. इथे सर्व ठीक चालले होते तरी त्याचे मन काही रमत नव्हते.असे पाच, सहा महिने कशी तरी बुकरने कळ काढली आणि मग त्याने हॅम्पटनला जाण्याचे ठरवीले. घरात कोणाचेही न ऐकता बुकरने हॅम्पटनला जाण्याची तयारी सुरु केली. खर तर तयारी करण्यासारखे त्याचेजवळ होतच काय। सर्व प्रथम बुकरने रफनर बाईंचा निरोप घेतला. एवढासा लहान पोरगा स्वतःच्या बळावर एकटाच कोणाच्या मदतीशिवाय दुरच्या गावात शिकण्यासाठी जातो आहे याचे त्यांना खूप कौतुक वाटले. त्यांनी बुकरला प्रेमाने निरोप दिला. थोडे पैसे  व कपडे दिले. बुकरचा मोठा भाऊ जॉन पण खाणीत काम करीत होता. त्याने  आपल्याजवळचे थोडे पैसे दिले. गावातल्या सर्व निग्रो कुटुंबाना बुकर दुरच्या गावात शिकावयाला  जात आहे याचे खूप कौतुक वाटले. जमेल तसे कुणी थोडे पैसे, कोणी काही कपडे तर कुणी प्रवासात खाण्याकरीता उपयोगी पडेल असे खाण्याचे पदार्थ दिले. आईने घरखर्चातून याच कामा करीता थोडे पैसे बाजुला टाकले होते ते बुकरला दिले. जमलेल्या सर्व सामानाची बुकरने एक पोत्याची मोळी केली आणि पाठीवर अडकवून टाकली. सर्वांचा निरोप घेतला. आईचा निरोप घेताना मात्र बुकरला रडेच कोसळले. आईची तब्बेत चांगली नव्हती.भोगलेल्या हालअपेष्टांनी अगदी खंगुन गेली होती. आई पुनः भेटेल की नाही याची बुकरला खात्री वाटत नव्हती तर बुकर पुनः  दिसेल की नाही,त्याची पुन : भेट होईल की नाही  या विचाराने आईला काही सुचत नव्हते. बुकरची आई खरच खूप मोठ्या मनाची आणि धीराची  बाई होती. मनावर दगड ठेऊन तीने बुकरला निरोप दिला. आई म्हणाली, ‘ बुकर तू शिकण्याकरीता लांब जातो आहेस. माझी तब्बेत ही अशी झाली आहे. आपण पुनः भेटु की नाही याची मला खात्री नाही. काहीही झाले तरी शिक्षण पूर्ण झाल्याखेरीज तू परत यायचे नाही हे पक्के लक्षात ठेव.मला तुझे तसे वचनच हवे आहे. तू शिकलास तरच आपले घर सुधारेल. तू शिकलास तर आपल्या  निग्रो जमातीला चांगले दिवस येतील.माझ्या  तुझ्यापासून मोठ्या अपेक्षा आहेत. कुठलेही काम करण्यात कमीपणा मानु नकोस.जे काम करशील ते मन लाऊन अगदी उत्तम प्रकारे कर. कोणी त्रास दिला तरी त्याचा द्वेष करु नकोस.

जा बाळ माझे तुला आर्शिवाद आहेत आणि प्रभु पण तुझ्या सतत पाठीशी राहील.’ खरच किती मोठया मनाची होती बुकरची आई । स्वतःची तब्बेत चांगली नसतांना देखील तीने बुकरला इतक्या लांब एकटे जाण्याची परवानगी दिली. यापुढे बुकरला सतत हालअपेष्टा भोगाव्या लागणार आहेत, त्याची खाण्यापीण्याची आबाळ होणार आहे  हे माहित असून देखील तीने बुकरला जाण्याची परवानगी दिली . बुकरने आईला वाकून नमस्कार केला.आईच्या पायावर हात ठेऊन शिक्षण पूर्ण करीन आणि मगच परत येईन अशी शपत घेतली. आईने बुकरला थोड्यावेळ छातीशी घट्ट धरून ठेवले मग निर्धाराने त्याला दूर केले आणि  जाण्यास सांगीतले. बुकरने सामानचे पोते पाठीवर टाकले आणि हॅम्टनकडे चालु लागला. आई  सोडून सर्व  जण बुकर वळणाशी दिसेनासा होइतो त्याला पहात होते. बुकर पण सारखा सारखा मागे वळून पहात होता. आईला मात्र बुकर लांब आपल्याला पासून दूर जातो आहे हे पहाणे सहन होत नव्हते. आई प्रभुच्या पुढ़े बसून बुकरला सुखी ठेव अशी प्रर्थना करत बसली.

## प्रकरण ४: हॅम्टनची शाळा

हॅम्पटन हे पश्चिम व्हर्जिनीया प्रांतातले एक लहानसे खेडे होते. गुलामगिरीचा कायदा झाल्यानंतर काळे निग्रो गुलामीतून मुक्त झाले पण त्यांची आर्थिक आणि सामाजिक परिस्थीती काही सुधारली नाही.सर्व निग्रो समाज शिक्षणापासून वंचीत होता. या निग्रोंना कुठलेही काम करण्याची माहिती नव्हती. एवढेच काय पण स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याची कुवत नव्हती. या अशा हालअपेष्टा भोगणाऱ्या निग्रोबद्दल सहानभुती बाळगणारे बरेच गोरे लोक होते. गोऱ्यांच्या काही सेवाभावी संघटना पण निग्रोंच्या उन्नती करीता काम करीत होत्या. अशा निग्रोंबद्दल सहानभुती बाळगणारे जनरल आर्मस्ट्रांग हे एक होते. सैन्यातून निवृत्त झाल्यावर काही समविचारी लोकांच्या मदतीने निग्रोमुलांकरीता त्यांनी एक शाळा सुरु केली होती. या शाळेत मुलांना शालेय शिक्षणाबरोबरच धंदेशिक्षण पण दिले जात असे. मुलांची राहण्याची आणि जेवणाची पण सोय केली होती. जी मुले शाळेची आणि इतर फी देऊ शकत नसतील त्यांना शाळेचे तास  संपले की शाळेचे शेतावर किंवा शाळेतच काही काम करावे लागत असे. या शाळेत बरेच गोरे लोक आणि गोऱ्या बायका अगदी विनावेतनच काय पण स्वतःची पदरमोड करून शिक्षकाचे काम करीत असत. अशा या शाळेत बुकर प्रवेश घेण्याकरीता बुकर  माल्डेनहुन निघाला होता.

माल्डेन ते हॅम्टन हे अंतर काही कमी नव्हते. पुनः माल्डेन आणि हॅम्पटन हे रेल्वेने जोडलेले नव्हते. सुरवातीचा काही प्रवास रेल्वेने आणि मग काही प्रवास घोडागाडीने करावा लागत असे. बुकरने सर्वांचा निरोप घेऊन माल्डेनचे स्टेशन गाठले.तिकीट कसे काढावयाचे, कोणत्या स्टेशनचे काढावयाचे हे काही बुकरला माहीत नव्हते. बुकर अगदी घाबरुन गेला होता. तिकीट काढणे, डब्यात चढणे ,एकट्यानेच प्रवास करणे या गोष्टी त्याने आधी कधीच केल्या नव्हत्या. तो अगदी रडवेला झाला होता. सारखी आईची आठवण येत होती.बुकरने सरळ हॅम्पटनचे तिकीट मागीतले. तिकीट देणारा बुकरकडे पहातच राहीला. एवढासा लहान मुलगा एकटाच इतक्या लांब प्रवास करतो आहे याचे त्याला  आश्चर्य वाटले. ‘ कशा करता इतक्या लांब जातो आहेस रे ? आणि बरोबर पण कुणी दिसत नाही.’ बुकरने तीकीट देणाऱ्याला आपण  हॅम्पटनला शाळेत शिक्षण घेण्याकरीता जातो

आहे.कसे जायचे ते माहीत नाही म्हणून मदत करण्याची विनंती केली. तिकीटे देणारा गोरा माणुस स्वभावाने चांगला होता. एवढासा लहान मुलगा स्वतःच्या हिमतीवर शिक्षणाचे ओढीने इतक्या लांब जातो आहे याचे त्याला कौतुक वाटले. हॅम्पटनला जाण्याकरीता कुठल्या स्टेशन पर्यंत रेल्वेने जाता येईल आणि मग घोडागाडीने प्रवास करवा लागेल हे समजाऊन सांगून योग्य ते तिकीट दिले.एकदाचा बुकर गाडीत बसला. माल्डेन गाव दिसनासे होईतो बुकर खीडकीतून डोके बाहेर काढून आपल्या गावाकडे पहात होता. सारखी घराची,आईची आठवण येत होती. गाडी मधल्या स्टेशनवर थांबली की गाडीतून उतरून घरी परत जायची इच्छा होत होती. अशा वेळी त्याला आईचे शब्द आठवत. आईने अगदी निक्षून बजावले होते की कुठल्याही परिस्थीतीत शिक्षण पूर्ण झाल्याशिवाय परत येऊ नकोस. बुकरने आपल्या मनाला आवर घातला आणि आपले स्टेशन येण्याची वाट पाहु लागला. यथावकाश बुकरचे उतरण्याचे स्टेशन आले. आपले पोते संभाळत बुकर घोडागाडीच्या तळाकडे चालु लागला. थेट हॅम्टन पर्यंत घोडागाडीने प्रवास करणे जवळ असलेल्या पैशात शक्य नव्हते. मग बुकरने थोडेसे पैसे खाण्या पिण्याकरीता बाजुला ठेवले आणि उरलले पैसे गाडीवानाला देऊन हॅम्टनच्या जितक्या जवळ उतरावता येईल तीथपर्यंत नेण्याची विनंती केली. घोडागाडीत बुकर हा एकटाच निग्रो होता. बाकी सर्व गोरे होते. गाडीवान एका निग्रोमुलाला गोऱ्यांचे सोबतीने थोडाच प्रवास करु देणार होता. बुकरने जरी भाडे दिले होते तरी त्याने बुकरला गवत ठेवण्याच्या जागी बसवले. अगदी घाण जागा होती ती. गवत कपड्यांना चिकटत होते आणि अंगाला खाज सुटत होती. गवत पण ओलसर होते आणि त्याला घाण वास येत होता. बुकर अगदी त्रासून गेला. केंव्हा एकदा हा प्रवास संपतो असे त्याला झाले होते.

संध्याकाळी घोडागाडी एका जुनाट इमारतीजवळ थांबली. एक हॉटेल होते ते. गाडीतले प्रवासी रात्रभर तीथे मुक्काम करणार होते. सर्व गोरे प्रवासी हॉटेलात गेले आणि हॉटेल मालकाने सर्वांना खोल्या वाटून दिल्या. सर्व गोरे प्रवासी आपआपल्या खोल्यात गेल्यानंतर बुकरपण हॉटेल मालकाकडे गेला आणि खोली देण्याची विनंती केली मालकाने बुकरकडे एकदा निरखून पाहिले. एक निग्रो मुलगा अगदी रुबाबात हॉटेल मध्ये खोली मागतो आहे हे पाहून त्याला खूप राग आला. जोराने

ओरडुन तो म्हणाला, ' खोली पाहिजे काय ? अरे एक निग्रो असून अगदी रुबाबात खोली मागतोस ? एवढी तुझी हिम्मत . थांब तुला चांगला धडाच शिकवला पाहिजे. कंबरेत दोन लाथा घातल्या की सरळ येशील . इथून पळतोस की खरच लाथा हव्यात ? ' बुकरने खूप गयावया केल्या. बाहेर किती थंडी आहे ते सांगीतले. बाहेर झोपला तर तो मरुनच जाईल म्हणून कमीत कमी हॉटेलच्या व्हरांड्यात तरी झोपु द्यावे म्हणून अगदी काकुळतीने विनंती केली. ' म्हणे थंडीने मरून जाईल. मेला तर मला काय त्याचे सोयर सुतका. एक घाण तरी कमी होईल. बऱ्या बोलाने पळतोस की हाणु चांगल्या लाथा' आता हॉटेल माध्ये जागा काही मिळत हे पक्क झाल्यावर बुकरने आपले पोते पुनः पाठीवर टाकले आणि बाहेरचा रस्ता धरला. बाहेर नुसती जीवघेणी थंडी होती. थंडीने दात वाजत होते. कानाला गार वारा लागून गरगरल्या सारखे होत होते. हॉटेलच्या पायरीवरच झोपावे असा विचार करून बुकरने पोत्यातून एक जाडशी सतरंजी आणि चादर काढली. सतरंजी पायरीवर पसरून आणि चादर अंगाभोवती गुंडाळून बुकर झोपण्याचा प्रयत्न करू लागला. खालच्या पायरीचा गारठा अगदी हाडापर्यंत पोहोचत होता आणि चादरीतून देखील गार वारे अंगाला झोंबत होते. पायरीवर झोपणे काही शक्य नव्हते. बुकरला रडु कोसळले. त्याला आईची आठवण येऊ लागली. माल्डेनला येताना असेच सर्व जण उघड्यावर झोपत असत. थंडी खुप असली की आई बुकरला कुशीत घेऊन झोपत असे. आईच्या कुशीत बुकर मजेत झोपत असे.आई। आई करून बुकर रडु लागला. इतक्यात त्याला भास झाला की आई अगदी जवळच आहे आणि आपल्या पाठीवरुन हात फिरवत आहे.जणु काय आईनेच कानात सांगीतल्या सारखे बुकरने सतरंजी गुंडाळून ठेवली आणि चादर अंगाभोवती गुंडाळून जोरात चालावयाला सुरवात केली. चालण्याचे श्रमाने अंगात उब येऊ लागली. बुकरने मग जोरात धावायला सुरवात केली. आता मात्र थंडी वाजणे कमी झाले. बुकरने मनातल्या मनातच आईचे आभार मानले आणि मग सारी रात्रभर बुकर जोरात चालत होता नाहीतर पळत होता. शेवटी एकदा पहाट झाली. थंडी पण कमी झाली. बुकरने हॉटेलच्या पायरीवर सतरंजी पसरून पुनः झोपण्याची तयारी केली. चालण्याच्या आणि धावण्याच्या श्रमाने बुकर अगदी थकून गेला होता. सतरंजीवर आंग टताकताच त्याला अगदी गाढ झोप लागली. थोड्यावेळाने कोणीतरी आपल्याला ढोसत आहे असे त्याला

जाणवले. डोळे उघडून पाहतो तो  चांगले उजाडले होते . हॉटेल मालक त्याला लाथेने ढोसत होता. बुकरने घाईघाईने आपले सामान गुंडाळले हॉटेल मालकाची माफी मागीतली . जवळच्या एका विहीरीवर जाऊन हात पाय तोंड धुतले आणि गाडीवानाची वाट पहात बसला. गाडीवानासकट सर्व आरामात नास्ता वगैरे करून गाडीत येऊन बसले. बुकरची रवानगी पुनः गवताच्या गंजीवर झाली. यावेळी मात्र बुकरला गवताच्या गंजीवर झोपताना छान वाटले. गवताची  मस्त उब लागत  होती. बुकर अगदी गाढ झोपी गेला. साधरणतः प्रवास ३-४ तास झाला असेल तो गाडीवानाने बुकरच्या पाठीवर हातातला चाबुक हाणला. बुकर एकदम खडबडून जागा झाला. ' अबे ओ काळ्या चल उठ. संपले तुझे पैसे.उतर आणि चालु लाग. '  गाडीवानाने चाबुक हाणला होता तरी बुकरने  गाडीवानाचे आभार मानले आणि आपले पोते पाठीवर टाकून चालण्यास सुरवात केली.

हॅम्पटन अजून कीती लांब आहे हे काही माहित नव्हते. बुकर आपला चालतच राहीला. पोटात भुकेने कावळे ओरडत होते. रात्रभर चालण्याने आणि धावण्याने पायात गोळे आले होते. एक  पाऊल देखील टाकवत नव्हते तरी देखील बुकर निर्धाराने चालतच राहीला. एखादी बैलगाडी दिसली की बुकर त्याला हॅम्पटनचा रस्ता विचारी आणि गाडीवान तिकडेच जात असेल तर गाडीत बसु देण्याचे विनंती करीत असे. एखादा चांगला गाडीवान बुकरला गाडीत घेत असे पण बहुतेक सर्व गाडीवान बुकर एक निग्रो आहे हे पाहुन दोन चार शिव्या हासडून पुढे जात असत. अशी वाटचाल करीत बुकर संध्याकाळचे  सुमारास रिचमन्ड या  मोठया गावात येऊन पोहचला. गाव बऱ्यापैकी होते. मिठाईची आणि खाण्याची बरीच दुकाने रस्त्यावरच होती. बुकर अगदी भुकेने हैराण झाला होता. जवळचे पैसे बुकरने मोजले. खाण्याची चैन करणे परवडणारे नव्हते. एका विहीरीवर जाऊन बुकर पोटभर पाणीच प्यायला सारखी घराची आणि आईची आठवण येऊ लागली. मोठ्या निर्धाराने बुकरने स्वतःला सावरले आणि दुकाने बंद होण्याची वाट पहात इकडेतिकडे हिंडु लागला. एका दुकानाची पायरी बरीच उंच होती आणि पायरी खाली चांगली मोकळी जागा होती. रात्र पायरीखाली काढणे शक्य होते. दुकान बंद झाल्याबरोबर बुकरने पायरीखाली आपली पथारी पसरली.

सकाळ झाल्यावर बुकरने पुनः विहीरीवर जाऊन हात पाय स्वच्छ धुतले. मिठाईच्या दुकानांकडे आशाळभूतपणे पहात गावात भटकण्यास सुरवात केली. रिचमन्ड हे समुद्र किनाऱ्यावरील गाव होते . किनाऱ्यावर एक जहाज नांगरून पडले होते आणि जहाजावरून माल उतरविण्याचे काम सुरु होते. जहाजाचा कॅप्टन एक इंग्रज माणूस होता तोच कामावर देखरेख करीत होता. बुकरने कॅप्टनजवळ जाऊन काही काम देण्याची विनंती केली. कॅप्टन बुकरकडे आश्चर्याने पहातच राहीला. बुकरचा अवतार म्हणजे अवतारच होता.भुकेने तोंड सुकलले होते.'अरे। इतका लहान आहेस । काय काम करणार तू? गबाळ्या पण आहेस. मला नाही वाटत तू काही काम करुशकशील. चोरीमारी मात्र नक्की करशील.' बुकर अगदी गयावया करुन कॅप्टनचे मन वळवण्याचा प्रयत्न करु लागला. ' साहेब मला काहीतरी काम द्याच. मी अगदी मनापासून करीन. मी काही चोर नाही. हॅम्पटनचे शाळेत शिकण्याकरीता जात आहे. आपण मला काम देऊन मदत केली तर खूप उपकार
होतील. थोडे पैसे जमा झाले की मी हॅम्पटनला जाऊन शाळेत प्रवेश घेऊ शकेन. मला काही तरी काम द्याच. नाही म्हणु नका.' कॅप्टनला बुकरची दया आली. थोडेसे पैसे देऊन बुकरला आधी काहीतरी खाऊन येण्यास सांगीतले. खर तर कॅप्टनने बुकरची परिक्षाच घेतली होती. कॅप्टनला वाटले होते की हातात पैसे पडले की पोरगा कसला पुनः परत येतो. थोड्याच वेळात बुकर पुनः हजर झाल्याचे पहून कॅप्टन आश्चर्यचकित झाला. बुकरवर त्याचा विश्वास बसला. बुकरला जरा हलकेसेच काम मिळाले. अंधार पडेपर्यंत बुकरने अगदी मन लाऊन काम केले. शेवटी कॅप्टननेच त्याला काम थांबवण्याचा हुकुम दिला थोडे पैसे पुनः दिले आणि जमेल तेव्हढे दिवस कामावर येण्यास सांगीतले. बुकरने कॅप्टनचे मनापासून आभार मानले. मिळालेल्या पैशातले निम्मे पैसे एका पुरचुंडीत बांधून पोत्यात ठेवले आणि माल्डेन सोडल्यापासुन पहिल्यांदाच अगदी पोटभर जेवला. कालचेच दुकान बंद झाल्यावर पायरीखाली पथारी पसरली. दिवसभर केलेल्या कामामुळे आणि पोट पण चांगले भरले असल्यामुळे बुकरला अगदी गाढ झोप लागली. सकाळी उठून हात,पाय,तोंड धूऊन थोडेसे खाऊन बुकर पुनः कामाला लागला. रात्री दुकानाच्या पायरी खाली झोपणे आणि सकाळपासून संध्याकाळपर्यंत काम करणे हा बुकरचा परिपाठच झाला. त्या दुकानच्या पायरीचे आणि

बुकरचे काय नाते जडले होते कोण जाणे पण बुकर पुढे मोठ्यापदावार पोहचल्यावर याच गावात गावातील लोकांनी त्याचा मोठा सत्कार केला. सत्काराची जागा दुकानाच्या पायरी जवळच होती . बुकरचे लक्ष सारखे दुकानाच्या पायरीकडेव जात होते आणि ते दिवस आठवत होते.

बुकरला फक्त खाण्याचाच खर्च करावा लागत होता. राहण्याची सोय पायरी करीत होती. कॅप्टन देखील बुकरचे मन लाऊन काम करणे पाहून जास्ती पैसे देत होता. थोड्याच दिवसात बुकरजवळ हॅम्पटनला जाण्याइतके पैसे जमले. बुकरने कॅप्टनला भेटून रजा मागीतली.मोठ्या मनाने मदत केल्याबद्दल आभार मानले . बुकरजवळ आता थोडे पैसे होते शिवाय त्याला कधी एकदा हॅम्पटनला जाऊन शाळेत दाखल होतो असे झाले होते. ताबडतोब रेल्वेस्टेशन वर जाऊन हॅम्पटनचे गाडीत बसला.

यथावकाश बुकर हॅम्पटनला येऊन पोहोचला. जरा सुद्धा वेळ न दवडता बुकरने शाळा कुठे आहे ते शोधून काढली आणि शाळेजवळ येऊन पोहोचला. शाळेची इमारत पाहुन बुकर खुश झाला. केंव्हा एकदा शाळेत दाखल होतो असे त्याला झाले होते. घाई करून चालणार नव्हते. पहिले इंप्रेशनच महत्वाचे असते ना I बुकरने प्रथम विहीर शोधून हात,पाय,तोंड स्वच्छ धुतले. पाण्याने बुट स्वच्छ केले. पोते उघडून कोणते कपडे घालावे याचा विचार करु लागला. एक बऱ्यापैकी शर्ट होता.जरा ढगळ आणि लांब होता पण पँट मधे खोचला तर चालण्यासारखा होता. बऱ्यापैकी एक पँट मिळाली. खूप लांब होती. खालुन दुमडली तर चालण्यासारखी होती पण जरा चालले की दुमड मोडत होती. काय कराव बर। युक्ती सुचली . इकडेतीकडे फिरून बुकरने काही ताराचे तुकडे गोळा केले. पँट दुमडून तारांनी दुमड पक्की केली. एकदोन उड्या मारून दुमड तपासली. दुमडत उलगडत नव्हती. चला जामजामीना तर झाला. आता फक्त शाळेत जाऊन प्रवेश घेण्याचेच बाकी राहीले होते. रुबाबात बुकर शाळेच्या मुख्याध्यापिकेपुढे जाऊन उभा राहीला आणि शाळेत प्रवेश देण्याची विनंती केली. शाळेच्या मुख्याध्यापिका मिस मेरी मॅकी नांवाच्या इंग्रज बाई होत्या. बुकरचा अवतार पाहून तर त्या चक्राऊनच गेल्या. बुकरला जरी वाटत होते की तो अगदी व्यवस्थीत पोषाख करून आला होता तरी त्याचा अवतार शाळेच्या द्रीष्टीने गबाळाच होता. ओल्या बुटावर माती जमली होती. शर्ट बाहेर

आला होता. पँट तर अगदी सुटते की काय अशी दिसत होती. आणि लहान किती होता. काय कराव ते मॅकीबाईंना सुचत नव्हते. थोडा विचार करण्यास वेळ मिळावा म्हणून त्यांनी बुकरला बाजुला थांबण्यास सांगीतले. ईतर काम आटोपल्यावर त्यांनी बुकरकडे पाहिले. पोरगा आशाळभुतपणे त्यांचेकडे पहात होता. गबाळा असला तरी होतकरु वाटत होता. डोळ्यात हुशारीची चमक होती. प्रमाणिक वाटत होता. मॅकीबाईनी बुकरची परिक्षा घ्यावयाचे ठरविले. ' काय म्हणालास नांव तुझे. ? बुकर नाही का ? हे बघ बुकर ही बाजुची खोली खूप घाण झाली आहे. मी जरा जाऊन येते तोपर्यंत तू ही खोली स्वच्छ करून ठेव. मग तुझे प्रवेशाचे बघु. कोपऱ्यात झाडु आणि फडकी आहेत ती वापर. पाहु तू खोली कशी स्वच्छ करतोस ते। ' . बुकरला कळून चुकले की या खोली स्वच्छ करण्यावरच त्याचा प्रवेश अवलंबून होता. साफसुफ करण्यात त्याला रफनरबाईंनी तरबेज केले होते. मनातल्या मनात बुकरने रफनरबाईंचे स्मरण करून आभार मानले आणि कामाला सुरवात केली.

प्रथम बुकरने खोलीतले सर्व फर्निचर खोलीच्या मधे गोळा केले. सर्व भिंती जमीन मनलाऊन स्वच्छ केल्या. अगदी तीनतीनदा स्वच्छ केल्या जरा देखील कुठे धुळीचा कण राहु दिला नाही. मग सर्व फर्निचर जागच्या जागी लावले . सर्व फर्निचर घासून पुसुन नव्यासारखे दिसेल असे स्वच्छ केले . केलेल्या कामावर एकदा नजर टाकली. काम छानच झाले होते. बुकरची छाती धडधडत होती. मॅकीबाईंना काम पसंत पडते की नाही या विचाराने तो अगदी बैचेन झाला होता. थोड्यावेळाने मॅकीबाई आल्या. खोलीचे बदललेले रुप पाहुन त्या चकितच झाल्या. खरच खोली अगदी मस्त दिसत होती. फर्निचर पण चकाकत होते. खात्री करण्याकरीता बाईंनी टेबलावरुन हात फिरवून पाहिला. धुळीचा मागमुस नव्हता. बाई खुश झाल्या. बुकरच्या पाठीवर थोपटुन म्हणाल्या, ' चश तुझ्या प्रवेशाचे काम उरकुन टाकु.' बुकरचा आपल्या कानावर विश्वासच बसला नाही. तो आश्चर्याने मॅकी बाईंकडे पहातच राहीला. ' अरे असा पहात काय बसला. चल ऑफीसमधे जाऊन तुझे प्रवेशाचे काम उरकुन टाकु.' बाईंना बुकरचा आनंद पाहुन मजा वाटली. मुलाला शिकण्याचे खरच आवड आहे हे त्यांना जाणवले. पोरगा अगदी गरीब आहे. फी वगैरे काही देणार नाही हे स्पष्टच दिसत होते तरी त्या बुकरला म्हणाल्या, ' फीचे पैसे आणले आहेसना ? पाहु किती पैसे आहेत तुझ्याजवळ ते ?.' बुकरने

होतनव्हते तेवढे पैसे बाईंच्या टेबलावर ठेवले आणि मान खाली घालून उभा राहीला. फी करता प्रवेश अडणार असे त्याला वाटु लागले. बाईंना बुकरची कीव आली. जास्त ताणून न धरता त्या म्हणाल्या, ‘ बुकर तुझे नांव शाळेत दाखल केले आहे. आजपासून तू पहिल्या वर्गात बस. तुला फी वगैरे काही पडणार नाही पण तुला काम करावे लागेल. रहाण्याची आणि  जेवण्याची पण सोय होईल.’

बुकरला इतका  आनंद झाला  की तो कुठे आहे हे विसरून जोराने ओरडत नाचावयाला लागला. मॅकी बाईंना पण त्याची मजा वाटली. ‘ अरे हो। हो। किती नाचशील आता. आणि ओरडु नकोस नाहीतर लोक गोळा होतील ’ बाई म्हणाल्या. ‘ बर चल  आता तुला तुझा वर्ग दाखवते आणि तुझी राहण्याची खोली पण पाहुन घे.‘ बुकर गोरामोरा होऊन खाली मान घालून ऊभा राहिला. आपण अगदी वेड्यासारखे  वागलो याची त्याला लाज वाटु लागली. बाई बुकरकडे मोठ्या कौतुकाने पहात होत्या. शाळेत प्रवेश मिळाला म्हणून आनंदाने नाचणारा मुलगा त्या प्रथमच पहात होत्या. त्या बुकरला वर्गामधे नेऊन बसवणार होत्या. बुकरकडे पाहिल्या नंतर त्यांनी आपला विचार बदलला. बुकरचा अवतार पाहून त्यांचे देखील बुकर बद्दल काही चांगले मत झाले नव्हते. आहे तशा बुकरला वर्गात नेले तर कदाचित वर्गशिक्षकांचे बुकर  बद्दल वाईट मत होण्याची शक्यता होती.

बाई म्हणाल्या, ‘ बुकर । आता जेवणाची सुटी होणारच आहे,  तुझ्याजवळ थोडे पैसे आहेत. मी पण तुला थोडे पैसे उसने देते. माझे काही काम करून तू पैशाची परतफेड कर. आता आधी तू गावात जा. डोक्यावर हे जंगल वाढले आहेना ते सलुनमधे जाऊन कापून ये. तसेच येताना एक बऱ्यापैकी पँट, शर्ट, साबण आणि  टुथ ब्रश   घेऊन ये. खोलीवर जाऊन स्वच्छ आंघोळ कर.मग ऑफिसमधे ये. त्यानंतर आपण तुझ्या वर्गाकडे जाऊ. ’ बाईंनी जवळचे थोडे पैसे बुकरला दिले. बुकरला  रडेच कोसळले. त्याच्या पाठीवर थोपटल्यासाखे करून बुकरची रवानगी केली. बराच वेळ त्या बुकरच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहात होत्या.

बाईंनी सांगीतल्या प्रमाणे कटिंग करून आंघोळ करून आणि नवीन कपडे घालुन बुकर बाईसमोर उभा राहीला. बुकरमध्ये झालेला बदल पाहुन बाई पहातच राहिल्या. मेहनीतीची कामे करून मुळातच धष्टपुष्ट असलला  बुकर अगदी स्मार्ट दिसत होता. मोठ्या आनंदाने बाई बुकरला त्याच्या

वर्गाकडे घेऊन गेल्या. कित्येक वर्षापासून जोपासलल्लो बुकरचे स्वप्न आज पूर्ण झाले होते. बुकर खरोखरच्या शाळेत दाखल झाला होता. चांगले कपडे घालून वर्गात बसणार होता. चांगले शिक्षक शिकवणार होते. पुस्तकांवरून अभ्यास करावा लागणार होता. अभ्यास केला नाही तर छडी पण खावी लागणार होती . या सर्व गोष्टिंचा बुकरला खूप आनंद होत होता. मॅकी बाईंनी वर्गशिक्षकांना बुकरची माहिती दिली. बुकरकडे पाहून शिक्षिकेला बरे वाटले. चांगला स्मार्ट दिसत होताना बुकर. बुकरच्या वर्गात बरीच मुले होती. अर्थात सर्व निग्रोच होती. काही १०-१२ वर्षाची होती तर काही ७५ वर्षाचे वृद्ध पण होते. एकजात सर्व विद्यार्थी शिकण्याकरीता आसुसलेले दिसत होते. बुकरचा शाळेतील पहिला दिवस संपला. मॅकीबाईंनी बुकरला पुनः ऑफिसमध्ये बोलावून घेतले . बुकरला शाळेत काय काय काम करावे लागेल ते समजाऊन सांगीतले. सर्व काम नीट आणि वेळेवर झाले पाहिजे अशी ताकीद दिली.

सर्व मुलांची राहण्याची सोय मोठ मोठया खोल्यात करण्यात आली होती. एका खालीत ७-८ मुले असत. झोपायला एक पलंग गादी ऊशा अभ्रे आणि चादरी असत. अशा प्रकारे झोपण्याचा बुकरला काही अनुभव नव्हता. दोन चादरींचे काय करावयाचे ते समजत नव्हते. पहिल्या दिवशी दोनीही चादरी पांघरून तो झोपला. इतर मुले त्याची थट्टा करु लागले. दुसऱ्या दिवशी दोनीही चादरी गादीवर घालून झोपला तरी खोलीतली मुले त्याला हासतच होती. मग बुकरने मजा केली इतर मुले झोपण्याच्या तयारीला लागली तसा तो अभ्यासाकरीता ऑफिसकडे गेला. बुकर नाही असे पाहुन बुकरची फजिती करण्याकरीता मलांनी आपली हंतरुणे तयार केली . बुकर चोरून सर्व पहातच होता. अभ्यास संपल्यावर बुकरने एक चादर गादीवर हंतरुन आणि दुसरी चादर पांघरूण म्हणून घेतली. मग काही मुलांना बुकरची थट्टा करता आली नाही.

बुकरचा शाळेतील दिनक्रम सुरु झाला. बुकरला पहाटे ४ वाजता उठावे लागत असे. स्वतःचे सर्व आवरून स्वयंपाक घरातील चुली पेटवून ठेवायच्या असत. नंतर सर्व शाळेच्या खोल्या झाडून स्वच्छ करावयाच्या. सर्व डेस्क आीण बाके पुसुन ठेवायची. शिक्षिकेची खुर्ची आणि टेबल पुसुन ठेवायचे. नंतर मॅकीबाईंचे ऑफिस झाडून पुसून स्वच्छ करावयाचे. पिण्याचे पाणी भरून ठेवावयाचे .

हे सर्व होईतो सकाळचे ८ वाजलेले असत. मग नाश्ता करून शेतावर कामाला जावयाचे. १-२ तास शेतावर काम केले की आंघोळ करून वर्गात हजर. दुपारची जेवणची सुटी की पुनः वर्ग सायंकाळी ५ पर्यंत असत. इतर मुले थोडा वेळ खेळून मग आपआपल्या खोल्यात रात्रीच्या जेवणाचे वेळेपर्यंत आराम करीत असत. बुकरला मात्र वर्ग संपला की लगेच कामाला लागावे लागे. आचाऱ्याला संध्याकाळच्या जेवणाची तयारी करून द्यायची असे. चुलीकरता लाकडे आणून ठेवायची असत. भाज्या चीरून द्यावयच्या असत. हे सर्व होईतो जेवणाची वेळ झालेली असे. जेवण झाले की बुकरला आचाऱ्याला आवराअवर करण्यास मदत करावी लागे. चुली वगैरे पुसून साफ करावयाच्या असत. दुसऱ्या दिवशीच्या नाश्त्याची तयारी करून ठेवायची असे. हे सर्व होईतो रात्रीचे १० वाजत की झोपण्याची घंटा होई. इतके काम असले तरी बुकरला त्याचे काहीच वाटत नसे. एक तर त्याला कष्टाची सवय होतीच आणि काहीही खर्च न करीता शिकावयाला मिळत होते. बुकर अगदी आनंदात होता. एकच अडचण होती. कामामुळे बुकरला अभ्यास करावयाला वेळ मिळत नव्हता. बुकरने ही अडचण मॅकी बाईंना सांगीतली. मॅकीबाईंनी थोडा विचार केला आणि पुनः बुकरची परिक्षा घेण्याचे ठरवीले. त्या म्हणाल्या , ‘ हे बघ तू काम करण्याचे कबुल केले म्हणून तुला फी वगैरे माफ केली आहे. आता अभ्यास कधी आणि कुठे करावयाचा हे तुझे तुच ठरव. ’ हिरमुसला होऊन बुकर खोलीकडे निघाला. येता येता त्याला दिसले की शाळेच्या प्रवेश द्वाराजवळ एक दिवा लागलेला असतो. बुकर पळत पळत खोलीत गेला आणि आपली पुस्तके घेऊन त्या दिव्याखाली अभ्यासाला बसला. लांबून मॅकीबाई बुकरची धावपळ पहात होत्या . समाधानाने त्यांच्या डोळ्यात पाणी आले. बुकरने त्यांचा विश्वास सार्थ ठरवीला होता. असा सकाळी ४ ते रात्री जवळपास १२ वाजेपर्यंत बुकरचा दिवस जात असे. निवांत अभ्यास होत असल्यामुळे बुकर वर्गात सर्वांचे पुढेच असे. आचाऱ्यापासून ते मॅकीबाई पर्यंत सर्व बुकरवर अगदी खुष होते.बुकरची आणखी एक अडचण होती. त्याला कपड्याचा एकच जोड होता. तोच रोज रात्री धऊन पुनः सकाळी घालावा लागत असे. शाळेचे मुख्य जनरल आर्मस्ट्रांग यांना शाळेतील विद्यार्थ्यांच्या आर्थिक परीस्थिची कल्पना होती. सधन गोरे आणि काळे यांना भेटून ते शाळे करीता देणग्या मिळवत असत. यात कपडे, रोज लागणाऱ्या वस्तु यांचा पण समावेश असे.

अशाच देणगीतून बुकरला कपड्याचा दुसरा जोड मिळाला.एवढेच नव्हे तर बुकरकरीता एका श्रीमंत इंग्रज गृहस्थाकडून शाळेची फी पण मिळवली.  बुकरला जनरल आर्मस्ट्रांग आवडत असत. तसे ते शिस्तीच्या बाबतीत फार कडक होते. कपडे, बुट स्वच्छ नसले की शिक्षा झालीच म्हणुन समजावे.

अशा या जनरल आर्मस्ट्रांग बद्दल विद्यार्थ्यांना खूप आदर होता,  प्रेम होते. जनरल सांगतील ते काम विद्यार्थी मनापासून करीत. बुकरला तर त्यांच्याशिवाय आयुष्यभर दुसरे इतके प्रभावी व्यक्तीमत्व आढळले नाही. त्याच्या शेवटच्या दिवसात ते बुकरकडे येऊन राहीले  होते. त्यांची सेवा करण्यात बुकरला मनापासून आनंद होत असे. बुकरलाच काय पण शाळेतील सर्वच  विद्यार्थी  जनरलांच्या एका शब्दाकरीता काहीही करावयाला तयार असत. हॅम्पटनची शाळा काही फार मोठी नव्हती पण तीची प्रसिद्धी फार दूरवर पसरली होती आणि शाळेत प्रवेश मिळवण्याकरीता रीघ लागली होती. जागा अपुरी असल्यामुळे बऱ्याच जणांना प्रवेश नाकारावा लागत होता. जनरलना याचे वाईट वाटत असे. या वर उपाय म्हणून त्यांनी एक योजना मुलांसमोर मांडली. मुलांना जागेची अडचण समजाऊन सांगीतली. काही मुले जर, विशेषतः मोठी मुले शाळेच्या मैदानात तंबुमध्ये राहण्यास तयार असतील तर आणखी काही मुलांना शाळेत प्रवेश देता येईल. तर जी मुले तंबुत राहण्यास तयार असतील त्यांना हात वर करण्यास सांगीतले. एकजात सर्व मुलांचे हात वर झाले. अर्थात त्यात बुकर होताच. जनरलना आनंद झाला. मैदानात तंबु लावले गेले आणि मुले राहावयाला पण गेली. रात्री जनरल जातीने फेरफटका मारून मुलांची चौकशी करीत असत. एका रात्री कडाक्याची थंडी पडली होती . वारा सुसाट सुटला होता.   जनरल रात्री फेरफटका मारण्यास बाहेर पडले. पाहतात तो काय बरेच तंबु वाऱ्याने उडून गेले होते. सर्व मुले जागेवर असलेल्या तंबुत एकमेकांना बिलगून झोपले होते. जनरलांच्या डोळ्यात पाणी आले. काही न बोलता ते परत गेले. दुसऱ्या दिवशी त्यांनी मुलांना रात्री थंडी वाजली का विचारले तर मुलांनी मस्त मजेत गाढ झोपलो होतो असे सांगीतले. असे मुलांचे जनरलांवर प्रेम होते.  अशा प्रकारे बुकरचे शाळेतले पहिले वर्ष संपत आले. शाळेला आता सुट्या लागणार होत्या. सगळी मुले आपआपल्या घरी जाणार होती. बुकरला घरची ओढ लागली होती. केंव्हा एकदा आईला भेटतो असे त्याला झाले होते. प्रवासाकरीता पैसे हवे होते. आपल्या मित्रांना बुकरने

अडचण सांगीतली असती तर मित्रांनी जरूर मदत केली असती . मित्रांचे त्याच्यावर येवढे प्रेम होतेच. बुकरला मात्र मित्रांकडून पैसे घेणे अजिबात आवडले नाही. एकतर सर्व जण सारखेच गरीब होते आणि बुकरच्या मानी स्वभावाला ते रुचत नव्हते. आईची आठवण तर स्वस्थ बसु देत नव्हती. बुकरकडे एक बऱ्यापैकी कोट होता. बुकरने तोच विकण्याचे ठरवीले. रिचमन्ड गावात कोणी कोट विकत घेतो याची बुकरने चौकशी सुरु केली. कसाबसा एक निग्रो कोट घेण्यास तयार झाला पण तो पैसे हप्त्या हप्त्याने देणार होता . बुकरचे काम त्याने भागणार नव्हते. मनावर दगड ठेऊन बुकरने माल्डेनला जाण्याचा विचार सोडून दिला. मग सुटीत करावयाचे तरी काय? बुकरने विचार केला सुटीत काम करून थोडे पैसे मिळवावे. तसे बुकर शाळेचे दहा डॉलर देणे लागत होता. परिक्षा संपता संपताच बुकरने गावातल्या मोनरो नांवाच्या हॉटेलात नोकरी मिळवली.

बुकरला मोनरो हॉटेलात वेटरचे काम मिळाले. पगार काही फार नव्हता पण जेवणाची आणि राहण्याची सोय होती. कोणतेही काम बुकर मन लाऊन करीत असे. थोड्याच दिवसात बुकर वेटरचे कामात तरबेज झाला. त्याला आता खास श्रीमंत गिऱ्हाईकांच्या टेबलावर काम करावयाला नेमले. अशाच एका श्रीमंत माणसाची १० डॉलरची नोट बुकरला खाली पडललगी सापडली. बुकरला आनंद झाला. चला आता आपण शाळेचे देणे सहज फेडु शकु. तो नोट जवळ ठेवणार होता पण त्याला आईचे शब्द आठवले . कुठलीही गोष्ट फुकट घेऊ नकोस. ही नोट फुकट मिळाली होती. बुकरने शांतपणे नोट हॉटेल मालकाला दिली. मालकाने पण काही न बोलता नोट ठेवुन घेतली.

शाळेच्या सुट्या संपल्या. बुकर पुनः शाळेत हजर झाला. काटकसर करून देखील बुकर शाळेचे देणे फेडु शकत नव्हता. बुकर शाळेचे खजिनदार जनरल मार्शल यांना भेटला आणि आपली अडचण सांगीतली. जनरल मार्शलना बुकर आवडत होता. तो शिक्षणा करीता घेत असलेल्या काबाडकष्टाची त्यांना जाणीव होती.बुकरची अडचण त्यांनी दूर केली आणि बुकरचें शाळेचे दुसरे वर्ष सुरु झाले. पुनः सकाळी ४ ते रात्री १२ असा बुकरचा दिनक्रम सुरु झाला. बुकर शाळेत आता चांगला रुळला होता. पुस्तकी शिक्षणाबरोबरच त्याला धंदेशिक्षण पण मिळत होते. शाळेतले गोरे आणि काळे शिक्षक निस्वार्थ बुध्दिने शिकवत असत त्याचा बुकरचे मनावर परिणाम झाला. आता पहाना

नॅथाली लॉर्ड या बाईंनी अभ्यासा व्यतीरिक्त बुकरला बायबल वाचावयाला शिकवले. बुकरने पुढे आयुष्यभर बायबल वाचणे कधी सोडलेनाही. एवढेच नाही तर लॉर्ड बाईंनी बुकरला सभेत बोलावे कसे, बोलताना शब्दावर जोर कसा द्यावा, थांबावे कसे या गोष्टी शिकवल्या. बुकर आपण चांगला वक्ता झालो याचे सारे श्रेय लॉर्डबाईंना देतो. बुकरला भाषण करण्याची, वादविवाद करण्याची इतकी आवड निर्माण झाली की त्याने एक वादिववाद मंडळ स्थापन केले. रोज रात्री जेवणे झाल्यावर झोपण्याची घंटा होईतो हा गृप निरनिराळ्या विषयांवर वादविवाद करीत असे.शेतात काम करताना बुकर आहे त्या जमीनीतून चांगले पिक कसे घ्यावे हे शिकला. खत कधी द्यावे. पाणी किती द्यावे, छाटणी कशी करावी हे सर्व बुकर इथेच शिकला. चांगली डुकरे कशी पोसावी हे इथेच बुकर शिकला. बुकर पुढे कायम डुकरे पाळित असे आणि त्याच्या डुकरांना बक्षिस पण मिळत असे. अशा प्रकारे बुकरचे शाळेतले दुसरे वर्ष पण संपत आले. या सुटीत मात्र बुकरने घरी जाण्याचा ठाम निश्चय केला. आईच्या आठवणीने बुकर तळमळत होता. केंव्हा एकदा आईला भेटतो असे त्याला झाले होते. मोठा भाऊ जॉन याने काही पैसे पााठविले. शिक्षकांनी पण आपणहून मदत केली . बुकर आता सर्वांचा लाडका झाला होता ना । त्याला कोणाकडे पैसे मागावेच लागले नाहीत. बुकर तसे पैसे घेणार नाही हे शिक्षकांना माहित होते. मग शिक्षकांनी एक युक्ती केली. मुद्दामच बुकरला काही काम सांगीतले आणि कामाचा मोबदला म्हणून जरा जास्तच पैसे दिले. बुकरची माल्डेनला जायची तयारी पूर्ण झाली. जवळपास अडीच वर्षांनी बुकर घरी जात होता. जातानाचा प्रवास बरा होता. थेट माल्डेन पर्यंत रेल्वे होती. तिकीटाकरीता पैसे पण होते. बुकरला कधी एकदा घरी पोहोचतो आणि आईला भेटतो असे झाले होते. बुकर येणार याची सर्वांनाच कल्पना होती पण तो कधी येणार हे माहित नव्हते. आताच्या सारखे त्यावेळी फोन करणे, तार पाठवणे काही सोपे नव्हते. बुकरची आई रोज बुकरची वाट पहात बसावयाची. जरा दार वाजले की धावत जाऊन दार उघाडावयाची आणि हिरमुसली होऊन परत फिरावयाची. जॉन आणि अमन्डा आईची खूप थट्टा करावयाचे. खरोखर बुकर आला तेंव्हा मात्र आई दार उघडावयाला गेलीच नाही. अमन्डाने दार उघडले. बुकरला चुपचाप आईला मिठी मारावयाला सांगीतले. आई काहीतरी करीत बसली होती. बुकरने मागुन जाऊन आईच्या गळ्यात हात घातले

आणि जोराने आई करून ओरडला. बुकरला पाहुन आईला काय करु आणि काय नाही असे झाले. थोडा वेळ दोघे नुसतेच एकमेकाला बिलगून बसले होते. हॅम्पटनला गेलला बुकर आणि आता परत आलला बुकर यात खूप फरक पडला होता. मुळातच बुकर चांगला धष्टपुष्ट होताच पण आता चेहऱ्यावर शिक्षणाचे तेज आले होते. चालण्याबोलण्यात सफाई आली होती. आई बुकरकडे कौतुकाने पहात होती. आईचा विश्वास बुकरने सार्थ ठरविला होता. संपूर्ण दिवस आणि रात्रभर सर्वजण नुसते बोलतच होते. बुकरच्या शाळेतल्या गमतीजमती ऐकून सर्व खदाखदा हासत होते तर रिचमन्ड शहरात आपण कसे रात्रभर नुसते धावत होतो हे बुकरने सांगीतल्यावर सगळ्यांच्या डोळ्यात पाणी आले. बुकरच्या आईला तर बुकर करीता काय करु काय नको असे झाले होते. गावातील सगळ्या निग्रोकुटुंबाना पण बुकरचे कौतुक वाटत होते. परक्या गावात शिकावयाला जाणारा बुकर हा पहिला निग्रो मुलगा होता . सर्वांना बुकर करीता काही तरी करावेसे वाटत होते. अडचण एकच होती. मिठाच्या खाणीवर संप सुरु होता. कोणालाच काम नव्हते. साठवलेल्या पैशावरच गुजराण चालली होती. माल्डेन मधील स्वार्थी नेत्यांचे हे नेहमीचेच होते. स्वतःच्या फायद्या करीता खाण मजुरांना संपावर जाण्यास भाग पाडावयाचे. मजुरांना जास्त मजुरीची आशा लावावयाची. भोळे मजुर फसायचे. बिनभोट संपावर जायचे. बचत केलले पैसे असतो घरी बसून राहावयाचे. पैसे संपले की पुनः नाक घासत त्याच मालकाकडे पूर्वीच्याच किंवा त्यापेक्षा कमी मजुरीवर कामाला जावयाचे. सध्या असाच संप सुरु होता. बुकरची देखील या संपामुळे अडचण झाली. त्याचा विचार होता की सुटीमध्ये खाणीवर काम करून थोडे पैसे जमवावे म्हणजे घरी आईजवळ थोडे पैसे ठेवून जाता येईल. पण कसच काय. बुकर शेजारच्या गावात नोकरीकरीता वणवण भटकला. सगळीकडे तेच हाल होते. कुठेच नोकरी मिळत नव्हती. असाच एकदा बुकर रात्रीचा निराश होऊन घरी परतत होता. रात्र खूप झाली होती. बुकर भुकेने आणि चालण्याने थकून गेला होता. रस्त्यात एक रिकामी झोपडी दिसली . रात्र झोपडीतच काढावी असा विचार करून बुकर झोपडीत गाढ झोपी गेला. रात्री त्याला भास झाला की आई त्याला हाक मारते आहे. बुकर दचकून जागा झाला. मोठा भाऊ जॉन त्याला उठवत होता. रात्री आईची तब्बेत अचानक बिघडली आणि त्यातच तिचा अंत झाला होता. जॉन बुकरला

शोधण्याकरीता हिंडत होता. अचानक त्याला बुकर झोपडीत सापडला. आई गेली यावर बुकरचा विश्वासच बसेना. सकाळीच तो आईचा निरोप घेऊन निघाला होता. त्यावेळी आई  तर चांगली होती. पुनः पुनः बुकर जॉनला तेच तेच विचारत होता. कशीबशी जॉनने बुकरची समजुत घातली आणि दोघे घरी आले. आईविणा घर भकास वाटत होते. लहानगी अमन्डा एवढेसे तोंड करून कोपऱ्यात बसली होती. बुकर आल्यावर ती बुकरच्या गळ्यात पडून हमसाहमशी रडु लागली. शेजारी पाजारी जमले होते. मोठ्या माणसांनी पोरांची समजूत घालून आईचा अंत्यविधी उरकला. लहानग्या अमन्डा कडे पाहून बुकरने आपले दुःख आवरले. जॉन मोठा होता पण बुकरला सर्व गोष्टी पहाव्या लागल्या. बुकरला आई गेली ही कल्पनाच सहन होत नव्हती. आईचे अस्तित्व घरात त्याला पदोपदी जाणवत होत. रात्री झोपल्यानंतर त्याला भास व्हायाचा की नेहमीसारखी आई डोक्यावरून हात फिरवत आहे. आई ।आई  करत बुकर दचकून जागा व्हायचा. अमन्डा आणि जॉन पण उठून बसावयाचे. बुकरच्या गळ्यात पडून अमन्डा रडावयला लागायची. बुकरने हॅम्पटनला परत जाण्याचा विचारच सोडून दिला. इथेच राहून काही तरी काम शोधावे आणि घर चालवावे हा विचार बळाऊ लागला.  असाच विचारात करत बसला असताना बुकरला आई अगदी समोर उभी असल्याचा भास झाला. ‘ बुकर कसला विचार करतो आहेस ? हॅम्पटनला शाळेत न जाण्याचा तर विचार करीत नाहीस ना तू पुढे शिकला नाहीस तर मला खूप वाईट वाटेल. माझ्या तुझ्यापासून मोठ्या अपेक्षा आहेत. माझी खात्री होती की तु माझा शब्द मोडणार नाहीस. अरे ही सर्व तात्पुर्ती परिस्थिती आहे. सर्व दिवस काही सारखे नसतात. तू एकदा शिकून मोठा झालास की अमन्डा आणि जॉनच काय पण सर्व निग्रो जमात वर येईल. आम्ही सर्व तुझ्याकडे डोळे लाऊन बसलो आहोत. आमची निराशा करू नकोस. मला दिलेले वचन मोडु नकोस. मी काही कुठे गेले  नाही .   सतत तुझ्याबरोबरच असणार आहे. तू मोठा झाललाा मला पहावयाचा आहे. उठ कसला विचार करु नकोस. सगळ काही नीट होईल. काहीही अडचण येणार नाही. ’ बुकर एकदम खडबडून उठून बसला. बाहेर बुकरला कोणी तरी बोलवत होते. पोस्टमन बुकर करीता तर घेऊन आला होता. मॅकीबाईंची तार होती. आता लवकरच शाळा सुरु होणार होती. शाळेची साफसफाई, रंगरंगोटी करावयाची होती म्हणून बुकरला त्यांनी लवकर बोलावले होते. सोबत

भाड्याकरीता पैसे पण पाठवले होते. या जादा कामाचे बुकरला वेगळे पैसे मिळणार होते. बुकरला आईचे शव्द आठवले. बसल्याच जागी त्याने मनोभावे आईला नमस्कार केला. आईला दिलेले वचन खरे करीन अशी प्रतिज्ञा केली. बुकरची जाण्याची तयारी सुरु झाली. गावातल्या सर्व निग्रो कुटुंबाचा निरोप घेतला. जॉनकडे आणि अमन्डाकडे लक्ष देण्याची विनंती केली. सर्व शेजाऱ्यांनी बुकरला अश्वासन दिले की त्याने इथली कसलीही काळजी करू नये. आपले सर्व लक्ष फक्त शिक्षणावर द्यावे. बुकरने रफनर बाईंचा पण निरोप घेतला. बाईंमुळेच आपल्याला शाळेत प्रवेश मीळु शकला हे आवर्जून सांगीतले. रफनर बाईंना बुकरची प्रगती पाहुन आनंद झाला. त्यांनी पण बुकरला  थोडे पैसे दिले. बुकरचा घरातून पायच निघत नव्हता. लहानग्या अमन्डला सोडून जाणे जीवावर आले होते. अमन्डा लहान असली तरी धीराची होती. तिनेच शेवटी बुकरची समजुत घातली.  थोडे पैसे जॉनकडे ठेवुन बुकरने हॅम्पटनला   प्रस्थान ठेवले.  प्रवासभर बुकरसमोर घराचे चित्र तरळत होते. आई  गेल्यानंतर लहानगी अमन्डाच घरातले सगळे पहात होती.  ती आपल्यापरीने मनापासून प्रयत्न करीत होती तरी पण घराला अगदी कळा  आली होती.संप सुरु असल्यामुळे घरात पैशाची चणचणच होती. अमन्डा, जॉन कसे राहणार, कसे दिवस निभावणार याचाच विचार बुकर करत होता. शेवटी एकदा हॅम्पटन स्टेशन आले . मॅकीबाई बुकरची वाटच पहात होत्या.शाळा सुरु होण्याचे आधी सगळीकडे साफसुफ करावयाची होती. दारे,खिडक्या यांना पालीश करावयाचे होते. भिंतीना सफेदी करावयाची होती. बुकर लागलीच कामाला लागला. मॅकि बाई नुसत्या कामावर देखरेख करत नव्हत्या तर बुकरचे बरोबरीने काम करीत होत्या. खर तर  त्या चांगल्या श्रीमंत घराण्यातून आल्या होत्या. त्यांना निग्रोंबद्दल कळवळा होता . निग्रोंची उन्नती व्हावी या करीता झटणाऱ्या होत्या. दोघांनी मिळून शाळा सुरु होण्याचे आधी सर्व काम आटोपले. बुकरच्या बरोबरीने मॅकीबाईनी खोल्या साफ केल्या, पलंग दुरुस्त केले, फळे रंगवले. इतक्या श्रीमंत घराण्यातून आलेल्या असल्या तरी कोणतेही काम करण्यात त्यांना कमीपणा वाटला नाही.  श्रमाचे माला बुकर येथेच शिकला.   शाळा कशी झकपक दिसत होती. शाळेचे बदललेले स्वरूप पाहुन जनरल आर्मस्ट्रांग खुष झाले. बुकरला पण काम केल्याचे चीज झाले असे वाटले.

बुकरचे आता शाळेचे शेवटचे वर्ष होते. बुकरला नुसते पास व्हवयाचे नव्हते तर उत्तम प्रकारे पास व्हवयाचे होते . बुकरने आपले सगळे लक्ष आता आभ्यासावर केद्रीत केले. सर्व काम आटोपून जो काही वेळ मिळत असे तो वेळ बुकर अभ्यासाकरीता वापरत असे. यथावकाश परिक्षा झाल्या. बुकर नुसता पास झाला नाही तर त्याला पहिला नंबर मिळाला इतकेच नाही तर आतापर्यंत कुणीही मिळवले नव्हते इतके गुण मिळवून एक रेकॉर्ड निर्माण केला. जनरल सकट सर्व शिक्षकांनी बुकरचे मनापासून कौतुक केले. बुकरला घरी तर ताबडतोब जावयाचे होते. घरी जाऊन काय करावयाचे हे काही ठरले नव्हते. बुकरने विचार केला थोडे दिवस इथेच थांबून काही नोकरी वगैरे मिळते का पहावे. थोडी उधार उसनवार करून बुकरने जरा बऱ्यापैकी कपडे केले आणि जवळच्या कनेक्टीकट गावात नोकरी शोधावयाला सुरवात केली. तसा बुकरला पूर्वीचा वेटरच्या कामाचा अनुभव होता. शिक्षणामुळे आत्मविश्वास पण वाढला होता. एका चांगल्या हॉटेलात बुकरला वेटरची नोकरी मिळाली. हॉटेल मालकावर बुकरचा चांगलाच प्रभाव पडला . बुकरला मालकाने श्रीमंत माणसे ज्या टेबलावर बसत असत ते टेबल दिले. एकतर बुकरला वेटरच्या कामाचा सराव राहीला नव्हता आणि अंगावर एकदम मोठी जोखीम पडली. बुकरच्या हातून चुका होऊ लागल्या मग मालकाने बुकरची रवानगी थेट भटार खान्यात केली. बुकरला सुरवातीला वाईट वाटले. कुठलेही काम आपल्याला जमत नाही हे मान्य करणे बुकरच्या स्वभावातच नव्हते. आपले काम संभाळून बुकरने वेटरचे काम शिकून घेतले. पुनः बुकर आपल्या श्रीमंत माणसांचे टेबलावर रुजु झाला.

हाटेलचे काम संभाळून वेळ मिळेल तसा बुकर शाळेत जात असे. पुढे काय करावे, कोणता मार्ग निवडावा याची मॅकीबाई, जनरल, लॉर्ड बाई यांचेशी तो चर्चा करीत असे. बुकरने काय करावे हे ठामपणे कुणीच सांगु शकत नव्हते. एवढे मात्र सगळ्यांना नक्की वाटत होते की बुकरने असली हलकी सलकी नोकरी करण्यात वेळ घालवु नये. एकतर अधिक शिक्षण घ्यावे किंवा आपल्या जमातीसाठी काम करावे. सुटीचा हंगाम संपत आला. हॉटेलमधली गीऱ्हाईकी पण ओसरु लागली . बुकरची नोकरी सुटली. सगळ्यांचा निरोप घेऊन बुकरने माल्डेनला परत जाण्याचे ठरविले.

केवळ तीनच वर्षापूर्वी हॅम्पटनला पायी,भुलेला,शिकण्याचे ओढीने हॅम्पटनला गेलेले बुकर आणि आता माल्डेनला परत जाणारा बुकर यात जमीनअस्मानाचा फरक पडला होता. आज बुकर शिक्षणामुळे प्रगल्भ झाला होता. बोलावे कसे, सभ्यलोकात वावरावे कसे, दुसऱ्यावर आपली छाप पाडावी कशी हे सर्व बुकर चांगला शिकला होता. काही तरी करण्याचे उर्मीने सळसळत होता. निग्रो जमातीकरीता काहीतरी करावे हा त्याचा ठाम निश्चय होता. मॅकीबाई, लॉर्डबाई आणि जनरल यांचे बरोबर झालेल्या चर्चेत बुकरने निग्रोंच्या शिक्षणात लक्ष घालावे असा विचार पुढे आला होता. बऱ्याच विचाराअंती बुकरने शिक्षण क्षेत्रातच पडण्याचे ठरविले. शिक्षणाशिवाय निग्रोजमात वर येणार नाही हे बुकरने बरोबर ओळखले . निग्रो जमातीला सुशिक्षीत करण्यावरच बुकरने आपले लक्ष केंद्रीत केले. याचा श्रीगणेला माल्डेन पासूनच करण्याचे बुकरने ठरविले आणि बुकरच्या दैदिप्यमान कर्तुत्वाची मुहुर्तमेढ माल्डेन येथे रोवली गेली.

## प्रकरण ५वे: माल्डेनच्या शाळा

बुकर माल्डेनला पोहोचला. जॉन आणि अमन्डा यांना खूप आनंद झाला.बुकर परत आल्यामुळे त्यांना नवीन आधार मिळाला. माल्डेनमधील सर्व निग्रोंना खूप आनंद झाला. त्यांच्यातला एक निग्रो मुलगा शिकून सवरून परत आला होता. बुकरला कुठे ठेऊ, कुठे नाही असे सर्वांना झाले होते. बुकरच्या परत येण्याकडे माल्डेनमधील सर्व निग्रो डोळे लाऊन बसले होते. बुकर शिकून परत आला की नक्किच तो आपल्या करीता काहीतरी करील ही त्यांना खात्री होती. बुकरने पण त्यांची अपेक्षा पूर्ण करण्याचा निश्चय केला. बुकर आता काही अगदीच कंगाल नव्हता. हॉटेल मधील नोकरीतून त्याने थोडे पैसे बाजुला टाकले होते. प्रथम त्याने आपले घर थोडे बहुत सावरले. जॉन,अमन्डा यांना नवीन कपडे केले. घरात जरा बऱ्यापैकी सामान आणले. घर आता घरासारखे दिसु लागले. हॅम्पटनच्या शाळेतील शिक्षणाने बुकर एक गोष्ट समजून चुकला होता. निग्रो जमातीला जर आपली उन्नती करून घ्यावयाची असेल, गोऱ्या लोकांचे बरोबरीने समाजात मानाचे स्थान मिळवावयाचे असेल तर शिक्षण आणि काहीतरी कला, हुन्नर,धंदे शिक्षण हे निग्रोंनी मिळवणे आवश्यक होते. बुकरने मग

एक रात्रीची शाळा सुरु केली. दिवसभर मिळेल ते काम करून सर्व गावातील निग्रो, बायका पुरुष दोघेही अगदी ६ वर्षापासून ते ६० वर्षापर्यंतचे सर्व निग्रो बुकरचे शाळेत येऊ लागले. अगदी मन लाऊन अभ्यास करू लागले. सगळ्याचे शिकण्यामागचे उदिष्ट मात्र वेगवेगळे होते. काही निग्रोंना केवळ बायबल वाचता आले की शिक्षण पूर्ण झाले असे वाटत असे. बायबल वाचता आले की इतर निग्रो त्याला मोठा ज्ञानी माणूस समजत. तो धर्मोपदेशक म्हणून सहज काम मिळवु शकत असे. धर्मोपदेशकाला काही अंग मेहनतीचे काम करावे लागत नसे. लोकच त्याचा चरितार्थ चालवत असत. त्याने फक्त लोकांना उपदेश करावयाचा की झाले त्याचे काम. धर्मोपदेशक होण्याकरीता एक नाटक मात्र करावे लागत असे. काय करावयाचे की चर्च मधे बरीच गर्दी असली की धर्मोपदेशक होऊ घातलेला निग्रो एकदम फिट आल्यासारखा जमिनीवर निचेष्ट पडावयाचा. असा प्रकार दोन,तीनदा झाला की लोक म्हणावयाचे की याला प्रभुची आज्ञा झाली आहे. बस एवढे नाटक वटवले की झाला तो धर्मोपदेशक. मग पुढील सर्व आयुष्य काहीही काम न करता निव्वळ लोकांना उपदेश करीत आरामात काढावयाचे.

काही निग्रो असे होते की त्यांना राजकारणात पडावयाचे होते. थोडे बहुत लीहिता, वाचता यावयाला लागले की हे निग्रो वर्तमानपत्रे वगैरे वाचून राजकारणावर लंब्याचौड्या गप्पा मारत. साहजिकच लोकांत त्याचा दबदबा निर्माण होई. लोक त्यांना हुशार पुढारी समजत. अशा पुढारी लोकांना उत्तरेकडील गोरे लोक बरोबर हेरत. उत्तरेकडील गोऱ्यांना दक्षिणेकडील गोऱ्याचा रागच होता.संघराज्याचे निर्मितीच्यावेळीदक्षिणेकडील आणि उत्तरेकडील गोरे यांच्यात तर युध्दच झाले होते. गुलामगिरी गेल्यामुळे दक्षिणेकडील गोऱ्यांचे बरेच नुकसान झाले होते. या आपसातील भांडणामुळे केंद्रातील गोरे लोक अशा चटकन पुढारी झालेल्या निग्रोंना राजकारणात काही थातरुमातुर पदे देत. दक्षिणेकडील गोऱ्यांच्या डोक्यावर आणून बसवत आणी वचपा काढत. राजकारणात, सरकार दरबारी पद असेतो हे निग्रो पुढारी मोठ्या रुबाबात राहत. पद गेले की येरे पुनः माझ्या मागल्या. बुकर

लोकांना शिक्षणाचे महत्व पटवून देण्याकरीता इकडेतिकडे हिंडत होता तेंव्हा त्याला एक मजेदार गोष्ट दिसली. एका ठिकाणी काही गवंडी भिंत बांधत होते. एका निग्रोला ते ' ओ गव्हर्नर रेती जरा चटकन चाळा. वीटा आणा आता. ओ गव्हर्नर आरामात बसु नका काम करा जरा .' हे गव्हर्नर गव्हर्नर प्रकरण काय आहे हे काही बुकरच्या लक्षात येईना. मजुरांकडे चौकशी केली तेंव्हा समजले की हा निग्रो पूर्वी काहीदिवस गव्हर्नर होता. मुदत संपली आणि पुनः मजुराच्या कामाला लागला होता.

काही निग्रो असे होते की त्याना वाटायचे की थोडेबहुत लीहिता वाचता आले की ते दुसऱ्याला पण शिकवु शकतील.म्हणजे लगेच शिक्षक होऊ शकतील . असे काही निग्रो शिक्षक होते देखील . खर तर त्याचे ज्ञान यथातथाच होते. एका शाळेत काही शिक्षक नेमावयाचे होते. बुकर मुलाखती घेत होता. एका उमेदवाराला बुकरने विचारले, ‘ का हो पृथ्वी गोल आहे की सपाट. काय शिकवाल मुलांना ?’ उमेदवार म्हणाला, ‘ तुम्ही म्हणत असाल तर सपाट म्हणून शिकवीन. तुम्ही गोल आहे असे म्हणत असाल तर पृथ्वी गोल आहे असे शिकवीन .’ बुकरने कपाळावर हात मारुन घेतला.

बुकरची हुशारी, भारदस्त व्यक्तीमत्व पाहून काही गोरे बुकरने राजकारणात पडावे अशी धडपड करीत होते. बुकर करीत असलेले निग्रोंना सुशिक्षित करण्याचे प्रयत्न त्यांना खटकत होते. उद्या हे पूर्वीचे गुलाम शिकले, स्वावलंबी झाले तर आपल्याला डोईजड होतील ही त्यांना भिती होती. बुकर राजकारणात पडला, मान मरातब मिळु लागला की आपसुकच निग्रोविषयीचा त्याचा कळवला जाईल असे त्यांना वाटत होते. बुकरने त्यांची ही चाल ओळखली . चांगला खमक्या होता तो. काही लोकांनी बुकरला चर्चचे कामात गुंतवण्याचा प्रयत्न केला. बुकर या सर्व मोहांना पुरुन उरला. निग्रोंना स्वावलंबी आणि सुशिक्षित करण्याचे आपले प्रयत्न त्याने सोडले नाहीत. माल्डेन शिवाय इतर जवळच्या गावात पण बुकरने रात्रीच्या शाळा सुरु केल्या. दिवसाच्या फावल्या वेळात बुकर काही जरा सधन निग्रोंना खाजगी रीत्या शिकवु लागला. बऱ्यापैकी पैसा मिळु लागला. या पुस्तकी शिक्षण देण्यामध्ये बुकर समाधानी नव्हता. निग्रो स्वतःचे पायावर उभे राहीले पाहिजे. त्यांना काही कामधंदा स्वतंत्रपणे करता आला पाहिजे त्याकरीता त्यांना धंदेशिक्षण द्यायला पाहिजे हे त्याला

कळत होते. गुलाम असतांना निग्रो शेतावर काम करीत होते. मालकाच्या कोंबड्या,डुकरे पाळित होते. हे शेतीचे, जनावरे पाळण्याचे काम निग्रोंना जमण्यासारखे होते. फरक एवढाच की आता मालका करीता ते काम करणार नसून स्वतः करीता करणार होते आणि स्वतःची रोजी रोटी स्वतःच मिळवणार होते. बुकर याच करीता गावोगावी हिंडत होता. जेथे जाईल तेथे निग्रोंना स्वच्छ राहण्याकरीता शिकवीत होता. काही काम धंदा शिका म्हणून सांगत होता. माल्डेन मधे आता रात्रीच्या एका शाळेच्या ३-४ शाळा झाल्या होत्या. दिवसाच्या शाळा पण सुरु झाल्या होत्या. खाजगी शिकवण्या होत्याच. बुकर कडे आता थोडे पैसे शिल्लक पडु लागले. बुकरने जॉनला पण हॅम्पटनचे शाळेत शिकण्यास पाठवले. घरची कमालीची गरीबी असताना देखील बुकरच्या आईने जेम्स नांवाच्या एका गरीब मुलाला आश्रय दिला होता. त्याला दत्तकच घेतले होते म्हणा ना. बुकरने त्याला पण हॅम्पटनचे शाळेत शिकावयला पाठवले. माल्डेन मधल्या शाळा, खाजगी शिकवण्या हे सर्व करून बुकर गावोगाव हिंडून भाषणे देत होता. निग्रोंना स्वच्छतेचे धडे देत होता. बुकरचे भाषण फार प्रभावी असे. भाषणाला अलोट गर्दी जमत असे. बुकरचे भाषण सर्व मन लाऊन ऐकत. बुकर निग्रोंचा एक लाडका नेता झाला होता. बुकर सांगेल ते निग्रो करावयाला तयार असत. बुकरची लोकप्रीयता आणि त्याचे वकृत्व यामुळे बुकर कडे एक चांगली संधी चालून आली.

व्हर्जिनीया राज्याची राजधानी माल्डेन येथे होती ती जवळच्या चार्लस्टन येथे करावी असा बऱ्याच गोऱ्यांचा निग्रोंचा पण विचार होता. त्याकरीता जनमत तयार करणे आवश्यक होते. निग्रोंची याला मान्यात मिळवण्याकरीता त्याचे मन वळवू शकेल असा बुकर शिवाय दुसरा कोणी नव्हता. राजधानी बदलण्या करीता सभा होत त्यात भाषण करण्यासाठी बुकरला बोलावले जाऊ लागले. बुकर गोऱ्यांचे बरोबरीने मंचावर बसून भाषणे देऊ लागला. आधीच निग्रोंना बुकर विषयी आदर आणि प्रेम होते त्यात गोरे पण त्याला मंचावर आपल्या बरोबरीने मानाने बसवु लागले यामूळे बुकरचे निग्रोंमधील स्थान फार महत्वाचे झाले. गोऱ्यांना पण बुकरचे महत्व जाणवु लागले. बुकर शिकलेला आहे म्हणून गोरे बुकरला इतका मान देतात हे काळ्या निग्रोंच्या लक्षात आले. आपण देखील शिकले पाहिजे ही भावना निग्रोंमध्ये वाढीला लागली. गोऱ्यांनासुध्दा बुकरचे महत्व जाणवले.

सर्वाच्या एकत्रित प्रयत्नामुळे चार्लस्टन राजधानी झाली. याचे बरेचसे श्रेय बुकरकडेच जाते. गोऱ्यांना देखील हे जाणवले. स्वबळावर, कठोर परिश्रमाने निग्रो आता आपल्या बरोबरीने राहु शकतात. ते चांगले काम करु शकतात. त्याचेवर जबाबदारीची कामे सोपवता येतात याची गोऱ्यांना जाणीव झाली. निग्रो म्हणजे मुळचा गुलाम तो काय काम करु शकणार ही भावना गोऱ्यांचे मनातून उतरत चालली आणि बरेच शिकलेल्या निग्रांनी अधिकाराच्या जागा मिळवल्या. काही सीनेटर्स पण झाले . आपल्या कर्तबगारीने त्यांनी गोऱ्याच्या मनात आदर निर्माण केला. काही गोऱ्या लोकांना मात्र काळ्या निग्रोंची ही प्रगती खुपत होती. निग्रोंनी गोऱ्यांच्या बरोबरीने राजकारणात यावे, जमीनजुमला खरीदावा या सर्व गोष्टी त्यांना जाचत होत्या. एकेकाळचे आमचे गुलाम आमची बरोबरी करतात म्हणजे काय? या भावनेतून कु क्लक्स क्लॅन या दहशतवादी संघटनेची स्थापना करण्यात आली. ही पूर्णपणे आततायी गोऱ्यांची संघटना होती. रात्रीच्या अंधारात पायघोळ पांढरे झगे घालून हे गोरे अतीरेकी जमत आणि कोणत्या काळ्या निग्रोंच्या घरांवर हल्ला करायचा, कोणाची दुकाने जाळून टाकायची, कोणाची शेतीवाडी नष्ट करायची याची आखणी करीत. या काळात दक्षिणेकडील निग्रो जमात घाबरून गेली. पूर्वी पण त्यांनी गुलामीत असतांना याच प्रकाराचा अनुभव घेतला होता. त्याकाळी तरुण गोऱ्या मुलांची टेहाळणी पथके असत. कोणी गुलाम परवानगी न घेता आपला मळा, शेत सोडून दुसऱ्या मळ्यात, शेतात गेला की हे पथक त्या गुलामाला भयानक मारहाण करीत. काळ्या निग्रोंची लहानशी देखील सभा असली तरी त्याला एक तरी गोरा माणूस हजर असणे आवश्यक होते. हे पथक अशा तऱ्हेने काळ्या निग्रोंना काबुत ठेवत असे. आता हेच काम ही नवीन संघटना करीत होती. आता काळ्या निग्रोंना काबुत ठेवणे हा उद्देश नव्हता तर काळ्या निग्रोंची जी प्रगती होत होती ती सहन होत नसल्यामुळे वाईट वृत्तीच्या गोऱ्यांनी चालवलेली अतीरेकी चळवळ होती. या चळवळीला सर्व गोऱ्या लोकांचा मुळिच पाठिंबा नव्हता. काही गोरे तर अशा या संघटनेच्या हल्ल्याचे वेळी निग्रोंच्या संरक्षणाकरीता काळ्यांच्या बाजुने लढत. अशाच एका धुमश्चक्रीत रफनर बाईंचे यजमान मरण पावले. रफनर बाईंनी बुकरला मनापासून मदत केली होती. त्याच्या शिक्षणाला हातभार लावला होता. बुकरला जनरल रफनर यांचे मृत्युने धक्का बसला. रफनर बाईंना भेटुन त्याने त्यांचे सांत्वन

करण्याचा प्रयत्न केला. या कु क्लकस्क क्लॅन संघटनेच्या अतीरेकी कार्यवाहीची केन्द्र सरकारने गंभीर दखल घेतली आणि एक वेगळे कृतीदल स्थापन करून या संघटनेचा अगदी बिमोड केला. थोड्याच दिवसात दक्षिणेत पुनः गोरे आणि काळे यांच्यात सामंजस्याचे वातावरण निर्माण झाले.

जॉन आणि त्यांचा दत्तक भाऊ हॅम्पटनचे शिक्षण पूर्ण करून बुकरचे कामात मदत करण्याकरीता माल्डेनला हजर झाले. बुकरने या दोघांवर शाळांची सर्व जबाबदारी सोपवली . माल्डेन मधे राहून आपण निग्रोंकरीता काही फारसे करू शकणार नाही हे बुकरला जाणवले. या करीता केंद्रसरकारची राजधानी वाशिग्टन येथे जाऊन तेथेच आपला प्रभाव पाडेल असे काही केले पाहिजे असे बुकरला वाटले. राजधानी हलवण्याच्या कर्तुत्वामुळे बुकरची तशी वाशिंगटन मधे थोडी बहुत प्रसिद्धी झाली होतीच. बुकर शाळांच्या व्यापातून थोडा मोकळा झाला होताच. तरी जॉन व जेम्स यांना सर्व समजाऊन बुकरने वाशिंगटनला प्रस्थान ठेवले.

सुरवातीचे काही दिवस बुकरने वाशिगटन मधील महत्वाच्या काळ्या आणि गोऱ्या लोकांना भेटुन तो माल्डेन येथे करत असलेल्या कामाची माहिती दिली. बरीच निग्रोमुले शिक्षणाकरीता वाशिगटन मधे आली होती. त्याना पण बुकर भेटत होता. केन्द्र सरकारने निग्रोंच्या प्रगती करता निग्रो मुलांच्या शिक्षणाकरीता अनेक सवलती जाहीर केल्या होत्या . या सवलतीचा फायदा घेऊन अनेक निग्रो मुले शिक्षण घेत होती. त्यांना देण्यात येत असललो शिक्षण आणि त्या शिक्षणाचा त्यांना होणारा उपयोग यात काही ताळमेळ नव्हता. बरीच निग्रो मुले ग्रीक लॅटीन शिकत होती. या कालबाह्य भाषांचे अवघड व्याकरण घोकत होती . त्याचा त्यांना प्रत्यक्ष व्यवहारात, नोकरी मिळवण्याकरीता काहीही उपयोग होत नव्हता. काही मुले गणीतातील अवघड समीकरणे, प्रमेये, सिध्दांत शिकण्यात वेळ घालवीत होती ज्याचा त्यांना काहीही उपयोग नव्हता. एक मात्र होते. सरकारची भरघोस शिष्यवृत्ती मिळत होती. मोठ्या चैनीत राहता येत होते. कोणेतेही अंगमेहनतीचे काम न करता आरामात जगण्याची सवय जडत होती. शिष्यवृत्ती मिळत होती तो पर्यंत हे सर्व ठीक होते. पण शिक्षण संपले की मिळणारे पैसे बंद होत. रोजच्या खाण्यापिण्याची पंचाईत असे. मग कर्ज काढणे, चोऱ्यामाऱ्या करणे हा उद्योग. पकडले की तुरुंगात रवानगी. निग्रो मुली अशा परिस्थीत वाईट मार्गाकडे वळत . हे सर्व पाहुन बुकर

गोंधळून गेला. आपण कशा करीता वाश्गिटनला आलो आणि जे  काही पहावयाला मिळाले त्यामुळे बुकर निराश झाला. या निराशेच्या भरात त्याने वाश्गिटन येथील एका धार्मिक शाळेत प्रवेश घेतला. तीथेही त्याचे मन रमेना. काय करावे हे सुचत नव्हते. वाश्गिटन मधली उनाड पोरे पहाता माल्डेनचे विद्यार्थी त्याला सरस वाटु लागले. ते श्रम करून शिकत होते. शिकून परत आपआपल्या गावी जाऊन लोकांना शिकवत होते. जमातीच्या प्रगतीला हातभार लावत होते. बुकरने ठरवीले वाश्गिटन मधे राहुन काही काम होणार नाही. मग तो माल्डेनला परतला. प्रवासात बुकर एकच विचार करीत होता. आता पुढे काय करावयाचे. माल्डेनच्या शाळा जॉन आणि जेम्स चांगल्या प्रकारे चालवत होते. बुकरला काहीच करण्यासारखे नव्हते. पुढे काय काम करावे हे बुकरला  काही सुचत नव्हते. अशा गोंधळलेल्या अवस्थेत बुकर माल्डेनला परत आला .काय योगागयोग पहा माल्डेनला जनरल आर्मस्ट्रांगचे एक पत्र बुकरची वाट पहात होते. जनरलनी बुकरला शाळेच्या पदवीदान समारंभाचा प्रमुख पाहुणा म्हणून बोलावले होते. हॅम्पटनला जायला मिळणार याचा बुकरला आनंद झाला. सर्व जुन्या शिक्षकांना भेटता येईल, जनरल साहेबांशी चर्चा करीता येईल या विचाराने बुकर आनंनदून गेला. बुकरचा भाषणाचा विषय होता , ‘ यशस्वी होण्याचा मार्ग  ’ बुकरने भाषणाची चांगली तयारी केली.  त्याला भाषणाची तयारी वगैरे करावयाची काहीच गरज नव्हती. बुकर स्वतःच जीवनात यशस्वी कसे व्हावे याचे एक मूर्तीमंत चालतेबोलते  उदाहरण होते. माल्डेन ते हॉम्पटन हा बुकरचा प्रवास आरामात झाला. आता तो काही उपाशी तपाशी चालणारा, येणाऱ्याजाणाऱ्या वाहनाकडे आशाळभूत पणे लिफ्ट देईल या आशेने पाहणारा मुलगा नव्हता तर हॅम्पटन शाळेने पदवीदान समारंभाकरीता बोलावलेला एक सन्माननीय पाहुणा होता.केवळ पाचच वर्षात बुकरने एवढी मजल मारली होती.  स्टेशनवर बुकरचे जोरदार स्वागत झाले.

मधल्या काळात हॅम्पटनच्या शाळेची बरीच वाढ झाली होती. नवीन इमारती झाल्या होत्या. नवीन नवीन विषय शिकवले जात होते. शाळेची प्रगती पाहुन बुकरला आनंद झाला.बऱ्याच दिवसांनी जनरल साहेबांना भेटला. पहिल्याच भेटीत जनरल साहेबांनी पुढे काय करवयाचे हा जो प्रश्न बुकर समोर होता तो चटकन सोडवून टाकला. बुकरचे समारंभातले  भाषण उत्तम झाले. कार्यक्रम

संपल्यावर जनरल साहेबांनी बुकरला बोलावून घेतले आणि  एका नवीन कामाची जबाबदारी बुकरवर सोपवली.

हे काम खरच खूप अवघड होते. अमेरिकेतल्या मुळच्या रेड इंडीयन मुलांना शिकवून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम बुकरवर सोपवले होते. हे मुळचे रेड इंडीयन्स अमेरिकन गोऱ्या लोकांचा मनापासून द्वेष करीत असत. त्यांना त्यांच्या मुळ जागेतून गोऱ्यांनी हाकलून लावले होते आणि लांब दूरवर तारेच्या कुंपण असलेल्या तुरुंगा  सारख्या जागेत वसवले होते. अमेरिकन गोऱ्यांची सावली पण आपल्या अंगावर पडु नये अशी त्यांची भावना होती. ते अमेरिकन गोऱ्यांपासून लांबच रहात. हे मूळचे आदिवासी होते आणी त्यांचे वागणे, बोलणे कपडे, खाणे आदिवासी लोकांप्रमाणे होते. इंग्रजी भाषेचा त्यांना गंध नव्हता. सुसंस्कृत समाजातील साध्या साध्या गोष्टी जसे, दात घासणे, आंघोळ करणे, स्वच्छ साधे कपडे वापरणे, अन्न शिजवून खाणे हे सर्व त्यांना माहित नव्हते. त्यांचा पोषाख खाण्याकरीता मारलेल्या जनावराच्या कातड्याचा असे. जनावर मारले की कसेतरी विस्तवावर भाजून खात असत. त्यांची स्वतःची वेगळी भाषा होती. एवढे सर्व असून देखील ते स्वतःला अमेरिकन गोऱ्या पेक्षा श्रेष्ठ समजत. काळ्या निग्रोंचा तर ते अगदी तिरस्कार करीत. अमेरिकन गोऱ्याशी त्यांनी लढत लढत पराभव पत्करला होता. त्यांना शरण गेले नव्हते तर काळे निग्रो गोऱ्यांचे गुलामच बनले होते. काळ्या निग्रोंशी देखील त्यांना संपर्क नकोसा होता. अशा स्वभावाच्या रेडइंडीयन मुलांना बुकरला सुधरावयाचे होते. त्यांना शिकवावयाचे होतो.त्यांना स्वच्छतेचे धडे द्यावयाचे होते. त्यांना इग्रजी भाषा शिकवावयाची होती. त्यांना धंदेशिक्षण द्यावयाचे होते. मुख्य म्हणजे त्यांना माणसात आणावयाचे  होते. जनरल साहेबांनी केन्द्र सरकारकडे पाठपुरावा करून प्रयोग म्हणून १०० मुले मिळवली. त्यांची पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्यांना एका स्वतंत्र इमारतीत ठेवले आणि बुकरवर त्यांची जबाबदारी सोपवली.

आपले काम किती अवघड आहे याची बुकरला पूर्ण कल्पना होती. तो स्वतः एक काळा निग्रो गुलामच होता. त्याच्या हाताखाली वावरण या मुलांना आवडणार नव्हते. सुरवातीला बुकरला खूप त्रास झाला. बुकरने एक सांगीतले की मुले दुसरेच काहीतरी करून ठेवत. भाषेची पण अडचण होती.

अमेरिकन गोऱ्या शत्रुची इंग्रजी भाषा शिकावयाला मुले तयार नव्हती. शाळेने दिलेले कपडे ते वापरावयाला तयार नव्हते. कपडे दिले तर एक तर ते फाडून टाकत असत किंवा फेकून देत असत. काटे, चमचे वापरून टेबलावर बसून शिजवलेले अन्न खाणे त्यांना जमत नसे. त्यांना सुधारण्याच्या प्रयत्नाने बुकर अगदी कंटाळून जात असे. जनरलसाहेबांनी त्याचेवर जी जबाबदारी टाकली होती ती पूर्ण करून त्यांनी टाकलेला विश्वास बुकरा सार्थ ठरवावयाचा होता. थोड्याच दिवसात बुकरने आपल्या मनमीळावु स्वभावाने, प्रसंगी कठोर वागून या मुलांचा विश्वास संपादन केला. मुलांशी संवाद साधण्याकरीता बुकरने त्याची भाषा पण शिकून घेतली. त्याच्याच भाषेत बुकर त्याना समजावत असल्यामुळे बुकर विषयी वाटणारा मुलांचा दुजाभाव ओसरु लागला. मुले आता बुकरशी प्रेमाने वागु लागली. इतकेच काय शाळेतील इतर काळ्या निग्रो मुलांशी आणि गोऱ्या शिक्षकांशी आदराने वागु लागली. आता या मुलांना वेगळ्या इमारतीत इतर निग्रो मुलांपासून दूर ठेवण्याची गरज नव्हती. सर्व मुले एकत्रपणे मिळून मिसळून काम करु लागली. बुकर जनरल साहेबांच्या विश्वासास पात्र ठरला. याचं दरम्यान एक मजेदार गोष्ट घडली. एक रेड इंडीयन मुलगा आजारी पडला. त्याचेवर उपचार करणे हॅम्पटन येथे शक्य नव्हते म्हणून त्याला वाशिग्टनला पाठवण्याचे ठरवीले. त्याला वाशिग्टनला नेऊन संबंधीत अधिकऱ्याच्या हवाली करण्याचे काम बुकरवर पडले. बुकर काळा निग्रो असल्यामुळे त्याला निग्रोंकरीता असलेल्या खास डब्यातून प्रवास करावा लागत होता तर तो रेडइंडीयन मुलगा गोऱ्यांचे डब्यातून प्रवास करीत होता. वाशिंग्टनमधे देखील बुकरला हॉटेलात जागा मिळाली नाही पण तो मुलगा मात्र आरामात हॉटेलात राहु शकला. अमेरिकन गोरे काळ्या निग्रोंना किती तुच्छ लेखीत होते ते पहा. या आदिवासी रेडइंडेयन लोकांबरोबर राहणे त्याना पसंत होते पण काळ्या निग्रोंची सावली पण नको होती. सोपवलेले काम पार पाडून बुकर हॅम्पटनला परतला. दुसरे एक काम बुकरची वाटच पहात होते. बुकरवर सोपवलेले कठीण काम बुकरने उत्तम प्रकारे पार पाडल्यामुळे जनरलसाहेबांना बुकर कोणतेही काम पार पाडीलच याची खात्री वाटली. त्यांनी आता मुलांकरीता रात्रीची शाळा सुरु केली आणि त्याची जबाबदारी बुकरवर टाकली. सुरवातीला शाळेत २०-२५च मुले होती. थोड्याच दिवसात ही संख्या २०० वर पोहोचली. जनरल साहेबांनी मुलांना पैसे खर्च न

करीता शिक्षण घेता येईल अशी एक नवीन पद्धत सुरु केली. रात्रीच्या शाळेतील मुले दिवसा शाळेतच निरनिराळी कामे करीत असत. त्या कामाचा मोबदला म्हणून काही पैसे शाळेत त्यांचे नांवे जमा होत असत. असे दोन वर्ष रात्रीच्या शाळेत शिकले की पुढच्या शिक्षणाचे पैसे शाळेत जमा झालेले असत मग या मुलांना दिवसाच्या शाळेत प्रवेश मिळत असे. हे सर्व उद्योग करीत असतांना बुकर पण स्वतः नवीन नवीन अभ्यासक्रम शिकत होता .बुकरचा स्वतःचा वेळ चांगला जात होता पण त्याला समाधान वाटत नव्हते. तो आपल्या बांधवांन करीता काहीच करत नव्हता.इतर सुशिक्षित निग्रो प्रमाणे एक साधा शिक्षक बनला होता. पुढचा मार्ग दिसत नव्हता.

पण नियतीचे मनात काही दुसरेच होते. नियतीची बुकर कडून फार मोठीअपेक्षा होती आणि त्या पुर्ण होण्याकरीता नियती तशा संधी पण निर्माण करीत होती. अशीच एक चांगली संधी बुकरपुढे चालून आली की ज्यामुळे बुकरच्या पुढच्या अजरामर कार्याचा पाया रचला गेला. अलबामा प्रांतातील काळ्या निग्रो लोकांनी सरकार दरबारी लकडा लावला होता की हॅम्पटनचे धर्तीवर अलबामा प्रांतात निग्रोंकरीता एक शाळा उघडावी. या शाळेला सरकारी अनुदान मिळावे. या खटपटीला यश येऊन अलबामा प्रांता करीता सरकारने शाळा मंजुर केली आणि वार्षिक २००० डॉलर अनुदान पण मंजुर केले. बुकर हॅम्पटनला असतांनाच अलबामा सरकारने जनरल आर्मस्ट्रांग यांना पत्र पाठवून नवीन शाळेकरीता एखादा चांगला गोरा शिक्षक पाठवण्याची विनंती केली. जनरल साहेबांनी कळवले की त्यांचेकडील गोरा शिक्षक काही ते देऊ शकणारा नाही पण त्याचे बरोबरीचा बुकर हा काळा निग्रो शिक्षक पाठवु शकतील. सरकार बुकरच्या नांवाला मान्यता देईल अशी कोणाचीच अपेक्षा नव्हती. बुकरच्या नांवाला मान्यता देणारी अलबामा सरकारची तार जनरल साहेबांना आली आणि सर्वांना आश्चर्याचा सुखद धक्काच बसला. सर्वांनी बुकरचे मनापासून अभिनंदन केले. आता पर्यंत बुकरने जसे प्रत्येक कामात यश मिळवले तसेच या पण कामात बुकरला यल मिळो अशी प्रार्थना केली आणि बुकरला निरोप दिला.

बुकर आता स्वतःच्या जबाबदारीवर नवीन शाळा सुरु करणार होता. या नवीन लाळेचा तो सर्वेसर्वा असणार होता. त्याला आपल्या नवीन नवीन कल्पना राबवण्याची पूर्ण मोकळिक होती.

बुकर मनापासून आनंदून गेला. कधी एकदा माल्डेनला जातो आणि  सर्वांना ही बातमी सांगतो असे बुकरला झाले होते. बुकर येण्याचे आधीच बातमी माल्डेन मधे पोहोचली होती. निग्रोंकरीता खास शाळा मंजुर झाली आणि त्यांचा लाडका बुकर या शाळेचा मुख्य झाला म्हणून सारा निग्रो समाज खुष होता. माल्डेन मधे बुकरचे जोरदार स्वागत झाले. नवीन शाळा जवळच टस्कगी येथे होणार होती. सर्वांचा  निरोप घेऊन मोठ्या अपेक्षा बाळगत बुकरने टस्कगीला प्रस्थान ठेवले. बुकरची अपेक्षा होती की टस्कगी येथे शाळेची सुसज्ज इमारत असेल. शिकवण्या करीता लागणाऱ्या  साधानांची अडचण असणार नाही. बुकर मोठ्या अपेक्षेने आणि उत्साहाने टस्कगी येथे आला पण त्याचा भ्रमनिरास झाला शिकविण्यासाठी लागणारी साधने तर दुरच राहीली . शाळेकरीता जागा देखील नव्हती. सरकारने फक्त शाळा मंजुर केली होती आणि अनुदान देऊ केले होते. इतर काहीच व्यवस्था केली नव्हती. जणु काय सरकारने निग्रोंची परिक्षाच पाहण्याचे ठरवीले होते. बुकर मुळीच डगमगला नाही. मोठ्या निश्चयाने त्याने कामाला सुरवात केली. सर्व निग्रो जमात त्याचेकडे मोठ्या आशेने पहात होती. बुकर नक्किच काहीतरी करुन दाखवील याची त्यांना खात्री होती. सर्व निग्रो जमातीचा भविष्यकाळ बुकरला या कामात यश मिळण्यावर होता. जर बुकरने हाती आलेल्या संधीचे सोने करून दाखवले नसते तर काळे निग्रो नालायक आहेत, त्यांना मिळालेल्या संधीचा फायदा करुन घेता येत नाही सबब यापुढे त्याना आहे तसेच राहु द्यावे नवीन काही करण्याची गरज नाही असे गोरे सांगावयाला मोकळे झाले असते. बुकरला याची पूर्णपणे  जाणीव होती . आपल्यावर केवढी मोठी जबाबदारी येऊन पडली आहे हे तो समजून होता. मोठ्या निश्चयाने तो  कामाला लागला. फक्त निग्रोंच नाही तर सहृदय गोरे पण आपल्याला मदत करतील याचा बुकरला विश्वास होता. बुकरच्या निग्रोंच्या उन्नती करीता केलेल्या महान कार्याची सुरवात झाली.

टस्कगी हे तसे आडवळणाचे गाव होते. एका लहान रेल्वे मार्गाने ते मुख्य रेल्वे मार्गाला जोडले होते. या भागातील जमीन काळीभोर कसदार होती.  निग्रोंची वस्ती पण मोठ्या प्रमाणावर होती. या दोनीही कारणांनी हा भाग अमेरिकेचा काळा पट्टा म्हणून ओळखला जात असे. वर्षानुवर्षे सतत कापसाचे पीक घेत गेल्यामुळे जमीनीचा कस गेला होता. मोठ्या प्रमाणावर जमीन नापिक झाली होती.

घुलामीतून मुक्त झाल्यावर देखील निग्रो लोक इथेच वस्ती करून राहिले होते. लोकांची परिस्थिती फार हलाखीची होती. शेतातून पुरेसे उत्पन्न मिळत नव्हते. निग्रो इतके गरीब होते पण आपल्या गरीबीवर कशी मात करावी याचा ते विचारच करीत नसत. जो काही थोडा फार पैसा मिळत होता तो वाटेल तसा अगदी निरुपयोगी बाबीवर खर्च करीत असत. बहुतेक प्रत्येक निग्रोचे घरात एक शोभीवंत घड्याळ आणि शिवण्याचे मशीन असेच. भले त्यांना घड्याळ समजत नसे की मशीनवर कपडे शिवता येत असत. उपलब्ध साधनांचा उपयोग कसा करावा हे समजत नव्हते. स्वच्छतेची तर नामनीशाणी नव्हती. सकाळी उठले की तोंड वगैरे काही न धुता असेल ते खायला घेऊन घरातला कर्ता माणुस कामाला निघत असे . उरलेसुरले खाऊन बायका पोरे दिवसभर इकडेतिकडे उनाडक्या करण्यात वेळ घालवत असत. घराचे आजुबाजुला मोकळी जागा होती. काही भाजीपाला लावला असता, डुकरे कोंबड्या पाळल्या असत्या तर सर्व कुटुंबाला चागले खाण्यापीण्यास मिळाले असते. रवीवारचा सुटीचा दिवस म्हणजे सर्व कुटुंबाचा चैन करावयाचा दिवस असे. जवळच्या मोठ्या शहरात सर्व कुटुंब खरेदीला जात असे. आता तुटपुंज्या पैशात खरेदी ती काय करणार ? पण नाही सर्व कुटुंब खरेदीला जात असे. खरेदी आटोपली की चर्च मधे जाऊन टिवल्या बावल्या करण्यात अख्खा दिवस घालवत असे. फार वाईट परिस्थिती होती या बिचाऱ्यांची. बुकर आपल्या गावात आला आहे. तो काहीतरी करून आपली हलाखी दूर करील या आशेवर सर्व निग्रो होते. तो शाळा सुरु करणार आहे त्याला सर्व प्रकारची मदत केली पाहिजे अशी सर्वांची भावना होती. गोरे पण बुकरला मदत करावयाला तयार होते. गोरे आणि निग्रो यांच्यात सामंजस्य होते.आता पहाना । गावातले एक दुकान गोऱ्या आणि एका काळ्या निग्रोच्या भागीदारीत होते. गोरे देखील निग्रोंनी पण शिकावे या मताचे होते. अर्थात यात गोऱ्यांचा स्वार्थच होता. नवीन शाळा हॅम्पटनचे धर्तीवर असणार म्हणजे काळे निग्रो धंदे शिक्षणच घेणार. शिकून शाळेतून बाहेर पडल्यावर हे लोक काहीतरी कामधंदाच करणार त्यामुळे राजकीय आणि सामाजीक क्षेत्रात फारशी लुडबुड करणार नाहीत शिवाय सुशिक्षीत कामकरी वर्ग आयताच तयार मिळेल या भावनेने गोरे शाळेच्या विरोधात नव्हते. गोरे लोक फक्त स्वत:चा फायदाच पहातात ही गोष्ट काळ्यांचे मनात खोलवर रुजली होती.त्यामुळे गोरे जे

करतील त्याचे बरोबर विरुद्ध काळे लोक करीत असत. निवडणूकीत ज्या पक्षाला गोरे मत देत त्याचे प्रतिस्पर्ध्याला काळे आपले मत देत.टस्कगी आणि आजुबाजुचे गावात हिंडताना या सर्व गोष्टी बुकरचे ध्यानात आल्या.

सर्वप्रथम बुकरला शाळेकरीता जागा शोधावयाची होती. बराच शोध केल्यावर बुकरला एक जुने मोडकळीस आललो मेथाडिस्ट चर्च मिळाले. हे चर्च मिळवण्यात आणि पुढे शाळा सुरु करण्यात गावातील एक दुकानदार आणि बँकर श्री. कॅम्पबल या गोऱ्या माणसाची मदत झाली. त्याचप्रमाणे लेवीस अॅडाम्स या काळ्या वजनदार माणसाची पण मदत झाली. अॅडाम्स हे देखील आधी एक गुलामच होते. गुलामीत असतांनाचा त्यांनी घोड्याचे खोगीर आणि गाड्या बनवण्याची कला शिकून घेतली होती. गुलामीतून मुक्त झाल्यावर त्यांनी तोच व्यवसाय चालवला होता आणि तो चांगला चालत होता. बुकरला टस्कगीला आणण्यात या दोघांचा फार हातभार लागला होता.

चर्च अगदी मोडकळीस आले होते. छप्पर गळत होते. शाळा सुरु असतांना पाऊस आला की एक मुलगा बुकरचे डोक्यावर छत्री धरून उभा असे. अशा मोडकळीला आलेल्या चर्च मधे बुकरने आपली शाळा सुरु केली. पहिल्या दिवशी फक्त ३० मुलामुलींना प्रवेश देण्यात आला. मुलांच्या बरोबरीने मुली शिकण्यास तयार होत्या. शुरवातीला १५ वर्षाचे वरील आणि ज्यांनी आधी काही शिक्षण घेतले होते अशाच मुलांना प्रवेश देण्याचे ठरवीले.मुलांची निवड करणे कठीण काम होते. शाळेत प्रवेश घेणाऱ्यांची संख्या खूप होती. त्यात १५ पासून ७० वर्षाचे निग्रो होते. काही तर शिक्षकाचे काम केलली निग्रो होते. शेवटी बुकरने मुलांची चाचणी घेण्याचे ठरवीले या चाचणीतल पहिल्या ३० मुलांना प्रवेश मिळाला. काही शिक्षक मात्र चाचणीत पास होऊ शकले नाहीत.या सर्व विद्यार्थ्यानी पूर्वी ग्रीक, लॅटीन, बँकिग या विषयांचा अभ्यास केला होता. व्याकरणाचे कठीण नियम,गणितातली कठीण सूत्रे त्यांना तोंडपाठ होती, पण बे एके बे चे पाढे येत नव्हते. व्याजाचे दर, विनीमयाचे दर हे सर्व माहित होते. एकाही निग्रो कुटुंबाचे बॅकेत खाते मात्र नव्हते. या मुलांना या शिक्षणाचा गर्व होता.त्याचा हा खोटा अभिमान दूर करावयाला बुकरला बराच प्रयास पडल. लवकरच सर्व मले शाळेत रुळली. या मुलांची नांव नोंदणी करीताना एक मजेशीर गोष्ट आढळली. आपल्याला फक्त दोनच अद्याक्षर

असतात. या मुलांना तीन,चार अद्याक्षर होती. ‘ का रे बाबा। ही तीन तीन अद्याक्षर कसली तर मुले सांगत आम्हीच ठेऊन घेतली आहेत जरा नांवाला भारदस्तपणा येतो. याच सुमारास टस्कगीच्या शाळेत ऑलव्हिया डेव्हिडसन नांवाची तरुण शिक्षिका रुजु झाली. ऑलव्हिया ओहिओ प्रांतातली होती. ती इतकी उजळ होती की गोरी म्हणुन सहज खपून गेली असती.लहान असतांनाच दक्षिणेकडच्या राज्यात शिक्षकांची गरज आहे हे तिला कळले होते. प्रथम शिक्षकी पेशाचा चांगला अनुभव घ्यावा म्हणून ती मिसिसीपी राज्यात गेली तिथे तिने शिक्षकी पेशाचा बराच अनुभव घेतला. ही तरुण मुलगी खूप धीट आणि स्वाभिमानी होती. या ठिकाणी नोकरी करीत असतांना एका मुलाला देवी आल्या. सर्व लोक इतके घाबरले की त्याची देखभाल करावयाला कोणीच तयार नव्हते. ऑलव्हियाने न डगमगता त्या मुलाची मनापासून देखभाल केली. मेफीस प्रांतात पिवळ्या आजाराची साथ आली होती. लागलीच आलव्हियाने मेफीसच्या गव्हर्नरला पत्र पाठवून मदतीला येण्याची तयारी दाखवली आणि गेली सुद्धा.दक्षिणेतील अनुभवावरून ऑलव्हियाला कळून चुकले की निग्रोंना केवळ पुस्तकी शिक्षण देऊन चालणार नाही तर त्यांना जोडीला धंदेशिक्षण पण द्यावे लागेल. असे शिक्षण हॅम्पटन शाळेत मिळते हे कळल्यावर तिला हॅम्पटनला जाण्याची इच्छा झाली पण पैशाची अडचण होती. बोस्टन येथील निग्रोंविषयी सहानभुती असणाऱ्या मेरी हेमिंग्वे यांच्या कानावर ऑलव्हियाची अडचण आली. त्यांनी ताबडतोब मदतीचा हात पुढे केला. ऑलव्हियाने हॅम्पटन शाळेचा अभ्यासक्रम पूर्ण केला. तरी पण तिचे अजून पूर्ण समाधान झाले नव्हते. टस्कगीच्या शाळेत रुजु होण्यापूर्वी आपण एक परिपूर्ण शिक्षक असले पाहिजे अशी तिची भावना होती. म्हणूंन मग तिने फ्रॅमिंगहॅम येथील एका शाळेत शिक्षकांकरीता असलेला कोर्स पूर्ण केला. ती इतकी उजळ होती की ती गोरीच आहे असे समजून तिला त्याच शाळेत शिक्षकाची नोकरी पण देऊ केली. ऑलव्हियाला निग्रो समाजाच्या प्रगतीची आस होती. आपली खरी गरज टस्कगी येथेच आहे हे तिने मनोमन जाणले होते आणि मोठ्या मनाने आणि स्वाभिमानपूर्व आपण निग्रोच असल्याचे सांगून नोकरी नाकारली आणि टस्कगीला आली. अशी ही स्वाभिमानी , हुशार आणि निग्रो समाजाविषयी आपुलकी असलेले तरुणी टस्कगीच्या शाळेत रुजु झाल्यामुळे बुकरवरचा कामाचा ताण बराच कमी झाला.

मुलांची मागणी होती की आमचा अभ्यासक्रम ३-४ महीन्यातच पूर्ण करा कारण नंतर आम्हाला शेतीच्या कामावर जायचे आहे. त्यांचे म्हणणे बरोबर होते. काही जण म्हणत होते की लवकर शिक्षण पूर्ण करा म्हणजे आम्हाला चटकन धर्मोपदेशक बनता येईल. अर्थात बुकरने आपल्या पद्धतीनेच शिक्षण चालु ठेवले.

शाळेत मुलांचा अभ्यास सुरु झाला पण तेवढ्याने भागणार नव्हते. बुकरचे ध्येय होते की टस्कगीच्या शाळेतून बाहेर पडलेला विद्यार्थी अगदी स्वावलंबी असला पाहिजे एक चांगला शिक्षक झाला पाहिजे. तो घरी परत गेल्यावर घराला आणि समाजाला आधारभूत झाला पाहिजे. त्याची मनोवृत्ती समाजाला प्रगतीपथावर घेऊन जाण्याची असली पाहिजे.या सर्व गोष्टी करण्याकरीता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष धंदेशिक्षण देणे आवश्यक होते. त्यांना प्रत्यक्ष शेतावर काम करायला लावले पाहिजे होते. या दृष्टिने बुकरचे प्रयत्न सुरु झाले. सर्व विद्यार्थ्यांनी रोज अंघोळ केलीच पाहिजे, ब्रशने दात घासलेच पाहिजे, आपले कपडे, बुट, मोजे स्वतः रोज स्वच्छ केलेच पाहिजे यावर बुकरचा कटाक्ष होता. बरीचशी मुले शेतकरी कुटुंबातून आली होती. त्यांची शेतीशी असलेली नाळ तुटु नये म्हणून बुकर प्रयत्नशील होता पण शेत विकत घेण्याकरीता, धंदेशिक्षण देण्याकरीता लागणारी अवजारे घेण्याकरीता पैसे नव्हते. मुलांची संख्या तर दिवसेंदिवस वाढत होती.

बुकरला कळले की जवळचाच एक शेतकरी आपले अगदी ओसाड शेत आणि त्यावर असलेले एक घर व एक घोड्याची पाग अगदी कमी किमतीत आणि दोन हप्त्याने फक्त पाचशे डॉलरला देण्यास तयार आहे. सुरवातीचे अडीचेशे डॉलर पण जवळ नव्हते काय करावे ते सुचत नव्हते. शेवटी बुकरने हॅम्पटन शाळेचे खजीनदार मार्शल यांचेकडे 2५0 डॉलर उसने देण्याची विनंती केली. नियमाप्रमाणे मार्शल साहेब शाळेच्या पैशातून बुकरला उसने पैसे देऊ शकत नव्हते म्हणून त्यांनी स्वतःच्या पैशातून बुकरला २५० डॉलर पाठवले. बुकरने ताबडतोब जमिनीचा सौदा पूर्ण करून शेत , खुराडे व पाग ताब्यात घेतली. आता उरेले 2५0 डॉलर देणे आणि मार्शलसाहेबांचे 2५0 डॉलर परत करणे या दोन जबाबदाऱ्या बुकरवर होत्या. मुळीच वेळ न घालवता बुकरने नवीन जागेत शाळा हलवण्याचे ठरविले. बुकरला मिळालेल्या जागेवर एक जेवणाचे लहानसे घर, एक मोडकळीस आलेले स्वयंपाकघर आणि

एक घोड्याची पाग होती. थोड्याच दिवसात बुकरने या तिन्ही जागा वापरण्याइतपत स्वच्छ केल्या. घोड्याची पाग शाळेच्या वर्गाकरीता वापरु लागले. ही पाग स्वच्छ करण्याकरीता बुकरने जवळच राहत असलेल्या एका निग्रोला मदत करण्याची विनंती केली होती. त्याने मोठ्या आश्चर्याने विचारले, ‘बुकर ! भर दिवसाउजेडी काय मी हातात झाडु घेऊन पाग साफ करु ?’ अशी निग्रोंची कष्ट न करण्याची वृत्ती होती. बुकरने मुलांचे मदतीनेच सर्व जागा स्वच्छ केल्या. नंतरचे काम होते शेती करणे. त्याकरीता रानटी झाडे तोडावयाची होती, माजलेले तण काढून टाकावयाचे होते. बुकरने विद्यर्थ्यांना हे काम करावयास सांगीतले पण कुणीही पुढे येईना. शेवटी बुकरनेच कुऱ्हाड हातात घेतली आणि सपासप झाडे तोडु लागला. बुकर स्वतःच हे काम करतो आहे हे पाहुन मग मुलांनाच लाज वाटली आणि ती पण बुकरला मदत करु लागली. थोड्याच दिवसात जमीन शेतीकरता योग्य झाली. जवळपास वीस एकर जमीन लागवडीखाली आली.

या काळात ऑलव्हियाबाई काही स्वस्थ बसल्या नव्हत्या. त्यांनी टस्कगीतील घराघरात जाऊन शाळेसाठी काहीतरी मदत देण्याची विनंती केली. बऱ्याच आनंद मेळाव्यांचे आयोजन केले. सर्वांना येईल ते पदार्थ, वीणकामाच्या वस्तु, शिवलेले कपडे विकण्यासाठी देण्याचे आवाहान केले. मेळाव्याला चांगला प्रतीसाद मिळाला. लोकांनी पण चांगली मदत केली. आश्चर्य म्हणजे काळ्या निग्रोलोकांचे बरोबरीने गोऱ्यांनी मदत केली. निग्रो लोक गरीब होते पण बुकर जे काम करीत होता त्याचे महत्व त्यांना पटले होते. ते जमेल तशी मदत करीत होते. कोणी 10 सेंटस तर 20 सेंटस अशी रोख मदत दिली तर कुणी चादरी, कपडे दिले.एक निग्रो माणूस बैलगाडीत एक डुक्कर घेऊन आला आणि शाळेला देऊन टाकले. एका प्रसंगी बुकर अगदी भाराऊन गेला. एक ७० वर्षाची निग्रो बाई बुकरकडे आली आणि म्हणाली, ‘बुकर तुम्ही फार मोठे काम करीत आहात. तुमच्या या शाळेकरीता मी काही रोख रक्कम किंवा मोठी वस्तु देऊ शकत नाही पण माझ्याजवळ सहा अंडी आहेत तीच मी तुम्हाला देते.’ बुकरला पुढे नानाप्रकारची मदत मिळाली पण या सहा अंड्यांची सर कशालाच आली नाही. मदत गोळा करण्याचे काम सुरु करून तीनच महिने होत नाही तो बघता बघता बुकरकडे २५० डॉलर जमले आणि ताबडतोब बुकरने मार्शल साहेबांचे पैसे परत करून टाकले. आणखी थोड्याच

दिवसात असाच प्रयत्न करून बुकर आणि ऑलव्हियाबाईंनी २५० डॉलर जमवले आणि जमिनीची उरलेली रक्कम जमा केली आणि जागा बुकरच्या मालकीची झाली.

बघता बघता ख्रिसमसचा सण जवळ आला. बुकरचा अलबामा प्रांतातला हा पहिलाच ख्रिसमस होता. अलबामात निग्रोंची ख्रिसमस साजरा करण्याची अजब तऱ्हा होती. ख्रिसमसच्या आधी एक आठवडा आणि नंतर बरेच दिवस काहीही काम न करता दारु पिऊन गोंधळ घालण्यात, मारामाऱ्या करण्यात घालवले म्हणजे खरा ख्रिसमस साजरा केला असे त्यांना वाटत असे. या लोकांकडे सण साजरा करण्याकरीता पुरेसे पैसे पण नसत. तरी देखील कर्ज काढून, वस्तु गहाण ठेवून दारु आणीत असत. बुकरने शाळेत नवीन पायंडा पाडण्याचे ठरविले. सर्व विद्यार्थ्यांचे मनावर ख्रिसमसचा खरा अर्थ बिंबवण्याचे ठरविले. ख्रिसमसचे आधीच्या आठवड्यात बुकरने घरोघरी जाऊन शाळेच्या विद्यार्थ्याकडून आणि घरमालकाला मदतीला घेऊन घर आणि आजुबाजुचा परिसर स्वच्छ करवून घेतला. गावातील लोकांना एकत्र करून चर्चमधे प्रार्थना सुरु केल्या. दारु, नाचगाणी यांना फाटा देऊन हा सण अगदी आनंदात घालवला. या सर्व गोष्टी मुलांना आणि गावातील लोकांना नवीनच होत्या पण त्याना त्या आवडल्या. खिसमस साजरा करण्याचा हा प्रकार विद्यार्थ्यांना इतका आवडला की पुढे शाळेतून बाहेर पडल्यानंतर देखील आपआपल्या गावात ते याच प्रकारे ख्रिसमस साजरा करु लागले एका गावी तर ख्रिसमस चे आठवड्यात गावातील सर्व लोकांनी मिळून एका म्हातारीची झोपडी नवीन बांधून दिली. या निग्रोंच्या प्रयोगात गोऱ्यांचा पण सक्रीय सहभाग होता.गोऱ्यांना या कार्यात सहभागी करून घेतल्या मुळे त्यांना पण या शाळेविषयी जिव्हाळा वाटु लागला व ही शाळा आपलीच आहे असे समजु लागले. बुकरने एका गोष्टीची काळजी घेतली होती. शाळा आणि गावकरी , मग ते काळे असोत की गोरे, यांच्यामध्ये सामंजस्य असणे आवश्यक आहे. एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ हे बुकरचे ब्रीदच होते.

जनरल मार्शल साहेबांचे देणे फिटले होते. जमिनीची पण पूर्ण रक्कम देऊन झाली होती. मग बुकरने लागवडीखालील क्षेत्र वाढविण्याचे ठरविले. टस्कगीच्या शाळेची वाढ करणे विद्यार्थ्यांच्या वाढत्या संखेमुळे गरजेचे बनले. नवीन नवीन उद्योगांची सुरवात ही देखील शाळेच्या वाढत्या

गरजेतूनच झाली . विद्यार्थ्यांना खाण्याकरीता भाज्या, फळफळाव, धान्य लागत असे हे सर्व मिळवण्याकरीता शेती वाढु लागली. शेतावर काम करून बऱ्याच मुलांना काहीही खर्च न करीता शिक्षण घेता येऊ लागले. विद्यार्थ्यांची संख्या वाढु लागली. घोड्याची पाग केंव्हाच अपुरी पडु लागली. मग बुकरने शाळेकरीता नवीन इमारत बांधण्याचे ठरविले. नकाशे वगैरे काढून झाले. जवळपास सहा हजार डॉलर खर्च अपेक्षित होता. जवळ एक डॉलर पण नव्हता. बुकरचे हे नवीन इमारत बांधण्याचे विचार कसे कोण जाणे गावकऱ्यांना समजले. फक्त सोळा वर्षापूर्वी गुलाम असलेला एक समाज स्वतःच्या शाळेकरीता इमारत बांधत आहे याचे गोऱ्यांसकट सर्वांना कौतुक होते. सर्व बुकरकडे मोठ्या अपेक्षेने पहात होते. त्यांची अपेक्षापूर्ती करणे हे बुकरचे आणि सर्व निग्रो समाजाचे एकप्रकारचे अग्निदिव्यच होते. समजा बुकर या कामात अयशस्वी झाला तर संपूर्ण निग्रो समाज नालायक आहे, त्यांना कोणतेही काम नीट करता येत नाही या समजुतीवर कायमचा शिक्का बसला असता. का कोण जाणे पण अशी एक समजूत प्रचलीत होती की गोऱ्या माणसाला काय कुठलेही काम सहज करता येते पण तेच काम काळ्या निग्रोला कधीच येणार नाही. यामुळे एखाद्या निग्रो माणसाने, मुलाने, शुल्लक का होईना , एखादे काम चांगल्या प्रकारे पूर्ण केले की सर्वांना आश्चर्य वाटत असे. बुकरची ही अग्निपरिक्षा होती. त्याने हा इमारत बांधण्याचा संकल्प गावकऱ्याच्या आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्यावर सोडला होता आणि गावकरी व विद्यार्थी बुकरचे विश्वासाला पात्र ठरले. टस्कगीत एका गोऱ्या माणसाची लाकडाची वखार होती. त्याने येऊन बुकरला अश्वासन दिले की शाळेकरीता लागणारे सगळे लाकूड तो एक सेंट न घेता पुरवणार होता. बुकरने जमेल तसे पैसे द्यावे. बुकरने त्याला नानाप्रकारे समजाऊन सांगीतले की बाबा माझ्याकडे एक डॉलर पण नाही. तो माणूस आपला हट्ट सोडावयाला तयार नव्हता. शेवटी थोडेसे पैसे जमल्यानंतर लाकूड घ्यायाला बुकर राजी झाला. सगळीकडून मदतीचा ओघ सुरु झाला. एका इंग्रज माणसाने एक आंधळा घोडा शाळेला भेट दिला. टस्कगी शाळेतील हा पहिला प्राणी होता.आज जर तुम्ही टस्कगीला भेट दिली तर तुम्हाला या घोड्याचा सांगाडा पहावयास मिळेल. एका निग्रोने एक चांगले पोसलेले डुक्कर दिले.

जमेल तशी लोक मदत करीत होते. बुकरचा उत्साह वाढला. मग नव्या इमारतीच्या पायाचे खोदकाम सुरु झाले. बुकरसकट सर्व शिक्षक, विद्यार्थी खोदकामात गर्क होते आणि एक महिन्याचे आता पायाचे खोदकाम पूर्ण झाले. एका चांगल्या मुहुर्तावर शाळेची कोनशीला बसवण्याचे ठरविले. त्या दिवशी सगळ्या टस्कगी गावातच नाही तर आजुबाजुच्या गावात उत्साहाला नुसते उधाण आले होते. कोनशिला बसवण्याच्या समारंभाला शिक्षणविभागाचे अधिक्षक मि. थाम्सन आले होते. सर्व गोरे आणि काळे मोठ्या उत्साहात होते. प्रथेप्रमाणे कोनशिलेच्या खाली काही शुभ वस्तु ठेवण्याकरीता गोऱ्यात आणि काळ्या निग्रोत अहमअहमिका लागली होती. एका मोठ्या ध्येयाचा तो हुंकार होता. एक मोठे स्वप्न साकार होणार होते. केवळ सोळा वर्षापूर्वी गुलाम असलेल्या समाजाची आज स्वतःच्या मालकीची एक वास्तु उभी राहणार होती. पूर्वीचे गुलाम आणि पूर्वीचे त्यांचे मालक बरोबरीने या समारंभात भाग घेत होते. हे एक खरोखरच अभूतपूर्व दृष्य होते. बुकर अगदी भाराऊन गेला. हातात घेतलले काम तडीस नेण्याची फार मोठी जबाबदारी बुकरवर होती. आज तो एकटा नव्हता. सर्व गाव, सर्व विद्यार्थी आणि ऑलव्हिया डेव्हिडसन बाई त्याच्या पाठीशी होत्या. टस्कगीतील आणि आजुबाजुच्या गावातील लोकांनी भरपूर मदत केली होती . त्यांचेकडून अधिक मदतीची अपेक्षा करणे योग्य नव्हते. मग डेव्हिडसन बाईंनी आपला मोर्चा उत्तरेकडे वळवीला. अहोरात्र प्रवास करून, नाना ठिकाणी भाषणे देऊन त्यांनी बुकर करीत असलेल्या कामाची महती लोकांना पटवीली. उत्तरेकडील काळ्या आणि गोऱ्यांनी पण सढळ हाताने मदत देण्यास सुरवात केली. हे सर्व असून देखील बुकर कायमचा आर्थिक अडचणीत असावयाचा. कधीकधी तर अगदी बिकट प्रसंग यावयाचा. पण बुकरचा प्रभुवर आणि आपल्या कामावर गाढ विश्वास होता. एकदा एका व्यापाऱ्याला 400 डॉलर द्यायच वायदा होता. दिलेला शब्द पाळणे हे बुकरचे ब्रीद होते जवळ एक सेंट पण नव्हता. सकाळी पोस्टाची डाक आली आणि त्यात डेव्हिडसन बााईंनी पाठवलेला बरोबर 400 डॉलरचा चेक होता. असे अनेक प्रसंग येत गेले. ज्यावेळी बुकरवर अगदी हताश होण्याची वेळ आली त्या त्यावेळी अगदी अचानक कुठुनतरी मदतीचा हात पुढे झाला. एकदा तर जनरल आर्मस्ट्रांग यांनी आपली सर्व शिल्लक बुकरकडे पाठवून दिली. कॅम्पबेल साहेबांनी बुकरला एक गोष्ट सांगितली होती, ‘ बुकर ! बाजारातील पत हे एक फार

मोठे भांडवल आहे. कधीही आपली पत घालवु नकोस. ' बुकरने या उपदेशाचे अगदी कसोशीने पालन केले. कधीही त्याने दिलेला वायदा चुकवला नाही.

इमारतीचे काम सुरु करण्याइतका पैसा जमा झाला होता. पायाचे खोदकाम पूर्ण झाले होते आता भिंती उभारण्याचे काम सुरु करायचे होते. आता गरज होती विटांची आणि गवंड्यांची. गरजेतूनच टस्कगीतील धंदेशिक्षण सुरु झाले याचाच इथे पुनः प्रत्यय आला. विटा शाळेतील मुलांकडूनच करून घेण्याचे आणि बांधकाम पण मुलांकडूनच करून घेण्याचे बुकरने ठरविले. या निमित्ताने मुले विटा करण्यास आणि गवंडीकाम करण्यास शिकतील हा त्याच्या मागचा मूळ उद्देश होता. बऱ्याच जणांना हा विचार हास्यास्पद वाटला. बुकर आपल्या निश्चयावर पक्का होता. विटांची भट्‌टी तीन वेळा फसली. चौथ्यावेळी बुकरने आपल्या हातातील घड्याळ विकले आणि भट्‌टीकरीता सामान आणले. आता यावेळी मात्र भट्‌टी छान जमली . बुकरचे घड्याळ गेले पण विद्यार्थ्यांना विटा करण्याचे कौशल्य आले. विटा आता इतक्या चांगल्या तयार होऊ लागल्या की टस्कगी शाळेच्या विटांना इतरत्र मागणी येऊ लागली. शाळेला पैसे मिळवण्याचा आणखी एक मार्ग मिळाला आणि शाळेतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना एक चांगला धंदा मिळाला. टस्कगी शाळेचे विद्यार्थी जेथे जेथे गेले आणि विटा तयार करण्याचा उद्योग सुरु केला तेथे तेथे त्यांना कळून चुकले की ते समाजाची काहीतरी मागणी पुरी करीत आहेत. सर्व काळे आणि गोरे या मुलांवर लहानशा गोष्टीकरीता का होईना अवलंबून होते. काळे आणि गोरे यांच्यात बरोबरीच्या नात्याने व्यवहार होत होते आणि हे सामंजस्याच्या वाढीला पोषक होते.

विटा तयार करण्याचे काम जमले तसेच गवंडीकाम पण जमु लागले. या विद्यार्थ्यांनी बांधलेल्या पहिल्याच इमारतीचे काम अगदी कसलेल्या गवंड्याच्या तोडीचे नसले तरी छान होते. मुलांना हा पण एक नवीन अनुभव मिळाला. त्यांना गवंडी काम येऊ लागले. श्रमाची प्रतिष्ठा आणि महत्व यांना कळले. शाळेतील मुले गवंडी कामात इतकी तरबेज झाली की शाळेच्या सर्वच म्हणजे ३५ इमारती मुलांनीच बांधल्या. या इमारती मुलांनी स्वतःच्या हातानी बांधल्या होत्या. त्या त्यांना आपल्या वाटत होत्या. त्या चांगल्या आणि स्वच्छ ठेवण्याकरीता त्यांना कुणी सांगावे लागले नाही. कुणी कचरा

करतांना दिसला किंवा कुणी भिंतीवर रेघोट्या मारताना दिसला की एखादा जुना विद्यार्थी लागेच दटावीत असे. टस्कगीची शाळा आता टस्कगी गावातील आणि अजुबाजुच्या गावांची विटांची आणि गवंड्याची गरज भागवु लागली. यामुळे शाळेचे आणि गावकऱ्यांचे सबंध आणखी मजबूत झाले. केवळ पुस्तकी शिक्षणाने जे साधले नसते ते या धंदेशिक्षणाने साधले. सुरवातीला पालकांचा मुलांच्या या मातीगोट्यात काम करण्याला विरोध होता. पण जेंव्हा त्यांना आढळून आले की आता त्यांचा मुलगा चांगला गवंडी किंवा विटा तयार करणारा झाला आहे तो मिळवता आहे आणि गोरेदेखील त्याच्याशी आदराने वागतात तेंव्हा त्यांना आपली चूक कळून आली.  शाळेच्या या काम करा आणि शिका या पद्धतीचा पालक देखील पुरस्कार करु लागले.

बुकरचा उत्साह आता वाढला होता. आपली मुले काहीही करु शकतात याचा त्याला प्रत्यय आला होता. मग त्याने बांधकामाचे साहित्य नेण्या आणण्याकरीता लागणाऱ्या ढकलगाड्या,बैलगाड्या, घोडागाड्या शाळेत तयार करण्यास सुरवात केली आणि लवकरच मुले यात अगदी तरबेज झाली. शाळेतील मुलांना अशा प्रकारे असे अनेक धंदे करण्याचे पर्याय उपलब्ध झाले. इतकेच काय पण सर्व इमारतींचे नळजोडणीचे , वीजेच्या वायरींगचे काम देखील शाळेतील विद्यार्थ्यांनीच केले. आता टस्कगी शाळेतून सुशिक्षीत असे विटा बनवणारे, गवंडीकाम करणारे, लाकुडकाम करणारे, नळजोडणी काम करणारे, वीजेच्या जोडणीचे काम करणारे कारागीर तयार होऊ लागले. विद्यार्थ्यांना पण कळून चुकले की कोणतेही काम हलके नाही तर ते चांगले केले की त्याला प्रतिष्ठाच असते.

शाळा आता चांगली चालत होती पण मुलांच्या गैरसोई बऱ्याच होत्या चांगले जेवणघर नव्हते, ग्रंथालय नव्हते, इतर बऱ्याच आवश्यक गोष्टी नव्हत्या. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे निग्रो समाजाची शिक्षणाची भूक बुकर पूर्णपणे भागवु शकत नव्हता. शाळेत प्रवेश घेण्यासाठी येणाऱ्या सर्व मुलांना तो प्रवेश देऊ शकत  नव्हता. इमारतींची अडचण होती. मग त्या दृष्टीने बुकरने आणि डेव्हिडसन बाईंनी हालचाल सुरु केली. दोघांनी आता उत्तरेकडील राज्यांचा दौरा काढला. यावेळी बुकरला बरेच मजेशीर अनुभव आले. न्युयॉर्कला गेल्यावर बुकरने तेथील एका परिचयाच्या इंग्रज गृहस्थाला  इतर इंग्रज गृहस्थाना परिचय पत्रे देण्याची विनंती केली. परिचय पत्रे देणे तर दूरच राहिले त्याने बुकरला

समजावले की बाबा तुला येथे काहीही मदत मिळणार नाही तू आपला दक्षिणेकडे परत जा कसा. बुकर मुळीच नाउमेद झाला नाही. बुकरचा माणुसकीवर, माणसांच्या उपजत चांगुलपणावर गाढ विश्वास होता. त्या इंग्रज माणसाच्या उपदेशाकडे अगदी दुर्लक्ष करून आपला दौरा सुरु ठेवला . आश्चर्य म्हणजे बुकरला अगदी भरघोस मदत मिळाली. उत्तरेकडील गोऱ्याची काळ्यांशी वागण्याची पद्धत फारच सभ्यतेची झाली होती. बुकरला वाटले की आपल्याला गोऱ्यांच्या हॉटेलात काही जागा मिळाणार नाही पण संपूर्ण दौऱ्यात त्याला हॉटेलांत जागा मिळण्यास कुठेच अडचण आली नाही. उत्तरेकडील राज्यांचा दौरा आटपुन आणि बरीच मदत मिळवून बुकर आणि डेव्हिडसन बाई टस्कगीला परत आले नवीन इमारतीचे काम अजून पूर्ण झाले नव्हते तरी पण आभार मानण्याचा सण (Thanks Giving) याच नवीन इमारतीत साजरा करण्याचे सर्वांनी ठरविले. या साठी प्रवचन देण्याकरीता चांगल्या धर्मोपदेशकाच्या शोधात बुकर होता. रेव्हरंड रॉबर्ट बेडफोर्ड यांच्याशी त्याची भेट झाली . बेडफोर्ड साहेबांनी कुठलेही आढेवेढे न घेता प्रवचनाला येण्याचे मान्य केले. टस्कगीतील सर्व लोकांनी हा सण अगदी आगळ्या वेगळ्या प्रकारे आणि  उत्साहात साजरा केला. नवीन स्वतः बांधलेली इमारत, त्या करीता केलेली मदत आणि रे. बेडफोर्ड यांचे प्रवचन यामुळे हा दिवस टस्कगीच्या इतीहासात  अविस्मरणीय ठरला. नुसते प्रवचन देण्यापुरताच रे. बेडफोर्ड साहेबांचा शाळेशी संबंध राहीला नाही तर ते कायमचे शाळेचे एक हितचिंतक बनले. बुकर तर त्यांना प्रभुचा अवतारच मानत असे. इमारतीच्या उभारणीकरीता ब्रुकलीनच्या पोर्टर साहेबांनी भरघोस मदत केली होती म्हणून या इमारतीला  पोर्टर  हॉल हे नांव देण्यात आले.

काही दिवसांनी हॅम्पटनचे वॉरेन लोगन नांवाचे एक विद्यार्थी टस्कगी शाळेत रुजु झाले आणि पुढे सतरा वर्षे ते टस्कगीच्या शाळेतच राहीले. ते पुढे शाळेचे खजीनदार झाले आणि बुकरच्या गैरहजेरीत ते प्रिन्सिपॉल म्हणून काम पहात असत. लोगन साहेब आपल्या कामात फारच तरबेज होते आणि त्याचे रुपाने बुकरला एक अत्यंत विश्वासु असा मित्र आणि मार्गदर्शक मिळाला. अडचणीच्या वेळी लोगन साहेबांची  बुकरला मोठी मदत होत असे. इमारत तयार झाल्यावर बुकरने दिवसाच्या शाळेचे निवासी शाळेत रुपांतर करण्याचे ठरविले. त्या करीता त्याने शाळेच्या जवळच्या झोपड्या भाड्याने घेतल्या.

मुलींची सोय मात्र पोर्टर हॉलच्या माळ्यावर केली होती. या झोपड्या अगदी मोडकळीस आलेल्या होत्या. निवासी शाळेसाठी आवश्यक असणाऱ्या लहान सहान वस्तुदेखील उपलब्ध नव्हतया. पलंग, गाद्या,टेबल, ताट वाट्या हे काहीच नव्हते. शाळेतील मुले हातगाड्या, बैलगाड्या बनवण्यात तरबेज झालीच होती मग त्यांना टेबले,खुर्च्या बनवण्यास सांगण्यात आले. सुरवातीला मुलांना या कामाकरीता लागणाऱ्या सुतारमाकाची अवजारे हाताळण्याची सवय नव्हती. खुर्ची बनवणे जरा कठीणच होते. तीन फळ्या एकमेकाला जोडून टेबल होत असे. सुतारकाम अगदी यथा तथाच असे. एखादे वेळी बुकर मुलांचे  खोलीत गेला की त्याला पलंग, खुर्च्या जमिनीवर कोसळून पडलेल्या दिसत. पण ही स्थिती फार दिवस राहीली नाही. थोड्याच दिवसात मुले या कामात पण तरबेज झाली . शाळेला मग फर्निचर बनवण्याचा एक नवीन उद्योग मिळाला. टस्कगीच्या शाळेतील फर्निचरला बरीच मागणी येऊ लागली. जी गोष्ट फर्निचरची तीच गाद्यांची. सुरवातीला जाडसर कापडाच्या खोळी करून त्यात पाईन वृक्षाची कोवळी पाने भरून गाद्या तयार करीत असत. लवकरच या कामात शाळेच्या मुलींनी प्राविण्य मिळवले. टस्कगी शाळेतील गाद्यांना मोठी मागणी येऊ लागली .

बुकरने मुलांच्या मनावर नेहमीच स्वच्छतेचे महत्व बिबवले. टुथ ब्रश वापरण्यास शिकवले. टुथ ब्रश असणे हा टस्कगीच्या शाळेत प्रवेश मिळवण्याचा एक हमखास गुण समजला जायचा. एकदा मुलींच्या विभागात बुकर तपासणी करीत होता. नुकत्याच शाळेत दाखल झालेल्या मुलींना त्याने टुथब्रश दाखविण्यास सांगीतले. मोठ्या उत्साहाने त्यांनी नवीन घेतलेला एक सामुदायीक वापरावयाचा ब्रश दाखवला. बुकरने  कपाळावर हात मारून घेतला. लवकरच मुलींना स्वतःचा वेगळा  टुथब्रश वापरण्याचे समजले.

मुले झोपडीत राहावयास आली त्या वर्षी हिवाळा खूप कडक होता. झोपड्यांची अगदी दुर्दशा होती. अशा कडक थंडीत मुलांचे काय हाल होत असतील या काळजीने बुकरला रात्री रात्री झोप येत नसे. मग तो रात्रीच झोपड्याकडे चक्कर टाकत असे. एकदा तर त्याला काही मुले एकच घोंगडे पांघरून शेकोटीजवळ शेकत बसलेली आढळून आली. एका रात्री तर थंडी अगदी भयानक होती. दुसऱ्या दिवशी प्रार्थनेचे वेळेस ज्या मुलांचे हात थंडीने गारठले असतील त्यांना हात वर करावयास

सांगीतले. सर्वांचे हात गारठले होते पण एकही हात वर झाला नाही. मुलांचे मनोधेर्य इतके बळकट होते की सर्व हालअपेष्टा सोसून त्यांना शिक्षण घ्यायचे होतेच.

शाळेला वेगळे स्वयंपाक घर नव्हते. जेवणाची वेगळी जागा नव्हती. मग बुकर आणि मुलांनी पोर्टरहॉलचे खाली खोदकाम केले. या तळघराचा उपयोग स्वयंपाकघर आणि जेवणाचे घर या करीता होऊ लागला. तसे ते ओबडधोबडच होते पण मुलांनी ते स्वतः तयार केले होते आणि त्याचा त्यांना कोण अभिमान होता. सकाळचा नाश्ता,दुपारचे व रात्रीचे जेवण याला लागणाऱ्या वस्तुंची वानवाच होती. गावातील व्यापाऱ्यांचा बुकरवर गाढ विश्‍वास होता. हवे तेवढे सामान ते उधारीवर देण्यास तयार होते पण बुकरच उधारी करण्यास तयार नव्हता. जेवढे जमेल तेवढे रोख पैसे मोजून वस्तु आणल्या जात आणि त्यातच सर्व काही भागवले जात असे. कॅम्पबेल साहेबांचा उपदेश बुकर विसरला नव्हता. पत हे त्याचे एक मोठे भांडवल होते. एकंदर परिस्थिती मात्र फारच हलाखीची होती. एकदा बुकर शाळेच्या जवळून जात असता त्याला एका मुलीची कुरबुर ऐकु आली. तिला सकाळी कॉफी मिळाली नव्हती. विहरीवर जाऊन पाणी तरी प्यावे म्हणून ती विहीरीजवळ आली तर पाणी काढण्याचा दोर पण तुटलेला होता. मोठ्या उद्वेगानी ती म्हणाली, ‘ हाय रे देवा । या शाळेत पिण्याचे पाणी पण मिळणे कठीण दिसते.’ दुसऱ्या एका प्रसंगी रे. बेडफोर्ड साहेब जेवणघराचे वरतीच एका खोलीत मुक्कामाला असतांना त्यांना दोन मुलींचे बोलणे ऐकु आले. त्या दिवशी कॉफी पिण्याकरीता कप कोणी वापरावयाचा यावर त्यांची चर्चा सुरु होती. हळु हळु परिस्थितीत सुधारणा होत गेली. पुढे जाऊन टस्कगीशाळेचे स्वयंपाकघर एकावेळेस हजारो विद्यार्थ्यांचा स्वयंपाक करण्या येवढे सक्षम झाले आणि जेवण घरात एकाचवेळेस हजारो मुले जेवण करु शकत असत.

टस्कगीची शाळा सुरु होऊन एक वर्ष झाले होते. गाडी आता मार्गाला लागली होती. बुकरने आता कोठे स्वतः कडे लक्ष देण्यास सुरवात केली. त्याला पण घर, संसार असावा असे वाटु लागले. शाळेत मिस फॅनी स्मिथ या शिक्षिका बुकरला आवडत असत. त्या पण निग्रोंच्या विकासाकरीता झटणाऱ्या होत्या.त्या हॅम्पटन शाळेचतच शिकल्या होत्या. बुकरने मिस फॅनी स्मिथ यांचेशी १८८२ साली लग्न केले. त्या शाळेच्या कामात बरेच लक्ष घालत असत. त्यांनी शाळेच्या प्रगतीकरीता खूप कष्ट उपसले

होते. पण शाळा पूर्णपणे भरभराटीला आलेली काही त्यांना पाहता आली नाही. १८८४ च्या मे महिन्यात स्मिथबाईंचा देहांत झाला. त्यांना एक मुलगी होती. तिचे नांव पोर्शिया होते. बुकरला वैवाहिक जीवन फारसे काही लाभले नाही. बुकरची डेव्हिडसन बाईंबरोबर चांगली मैत्री होती. त्यांनी एकत्रपणे बरेच दिवस काम केले होते. बुकरला एकटेपणा जड जाऊ लागला . १८८५ साली बुकरने डेव्हिडसनबाईंशी लग्न केले. दोन मुलींना जन्म देऊन त्या पण १८८९ साली वारल्या. शेवट पर्यंत त्या शाळेच्या प्रगतीसाठी झटत होत्या. बुकरचे दुसरे लग्न पण अल्पायुषी ठरले. बुकर पुनः एकटा पडला.

काही दिवसांनी हॅम्पटन शाळेचे खजिनदार जनरल मार्शल यांनी टस्कगीच्या शाळेला भेट दिली. इतक्या कमी अवधीत शाळेने केलेली प्रगती पाहून ते अगदी भाराऊन गेले. त्यानंतर मिस मॅकीबाईंनी शाळेला भेट दिली. त्यांना बुकरने आणि शाळेने केलेल्या प्रगतीचे खूप कौतुक वाटले. त्यानंतर जनरल आर्मस्ट्रांग यांनी शाळेला भेट दिली.त्यांचे अगदी अभूतपूर्व स्वागत झाले. टस्कगीच्या शाळेची प्रगती पाहुन ते चकितच झाले. जनरलांच्या भेटीच्या वेळी बुकरला त्यांच्या स्वभावाचे विविध पैलु दिसून आले. जनरल जरी उत्तरेकडेल सैन्याबरोबर दक्षिणेच्या सैन्याशी लढत होते तरी त्यांच्या मनात दक्षिणेकडील लोकांबद्दल राग,द्वेष नव्हता. एवढेच नव्हे तर ते गोऱ्या बरोबरच काळ्यांशी देखील तेवढ्याच प्रेमाने वागत होते. स्वतःच्या वागणुकीने जनरलांनी दाखवून दिले की खरोखर मोठी माणसे मनाने पण मोठी असतात, दुसऱ्याला प्रेम देतात. खुज्या वृत्तीची माणसे मनात डुक धरुन असतात आणि द्वेष वाढवतात. बुकरने जनरलांच्या उदाहरणावरून आपल्या मनातील द्वेषभावनेचे समूळ उच्चाटन केले. बुकरला आढळून आले की काळ्या निग्रोंचा छळ करून, त्यांना त्रास देऊन काळ्यांपेक्षा गोऱ्यांचेच जास्ती नुकसान होत होते. निग्रोंचे नुकसान तात्पुरते होते आणि ते एका किंवा काही व्यक्तीपुरते होते.काळ्यांचा द्वेष करावयाचा, त्यांचा छळ करावयाचा याची एकदा का सवय जडली की मग त्यांची अशी वागणूक फक्त काळ्या निग्रोंपुरती मर्यादित राहत नसे. गोरे लोक मग एकमेकांचा द्वेष करु लागत. इतकेच काय पण आपल्या कुटुंबाचा पण छळ करु लागत. जनरल आर्मस्ट्रांग याच्या सहृदयतेने दक्षिणेकडील सर्व लोक अगदी भाराऊन गेले. कमवा आणि शिका या

योजनेचे कौतुक गोऱ्यांना पण वाटु लागले. त्याचे महत्व त्यांना कळले  हॅम्पटन, टस्कगीच्या शाळेसारख्या पुस्तकी शिक्षणाबरोबर धंदेशिक्षण देणाऱ्या शाळा इतरत्र सुरु झाल्या.

टस्कगी शाळेची प्रसिद्धी दक्षिणराज्यात सगळीकडे पसरली. लांबून मुले शिक्षणाकरीता येऊ लागली. या मुलांची सोय करण्याकरीता मग दुसऱ्या इमारतीचे काम हातात घेण्याचे ठरले. नकाशे वगैरे काढून झाले. या कामाकरीता दहा हजार डॅलर लागणार होते. नेहमीप्रमाणे जवळ पैसे शून्य. इमारत तयार नसतानाच इमारतीचे नांव पण ठेवण्यात आले. या इमारतीला राज्याचे, अलबामा प्रांताचे नांव ठेवण्यात आले. अलबामा हॉल हे दक्षिणेतील सर्व काळ्या आणि गोऱ्यांच्या अस्मितेचा एक भाग बनला. तो पूर्ण करण्याकरीता गावातीलच नाही तर सर्व दक्षिणेतील लोकांनी अगदी कंबर कसली. कसे कोण जाणे पण जनरल आर्मस्ट्रांग

याचे कानावर ही गोष्ट गेली. त्यांनी  बुकरला मदत करण्याचे ठरविले. बुकरला त्यांनी हॅम्पटनला बोलावून घेतले.  मदतीला एक आर्केस्ट्राचा ताफा घेतला आणि त्यांचा उत्तरेकडील राज्यांचा दौरा सुरु झाला. भाषणे देत  आर्केस्ट्राचे कार्यक्रम करीत त्यांनी उत्तरेकडील सर्व राज्ये अगदी पिंजून काढली. लोकांनी  सढळ हाताने मदत केली. जनरलांचा भाषण देण्याच्या बाबतीत एक कटाक्ष होता. त्याचे म्हणणे होते की भाषणातील प्रत्येक शब्द हा अर्थपूर्ण असला पाहिजे. महत्वाचे मुद्दे अगदी थोडक्यात आणि सोप्या भाषेत मांडता आले पाहिजेत. बुकरने जनरलांच्या भाषणांचा चांगला अभ्यास केला. पुढील आयुष्यात बुकरने अनेक भाषणे दिली आणि ती फारच चांगली वठली याचे श्रेय तो जनरलांनाच देतो. आपले प्रत्येक भाषण तो  घासून पुसून तयार करीत असे. बऱ्याच वेळा त्याची उजळणी करीत असे आणि मगच भाषण देत असे. जनरलांबरोबर केलेल्या दौऱ्यामुळे बुकरच्या उत्तरेकडील अनेक मोठ्या मोठ्या लोकांशी  ओळखी झाल्या. बुकरच्या एका भाषणाला राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मि. थॉमस बिकनले हजर होते. त्यांना बुकरचे भाषण खूप आवडले. काही दिवसांनी त्यांनी बुकरला मॅडीसन मंडळाच्या एका सभेत भाषण देण्याकरीता बोलावले. बुकरने हे आमंत्रण आनंदाने स्विकारले .सभेला जवळपास चार हजार लोक होते. त्यात उत्तरेकडील व दक्षिणेकडेल गोरे पण होते. खुद्द टस्कगीतील गोरे पण होते. सर्वांना बुकर भाषणात काय सांगतो याची उत्सुकता होती.

बुकर दक्षिणेकडील गोरे कसे काळ्या निग्रोंवर अन्याय करीत आहेत याचे रडगाणे आपल्या भाषणातून गाईल अशी त्यांची अपेक्षा होती. बुकरने मात्र आपल्या भाषणात दक्षिणेकडील गोरे लोक काळ्यांच्या बरोबरीने कशी मदत करीत आहेत हे मोठ्या आवेशाने सांगीतले. सर्व बुकरच्या भाषणावर खूष झाले. बुकरचे मत होते की दक्षिणेकडील लोकांचे दोष दाखवायचे असतील तर ते दक्षिणेतच दाखवावे उत्तरेत नाही. त्याचा परिणाम पण होत नाही. बुकरने नंतर एकट्यानेच उत्तरेकडील राज्यांचा दौरा केला. टस्कगीच्या शाळेकरीता भरपूर मदत मिळाली.दक्षिणेकडील गोऱ्यांनी बुकरचे उत्तरेकडील गोऱ्यांसमोर केलेले भाषण ऐकले होते मग त्यांनी दक्षिणेकडील राज्यात देखील भाषणाकरीता त्याला बोलावले.

निमित्त होते १८९३ साली अटलांटा येथे भरणाऱ्या आंतरराष्ट्रिय ख्रिश्चन कामगार संघटनेच्या अधिवेशनाचे. यावेळी बुकर बोस्टन मधे खूप व्यस्त होता. तरी पण आलेली ही संधी सोडु नये असे त्याला वाटत होते. त्याने मग रेल्वेच्या वेळापत्रकाचा अभ्यास केला. बुकरने जर बोस्टन ते अटलांटा अशा रात्रीच्या गाडीने प्रवास केला तर तो भाषणाचे वेळेच्या आधी अर्धा तास अटलांटाला पोहोचत होता. भाषण आटोपून लागलीच निघाला की पुनः दुसऱ्या दिवशी सकाळी बोस्टनला परत येऊ शकत होता. भाषण केवळ पाच मिनिटाचेच होते त्याकरीता त्याला दोन रात्री जागून जवळपास दोन हजार मैलाचा प्रवास करावा लागणार होता. पण आलेली ही संधी बुकर सोडणार नव्हता. निग्रो स्वतःच्या प्रगतीकरीता कशी धडपड करीत आहेत हे दक्षिणेकडील गोऱ्यांपुढे नव्हे तर सर्व जगासमोर मांडण्याची ही एक दुर्मीळ संधी बुकर हातची गमवायला तयार नव्हता. बुकरने केवळ पाच मिनिटीकरीता हा सर्व खडतर प्रवास केला. गाडीत रात्रभर जागून भाषणाची उत्तम तयारी केली. बुकरचे भाषण सुंदर झाले. सर्वांना खूप आवडले. वर्तमानपत्रांनी बुकरच्या भाषणाची गंभीरपणे दखल घेतली. बुकरला अपेक्षित तो परिणाम साधता आला. आता दक्षिणेकडील राज्यातूनही बुकरला भाषणाची आमंत्रणे येऊ लागली आणि मदत पण मिळु लागली.

कधी कधी लोक बुकरला विचारीत की बाबा रे तुला इतकी मदत कशी काय मिळते? बुकरचे उत्तर अगदी सोपे आणि साधे असे. तो म्हणे, ‘ मी स्वतःला माझ्या निग्रो समाजाच्या उन्नतीकरीता

पूर्णपणे झोकुन दिले आहे. माझ्या समाजाच्या उन्नतीशिवाय दुसरा कोणाताही विचार माझ्या मनात येत नाही. अगदी झोपेत सुद्धा मी हाच विचार करीत असतो ध्यानीमनी सतत एकच विचार असतो माझ्या बांधवांचा उत्कर्ष. स्वप्न असते माझ्या बांधवांना मोठेपणा मिळवण्याचे. मनी असे ते स्वप्नी दिसे. यामुळे होते काय की की मी लोकांना कशा करीता मदत मागत आहे हे अगदी साध्या, सोप्या आणि सरळ शब्दात सांगु शकतो. माझ्या सतत मनात जे असते ते शब्दावाटे आपोआप बाहेर पडते. माझ्या वागण्याने, अखंड परिश्रमाने काम करण्याच्या वृत्तीने लोकांचा माझ्या बोलण्यावर विश्‍वास बसतो आणि मग लोक सहज मदत करतात. '

बुकरने मदत मिळवण्याचे आणखी एक उत्तम तंत्र विकसित केले होते. श्रीमंत लोक मदत करण्यास तयार नसतात हा समज त्याने मनातून पूर्णपणे काढून टाकला. सुरवातीच्या दक्षिणेकडील अनुभवावरून त्याला हे कळून चुकले की चांगल्या कामाकरीता मदत करावयाला सर्वच तयार असतात. त्याला आढळून आले की असे कित्येक श्रीमंत लोक आहेत की जे गाजावाजा न करीता गुप्तपणे चांगल्या कामाला मदत करीत असतात. श्रीमंत लोकांकडे मदत मागणाऱ्यांची रीघ लागलेली असते. बुकर कधीही श्रीमंत माणसाकडे मदत मागण्या करीता गेला की कार्यालयात जवळपास २०-२५ लोक मदत मागण्याकरीता वाट पहात बसलेले दिसत. या शिवाय पत्ररुपाने मदत मागणारे असतातच. श्रीमंत माणसांना जशी पैसे कमवण्याची अक्कल असते तशीच कोणाला मदत करावी हे पण पक्के ठाऊक असते. त्या प्रमाणे ते योग्य ठिकाणी मदत करीत असतात. बुकरने आपल्या वर्तनाने दाखवून दिले की तो मदत मागतो म्हणजे काही भीक मागीत नाही. तो भिकारी पण नाही. बुकरचे काम फक्त श्रीमंत लोकांना तो करीत असलेले कार्य चांगल्या प्रकारे समजवून सांगणे हेच आहे. टस्कगीतील शाळेतील विद्यार्थी काय काम करतात, कसे शिक्षण घेत आहेत, स्वतः कशी धडपड करीत आहेत , त्यांच्या अडचणी काय आहेत हे फक्त बुकर सोप्या भाषेत आणि अगदी थोडक्यात सांगत असे. आणि एवढेच पुरेसे होत असे. सहसा कोणी बुकरला मदत नाकारली नाही. पण कधी कधी काही मजेदार प्रसंग घडत असत. असे दारोदार मदत मागत फिरणे कष्टाचे होते पण बुकरने हे काम अगदी निष्टेने चालु ठेवले . हे काम करीतांना त्याला मनुष्यस्वभावाचे वेगवेगळे अनुभव

आले. बुकरच्या कामाची महती पटल्यानंतर बोस्टनमधील दोन श्रीमंत महिलांनी आपले नांव गुप्त ठेवण्याचे अटीवर बुकरला नेहमी मदत केली. सगळे अनुभव काही चांगले नव्हते. असाच एकदा तो एका श्रीमंत बाईंच्या घरी गेला. बुकरला बराच वेळ नुसते वाट पहात बसवून ठेवण्यात आले. शेवटी एकदा बाई भेटल्या. बुकरचे बोलणे शांतपणे ऐकले आणि काहीही मदत न करीत त्याला परत पाठवले. नंतर शेजारच्याच घरात बुकर गेला. त्या श्रीमंत माणसाने बुकरचे म्हणणे नीट ऐकून ताबडतोब भरघोस मदत दिली आणि वर म्हणाला, ‘ बुकर तुझ्यामुळे मला एका चांगल्या कामात सहभागी होण्याची संधी मिळाली म्हणून खरतर मीच तुझा आभारी आहे.’ अशा प्रकारची बोस्टन मधील बऱ्याच श्रीमंत माणसांची वृत्ती होती. टस्कगी शाळेकरीता बुकरला मदत मागुन बुकर  जणु  काय त्यांचेवर उपकारच करीत आहे अशीच त्यांची भावना होती.

हताश होण्याचे प्रसंग बुकरवर आले नाहीत असे नाही. एकदा अगदी कडाक्याच्या थंडीत बुकर चांगला दोन मैल चालत जाऊन एका श्रीमंत माणसाला भेटला, त्याने बुकरचे म्हणणे शांतपणे ऐकुन घेतले पण काहीही मदत केली नाही. बुकरला आश्चर्य वाटले पण खरे आश्चर्य तर नंतरच होते. अगदी अनेपेक्षित घटना घडली. बुकर  अडचणीत असतांना त्या माणासाकडून चांगला दहा हजार डॉलरचा धनादेश आला आणि वर बुकरचे आभार पण मानले. एक रकमी मिळालेली ही सर्वात मोठी मदत होती.

टस्कगीची शाळा आता चांगली नांवारुपाला आली होती. अलबामा सरकारला पण बुकरच्या कामाचे महत्व पटले आणि शाळेला सुरवातीला दिलेली २000 डॉलरची मदत वाढवून ३000 डॉलर केली. या कामी अलबामा शासनातील  सभासद फारेस्टर साहेब यांनी मदत केली. प्रसिद्ध स्लेटर फंडातून मदत मिळु लागली. सुरवातीला फक्त १०० डॉलरच मिळत पण कालांतराने ही मदत ११००० डॉलर इतकी झाली. याचप्रमाणे पीबॉडी फंडातून देखील मदत मिळु लागली. सुरवातील फक्त १०० डॉलर इतकीच मदत होती तीपण नंतर १५०० डॉलर झाली.

शाळेकरीता एका चांगल्या ग्रंथालयाची खूप गरज होती. बुकरने जवळपास शाळेच्या सुरवातीच्या काळातच ग्रंथालयाचे महत्व ओळखून प्रसिद्ध उद्योगपती आणि दानशूर म्हणून ओळखले

जाणारे डेल कार्नेजी यांना सविस्तर पत्र लिहून ग्रंथालयाकरीता मदत करण्याचे आवाहन केले होते पण त्यांचेकडून काहीच प्रतीसाद मिळाला नव्हता. एवढेच काय पण त्यांची भेट पण मिळाली नव्हती. आता शाळेला ग्रंथालयाची नितांत आवश्यकता होती. शाळेत जवळपास ११०० विद्यार्थी होते. शिक्षणाची उंची देखील वाढली होती. आता ग्रंथालय अगदी आवश्यक झाले होते. खर्च खूपच मोठा होता. याच सुमाराला बुकरने त्याचे आत्मचरित्र प्रसिद्ध केले. सुरवातीला ऑऊटलुक या मासिकातून 3 नोव्हेंबर पासून ते २९ फेब्रुवारी या काळात ते क्रमशः प्रसिद्ध झाले. मार्च १९०१ मध्ये ते पुस्तकरुपाने बाजारात आले. या आत्मचरित्रावर लोकांच्या नुसत्या उड्या पडल्या. जगातील जवळपास सर्व भाषातून त्याचे भाषांतर झाले आहे. हे चरित्र क्रमशः प्रसिद्ध होत असतांना कार्नेजींचे मित्र आणि या चरित्राचे प्रकाशक श्री. डबलडी यांनी एकदा गोल्फ खेळताना कार्नेजींना यातील काही भाग सांगीतला. कार्नेजीना बुकरला भेटावे असे वाटु लागले. नेमके याच वेळी बुकरने कार्नजींना पुनः एक पत्र पाठवून शाळेच्या ग्रंथालयाकरीता मदत करण्याची विनंती केली . त्यांनी १५ डिसेंबर १९०० ला बुकरला एक पत्र लिहुन सपूर्ण ग्रंथालयाचा खर्च करण्याचे अश्वासन दिले.इमारीतच्या बांधकामापासून ते पुस्तके आणि पुस्तकांची कपाटे याचा सर्व खर्च कार्नेजींनी केला.

टस्कगीच्या शाळेच्या कामामुळे आता बुकर ही एक मोठी सन्मान्य व्यक्ती झाली होती. सर्व थरातले लोक त्याला भेटण्यास उत्सुक असत. एकदा बुकर डल्लास ते होस्टन हा प्रवास रेल्वेने करीत होता. या प्रवासात प्रत्येक स्टेशनवर गावातील गोरे आणि काळे मान्यवर बुकरला अगदी आवर्जून भेटत होते. एकदा बुकर ऑगस्टा ते अटलांटा असा स्लीपर कोचमधून प्रवास करीत होता. तो जेंव्हा जेवणघरात गेला तेंव्हा त्याला त्याच्या ओळखीच्या दोन गोऱ्या स्त्रिया भेटल्या. त्यांना दक्षिणेतील वर्णद्वेशाची काहीच कल्पना नव्हती. त्यांनी मोठ्या आदराने बुकरला आपल्या जवळ बसवून घेतले येवढेच नव्हे तर एका गोऱ्या बााईने जवळचा खास चहा पण बनवून दिला. बुकर तर अगदी बावचळून गेला. या अशा आदरातिथ्याची त्याला सवय नव्हती. काही बरावाईट प्रकार घडू नये म्हणून बुकर काढता पाय घेऊ लागला तर त्या बायकांचा आता जेवणाची वेळ झाली आहे तर आमचे

बरोबरच जेवण घ्या असा आग्रह सुरु झाला. बुकरला दुसरा काही पर्यायच उरला नाही. जेवण झाल्याबरोबर काहीतरी कारण सांगून बुकर चटकन सटकला .

बुकरचा प्रवास खूप होत असे. लांबून लांबून त्याला भाषणाकरीता बोलावणी येत असत आणि बुकर टस्कगीच्या शाळेची माहिती लोकांपर्यंत पोहचविण्याची एकदेखील संधी सोडायला तयार नसे. बुकर खूप थकून जात असे. त्याला विरंगुळा असा नव्हताच. त्याची मायेने काळजी घेणारी बायको पण सोडून गेली होती. बुकरला फार एकटे एकटे वाटत होते. बुकरची ही मनस्थिती शाळेतील एक शिक्षिका मिस जेम्स मुरे यांचे लक्षात आली. मुरेबाई स्वभावाने खूप चांगल्या होत्या. त्या फिस्क विश्वविद्यालयात शिकल्या होत्या. टस्कगीच्या मुलींच्या शाळेच्या त्या प्रमुख होत्या आणि निग्रो समाजाच्या प्रगतीकरीता झटणाऱ्या होत्या. मुरे बाई निग्रो स्त्रियांचे मेळावे घेत असत. त्यांना स्वच्छतेचे धडे देत असत. त्यांना परसबाग लावणे, शिवणकाम करणे, कोंबड्या, डुकरे पाळणे आणि याप्रकारे संसाराला हातभार लावणे या गोष्टी शिकवत असत. याचा बुकरला फार उपयोग होत असे. बुकरला त्या आवडत असत. त्यांनी बुकरला धीर दिला, त्याला समजाऊन घेतले आणि याचे पर्यावसन त्या दोघांच्या लग्नात झाले. लग्न झाल्यानंतर बुकर पुनः आपल्या कामात गर्क झाला.बुकरला हे लग्न मात्र त्याला चांगलेच लाभले , टिकले आणि यशस्वी पण ठरले.

अलबामा प्रांतातील अटलांटा शहरात आंतरराष्ट्रीय कापूस उत्पादकांचे अधिवेशन १८ सप्टेंबर १८९६ ला आयोजीत केले होते. या अधिवेशनाला केंद्र सरकारने पण मदत करावी म्हणून एक शिष्टमंडळ पाठवण्याचे जार्जियातील प्रमूख नागरीकांनी ठरविले. यात सहभागी होण्याचे बुकरला आमंत्रण आले. मंडळात जवळपास २५ सभासद होते . सर्व उच्चपदस्थ व्यक्ती, शासकीय उच्चाधिकारी होते. यात फक्त तीनच निग्रो होते, बिशप ग्रॅन्ट, बिशप गेन्स आणि बुकर. सिनेट समोर सर्वांची भाषणे झाली. बुकरचे भाषण सर्वात शेवटी होते. बुकरने या आधी केंद्राच्या राजधानीत आणि सिनेटसमोर कधीच भाषण केले नव्हते. केंद्राने जर या अधिवेशनाला मदत केली तर त्याचा दक्षिणेकडील राज्यात अजून असलेला वांशिक भेद संपवण्यास मदत होईल हा मुद्दा आपल्या भाषणात अगदी ठासून मांडला. बुकरचे भाषण फारच प्रभावी झाले. सिनेटला पण बुकरचे विचार पटले आणि

केंद्रसरकारने भरघोस मदत देऊ केली. शिष्टमंडळाच्या सभासदांना देखील बुकरचे महत्व समजले . दक्षिणेकडील राज्यांच्या प्रगतीमधील निग्रोंचा सहभाग किती महत्वाचा आहे हे पण त्यांचे लक्षात आले. शिष्टमंडळाने मग एकमताने ठरविले की या निग्रोंच्या योगदानाचे प्रतीक म्हणून एक सुंदर इमारत प्रदर्शनात उभारावयाची. या इमारतीचे सर्व बांधकाम फक्त निग्रोंकडूनच करुन घ्यायचे आणि याची जबाबदारी बुकरवर सोपवायची. यथावकाश एक सुंदर इमारत बांधून झाली. ही इमारत अतीशय सुंदर झाली होती. मग शिष्टमंडळाने प्रदर्शनात निग्रोंकरीता एक स्वतंत्र विभाग असावा असे ठरविले आणि याची पण जबाबदारी बुकरवर सोपवली. बुकर टस्कगीच्या शाळेच्या कामात खूप व्यस्त होता म्हणून त्याने ही जबाबदारी मि. गारलंड पेन यांचेकडे देण्याची विनंती केली. मंडळाने बुकरची शिफारस स्विकारली. या निग्रोंच्या विभागात हॅम्पटन आणि टस्कगीच्या शाळेतील शिक्षणाची पद्धत दर्शवणारी प्रतीके होती. निग्रोंच्या प्रगती पथाचा आढावा घेणारे देखावे होते आणि हे सर्व फार प्रभावी होते. अधिवेशनाच्या उद्घाटनाचा दिवस जवळ येऊन ठेपला. अधिवेशनाचे संयोजक उद्घाटनाचा कार्यक्रम ठरविण्यात मग्न होते. उद्घाटन भाषण करणाऱ्यांच्या यादीत एका निग्रोचे नांव असावे असे संयोजकांना वाटत होते आणि या करीता बुकरशिवाय दुसरा कोणीही त्यांचे नजरेसमोर नव्हता. बुकरला रीतसर भाषण करण्याकरीता आमंत्रण दिले गेले.

बुकरवर फार मोठी जबाबदारी पडली होती. या भाषणाने उत्तरेकडील व दक्षिणेकडील गोऱ्यांची सहानुभूती मिळवून निग्रोंच्या प्रगतीतील सर्व अडथळे दूर करू शकला असता. पण जर तो योग्य भाषण करू शकला नाही तर मात्र सर्व निग्रो समाजाच्या प्रगतीचे दरवाजे कायमचे बंद होण्याची शक्यता होती. खरोखर बुकरची जबाबदारी फार मोठी होती. बुकरचा आपल्या कामावर आणि प्रभुच्या पाठिंब्यावर गाढ विश्वास होता. त्याने हे आव्हान स्विकारले . खूप मेहनत घेऊन बुकरने भाषण तयार केले. या भाषणाची पहिली श्रोता आणि टीकाकार त्याची पत्नी होती. त्यांचेकडून बुकरचे भाषण पास झाले. टस्कगीतील सर्व लोक अधिवेशनाला जाऊ शकणार नव्हते. बुकर अधिवेशनात काय बोलणार याची मात्र त्यांना खूप उत्सुकता होती. बुकरने मग आपले भाषण त्यांचे समोर वाचून दाखवले. सर्वांना भाषण आवडले. गोरे एका शब्दानेही दुखावले जाणार नाहीत आणि त्याच वेळी गोऱ्यांचे केवळ

लांगुलचालन होणार नाही याची बुकरने काळजी घेतली होती. भाषणात गोऱ्यांनी केलेल्या मदतीचा कृतज्ञापूर्वक उल्लेख होता त्याच बरोबर काळ्या निग्रोंच्या प्रगतीचा गौरवपूर्वक आढावा घेतल होता. गोऱ्यांच्या सहिष्णु वृत्तीमुळे काळे निग्रो कसे दक्षिणेच्या प्रगतीला हात भार लावत आहेत हे अगदी चांगले सांगीतले होते.

१७ सप्टेंबर १८९५ ला बुकर, सौ. बुकर आणि त्यांची तीन लहान मुले अटलांटाला जाण्यास निघाले. बुकर म्हणतो की मला तर जणु काय वधस्तंभाकडे नेल्या जाणाऱ्या बळीच्या बोकडासारखे वाटत होते. आपल्यावरील जबाबदारीमुळे तो घाबरला होता. टस्कगी गावातून जाताना एक म्हतारा निग्रो गमतीने बुकरला म्हणाला, ‘ बुकर!।आतापर्यंत तू उत्तरेकडील गोऱ्यांसमोर, दक्षिणेकडील गोऱ्यांसमोर, दक्षिणेकडील सर्वसामान्य गोऱ्या आणि काळ्या लोकांसमोर भाषणे ठोकली आहेत पण तुला यावेळी उत्तरेकडील, दक्षिणेकडील आणि सर्व गोऱ्या आणि काळ्या लोकांपुढे एकाच वेळी भाषण करावयाचे आहे. तुझी अगदी गोची झाली आहे. खरोखर मला तुझी दया येते .’ त्याच्या बोलण्याने बुकर आणखीनच गडबडून गेला. प्रवासात प्रत्येक स्टेशनावर लोक बुकरकडे बोट दाखवून एकमेकांत कुजबुजत होते, ‘ हाच तो बुकर बर का ! उद्या अधिवेशनाचे उद्घाटनाचे कार्यक्रमात भाषण करणार आहे.’ वर्तमान पत्रातून देखील बुकरच्या भाषणाची उत्सुकता दिसत होती. अटलांटा स्टेशनवर उतरल्यावर एका निग्रो माणसाने बुकर कडे बोट दाखवून आपल्या मित्राला सांगीतले, ‘अरे, हाच आपला जातभाई, उद्या भाषण करणार आहे. काही झाले तरी मी याचे भाषणाला जाणारच.’ अधिवेशनाचे निमत्तिाने अटलांटा शहरात खूप गर्दी झाली होती. यात परदेशी प्रतीनिधी, उच्चपदस्थ अधिकारी, केंद्र आणि राज्यसरकारचे अधिकारी आणि सिनेटर होते. स्टेशनवर अधिवेशनाच्या अधिकाऱ्यांनी बुकरचे स्वागत केले आणि सर्वांना त्यांचे हॉटेलकडे मोठया इतमामाने नेले. आपल्या भाषणाची बुकर अगदी कसून तयारी करीत असे आणि आज तर त्याची जणु परीक्षाच होती. बुकरने गुडघे टेकून प्रभुची प्रार्थना केली आणि अधिवेशनाचे जागी जाण्यास तयार झाला. अधिवेशनात भाग घेणाऱ्या प्रमुख पाहुण्यांच्या शोभायात्रेपासून अधिवेशनाची सुरवात होणार होती. शोभा यात्रा जेथून सुरु होणार होती तेथे बुकरला नेण्यात आले. सयोजकांनी काळ्या निग्रोंकरीता देखील मानाच्या जागा

राखून ठेवल्या होत्या. शोभा यात्रा जवळपास तीन तास चालु होती. उन्हामुळे आणि भाषण देण्याच्या दडपणामुळे बुकर अस्वस्थ झाला होता. बुकरचे एक मित्र व टस्कगी शाळेचे विश्वस्थ मि. विल्यम बाल्डवीन तर इतके बैचेन झाले होते की ते सभागृहात न जाता उद्घाटन भाषणे पूर्ण होईतो बाहेर बाागेत फेरफटका मारत होते.

अधिवेशनाचे काम सुरु झाले. प्रथम गव्हर्नर बुलक यांनी प्रास्ताविक केले. जार्जियाच्या बिशप नेल्सन यांनी अधिवेशनाच्या यशाकरीता प्रभुची प्रार्थना केली. अल्बेट होवेल यांनी एक स्वागतपर गीत म्हंटले. समितीच्या अध्यक्ष व महिला विभागाच्या अध्यक्ष श्रीमती थॉम्सन यांचे भाषण झाले. नंतर गव्हर्नर बुलक यांनी बुकरचा परिचय करून दिला आणि आदरपूर्वक त्याला भाषण देण्यास पाचारण केले. हॉल अगदी तुडुंब भरला होता. जागा न मिळाल्यामुळे बरेच लोक हॉलचे बाहेर उभे होते. गोरे आणि काळे दोघेही बुकरचे भाषण ऐकण्यास अगदी उत्सुक होते. काहीजण बुकर कसे वेडेवाकडे बोलून स्वतःची फजीती करून घेतो हे पहाण्यास आले होते. नंतर मग म्हणावयाला मोकळे , ‘आम्ही म्हणत नव्हतो की बुकरला भाषणाला बोलावू नका म्हणून पण ऐकेल कोण आता पहा कशी फजीती झाली आहे ती. ’

बुकर बोलायला उठला. सर्व काळ्यांनी जोरात टाळ्या वाजवून त्याचे स्वागत केले. गोऱ्यांचा पण चांगला प्रतिसाद होता. बुकरने भाषणास सुरवात केली,

‘ अधिवेशन समितीचे सन्माननीय अध्यक्ष, सन्माननीय सभासद आणि उपस्थित सर्व सज्जनहो ! आम्ही काळे निग्रो दक्षिणेतील राज्याच्या लोकसंख्येचा तिसरा हिस्सा आहोत. दक्षिण राज्याची भरभराट आम्हाला विचारात न घेता, आम्हाला डावलून होणार नाही. माननीय अध्यक्ष महोदय! मी आमच्या समाजाच्या वतीने आपल्याला अगदी खात्रीपूर्वक आणि मोठ्या अभिमानाने सांगतो की आपण सर्वांनी ज्या मनाच्या मोठपणाने आणि सहृदयतेने आम्हाला या अधिवेशनात सन्मानाने आणि आदराने सहभागी करून घेतले आहे त्यामुळे अम्ही सर्व भाराऊन गेलो आहोत. आपल्या या मनाच्या मोठेपणामुळे काळे निग्रो आणि गोरे यांच्यात सामजस्य वाढण्यास फार मदत होणार आहे. येवढेच नाही तर आपण अधिवेशनात निग्रोंकरीता एक स्वतंत्र विभाग ठेवून आमच्या

सामाजिक,शैक्षणीक,औद्योगीक प्रगतीची नोंद घेतली आहे. आमचे बरेचसे उभारीचे आयुष्य गुलामीत गेल्यामुळे आम्ही अज्ञानी आणि अननुभवी राहिलो. त्यामुळे सुरवातीच्या काळात आमचेकडून काही चुका झाल्या. धंदेशिक्षण, शेतीचे शिक्षण, मालमता जमविणे या मूलभूत गोष्टीकडे लक्ष न देता आम्ही कायदेमंडळात जागा मिळवणे, प्रचार कार्यात भाग घेऊन राजकीय महत्व  मिळवणे यावरच लक्ष केंद्रीत केले होते. आम्ही आमच्या आसपास जी साधने उपलब्ध होती त्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केले. आमचे शेजारी आम्हाला मदत करण्यास तयार आहेत हे आमचे लक्षातच आले नाही. सर्व आवश्यक साधने आमचे जवळच उपलब्ध आहेत हे आम्हाला  कळलेच नाही. मला एका गोष्टीची आठवण होते. एक जहाज समुद्रात बरेच दिवस भरकटत असते. जहाजावरील प्रवासी तहानेने  व्याकुळ झाले असतात. एवढ्यात त्यांना एक दुसरे जहाज दिसते. भरकटलेल्या जहाजाचा कप्तान ‘आम्हाला पिण्यासाठी पाणी द्या’ असा संदेश पाठवतो. उत्तर येते ‘तुम्ही आहात तेथेच तुमच्या जवळची बादली सोडा.’ कप्तान विचार करतो इथे तर समुद्र आहे. खारट पाणी कसे काय पिणार . पुनः तो संदेश पाठवतो ‘आम्हाला पिण्यसाठी पाणी द्या.’ पुनःउत्तर येते ‘आहात तेथे तुमच्याजवळची बादली सोडा.’ तीनचारदा हेच उत्तर मिळाल्यानंतर  मोठ्या नाखुशीने कप्तान आपल्या जवळची बादली पाण्यात सोडतो पहातो तो काय बादली गोड पाण्याने भरून आली होती. भरकटत भरकटत ते जहाज ॲमाझान नदीच्या मुखात शिरले होते. आमचे पण तसेच झाले आहे. आमच्या आसपास असलेली संधी सोडून आम्ही लांबवर नजर ठेवून आहोत. मी माझ्या काळ्या बांधवाना सांगु इच्छितो बाबानो तुम्ही तुमच्या शेजारच्या गोऱ्या लोकांचे महत्व कमी समजु नका. त्यांच्याशी मित्रत्वाचे सबंध जोडण्यातच तुमचे हित आहे. तुमची बादली तुम्ही जेथे आहात तेथेच सोडा. तुम्हाला मदतीचे, सहकार्याचे भरपूर पाणी मिळेल. शेतीत, यंत्रकामात, धंद्यात, सेवाउद्योगात बादली सोडा आणि बघा तुम्हाला भरपूर मदत आणि यश मिळते की नाही.गोऱ्यांचे आणि काळ्या निग्रोंचे सांस्कृतिक,धार्मिक, सामाजिक वेगळेपण आहे हे मी निश्चितच जाणतो. आपण सर्व या बाबतीत हाताच्या बोटाप्रमाणे राहु पण दक्षिण राज्यांच्या विकासाकरीता त्यांच बोटांची एक मुठ आवळून हातात हात घालून लढु. दक्षिणेकडील राज्यांना काही लोक नानाप्रकारचे दोष देतात पण मी येथे अगदी ठासून सांगतो की ज्या

वेळी गोऱ्यांचे आणि काळ्यांचे धंद्याचे निमित्ताने सबंध आले, त्याच्यातील सबंध हे अगदी निव्वळ धंदेवाइक राहीले आहेत आणि काळ्या निग्रोंना योग्य तो सन्मान आणि ह्क्क दिले गेले आहेत.गुलामीतून मुक्ततेच्या वातावरणात येतांना आमच्या कडून फार मोठी चूक घडली. आमची उन्नती ही आमच्या शारिरीक कष्टाने, कला-कौशल्याने आणि अपार श्रमानेच होऊ शकते हे आमचे ध्यानात आलेच नाही. समाजाला काही दिल्याशिवाय कुठल्याही जमातीची प्रगती होत नसते मी समस्त गोऱ्यांना पण आवाहन करतो की तुम्ही तुमची बादली तुम्ही आहात तेथेच सोडा. तुमचे उद्योगधंदे, तुमचे शेतमळे, तुमचे सेवा उद्योग आम्ही आमच्या कौशल्याने, श्रमाने , कला -कौशल्याने भरभराटीला आणतो की नाही ते पहा. या साठी फक्त एकच करा . परराज्यांवर अवलंबून राहु नका. तुमच्या आसपास हे सर्व उपल्बध आहे. फक्त तुम्ही आहात तेथेच बादली सोडण्याची गरज आहे. आठ लक्ष निष्ठावान निग्रो समुदायात ती बादली सोडा आणि पहा काय होते ते. गुलामीत असताना आम्ही कोणत्याही प्रकारचा विरोध न करीता, संप, औद्योगिक कलह न करीता तुमची शेती, तुमचे घरकाम, तुमच्या वखारी मोठ्या आस्थेने , आपुलकीने सांभाळल्या. आजारपणात , युद्धकाळात आम्ही तुमच्या लाडक्यांना, तुमच्या मालमत्तेला प्राणपणाने जपले. दक्षिणेकडील रेल्वे मार्ग, रस्ते, महामार्ग उत्तम प्रकारे बांधले. विश्वास ठेवा आता सुद्धा आम्ही या सर्व गोष्टी अगदी निष्ठापूर्वक करु. तुम्ही या अधिवेशनात आमच्यावर हा विश्वास दाखवलाच आहे. नाहीतर केवळ निग्रोंकरीता निग्रोंनीच इमारत बांधून घेण्याचे, निग्रोकरीता स्वतंत्र विभाग ठेवण्याचे काही कारणच नव्हते. तुमच्या आमच्या वरील विश्वासाची ही प्रतीके आहेत. हे जर सर्व राज्यांनी केले तर दक्षिणेकडील राज्यांची प्रगती होण्यास फार काळ लागणार नाही. तुमची बादली आठ लाख निग्रो समुदायात सोडा. आम्ही तुमची जास्तीची जमीन लागवडीखाली आणु, बरड, नापिक जमिन पण सुपिक करु, शेतमालाचे उत्पन्न वाढवू. हे सर्व घडत असतांना तुमच्या आजुबाजुला प्राण पणाला लावून झटणारे तुमचे काळे निग्रो सोबतीला असतील. पुनः पुनः सांगतो तुमची बादली तुम्ही आहात तेथेच सोडा. काळ्या निग्रोंनी आणि गोऱ्यांनी एकमेकावरचा विश्वास दृढ करायला हवा मग या एकत्र प्रयत्नाने दक्षिणेच्या राज्यांची प्रगती होते की

नाही ते पहा. प्रभुने सांगुन ठेवले आहे. छळ करणारा आणि छळ सोसणारा दोघेही एकाच धाग्याने बांधलेले असतात. आपल्या सर्वांना एकत्रित पणेच भविष्याला सामोरे जायचे आहे.

The laws of changeless justice bind oppressor with oppressed; And close as sin and suffering joined we march to fate abreast.

सोळा लाख काळे हात तुम्हाला मदत करण्यास उत्सुक आहेत. आम्ही जर अज्ञानी, अडाणी, मागासलेले राहीलो तर विचार करा की या राज्यांतील तिसरा हिस्सा हा अज्ञानी,अडाणी आणि भुकेला, मागासलेला राहणार आहे. मग ही राज्ये भरभराटीला कशी येतील ?

अधिवेशनाच्या सन्माननीय सभासदांनो आणि उपस्थित सज्जनहो ! आमच्या वेगळ्या विभागात फक्त सोळा वर्षात आम्ही कुठपर्यंत मजल गाठली आहे हे तुम्ही पहालच. आमच्या प्रगतीची सुरवात अगदी लहान प्रमाणात झाली. कुठे एखादे लहानसे शेत खरेदी कर, कुठे एखादा भोपळ्याचा मळाच लाव, कुठे गाड्या, खोगीर, फर्निचर , गाद्या तयार कर असे लहान सहान उद्योग सुरवातीला आम्ही केले. आज आम्ही उत्तम प्रकारचे सर्व लाकडी सामान बनवु शकतो ऊत्तम गाद्या, खोगीरे बनवु शकती. आम्ही बनवलेल्या विटांना चांगली मागणी आहे. आमचे गवंडी उत्तम इमारती बांधु शकतात. आमच्यावर विश्वास ठेवा, आम्ही तुमचा कधीही गैर फायदा घेतला नाही आणि घेणार पण नाही. कायद्याने मिळणारे सर्व अधिकार आम्हाला हवे आहेत पण हे अधिकार मिळवण्याकरीता आम्ही अथक प्रयत्नाने आमची योग्यता सिद्ध करणे आवश्यक आहे याची पण आम्हाला जाणीव आहे.

पुनरुक्तीचा दोष स्विकारून मी पुनः एकदा ठामपणे सांगतो की या अधिवेशनात आम्हा काळ्या निग्रोंना आदराने सहभागी करून घेऊन गेल्या तीस वर्षात झाली नाही इतकी गोऱ्यांची आणि काळ्यांची एकजूट घडली आहे. मी प्रभुला साक्षी ठेवून वचन देतो की आपल्या प्रगतीच्या मार्गातील ज्या ज्या अडचणी येतील त्या दूर करण्याकरीता आम्ही तुमच्या बरोबर खांद्याला खांदा लाऊन प्राणपणाने लढु, मागे हटणार नाही. मला खात्री आहे की या एकजुटीच्या प्रयत्नामुळे प्रभु पण

आपल्यातील जे काही लहान सहान मतभेद आहेत ते देखील  दूर करेल आणि या मनोमिलना मुळे दक्षिणेकडील राज्यांची प्रगती खात्रीने  होईलच.

बुकरचे भाषण संपले आणि गव्हर्नर बलॉक त्याचेकडे जणु झेपावलेच. मोठ्या आनंदाने बराच वेळ हस्तांदोलन करीत राहीले. त्यांच्या तोडातून शब्दच फुटत नव्हता. स्वतःला सावरून त्यांनी जोर जोरात टाळ्या वाजवण्यास सुरवात केले. सर्व सभागृहात टाळ्यांचा नुसता कडकडाट होत राहीला. सर्वांनी बुकरला घेरून टाकले. त्याचे अभिनंदन करण्यात चढाओढ लागली. बुकरला तर सभागृहाबाहेर पडणे कठीण झाले. वर्तमानपत्रांनी पण बुकरचे भाषण अगदी उचलून धरले. त्याच्या भाषणाला  ठळक प्रसिद्धी मिळाली. सर्वत्र त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होऊ लागला. बुकर जेथे जेथे जाईल तेथे तेथे लोक त्याचे कडे बोट दाखवून एकमेकाला सांगत, हाच तो बुकर बर का . काय अप्रतीम भाषण केले आहे त्याने.

या समझोत्याच्या भाषणाने एक अत्यंत समंजस, आणि सनदशीर मार्गाने निग्रोंची प्रगती साधणारा नेता म्हणून बुकरची ओळख झाली. बुकरचे हे भाषण म्हणजे सामंजस्याचा एक ठरावच आहे असे सर्व समजु लागले. या आधी फ्रेड्रिक डग्लस या निग्रो नेत्याने वर्ण भेदाच्या कायद्या विरुद्ध आवाज उठवला होता. राजकीय हक्क आधी मिळावेत असा त्याचा अट्टहास होता. डग्लस यांचे निधन झाले होते. आता समझोत्याच्या धोरणामुळे बुकरच  निग्रोंचा एकमेव नेता म्हणून ओळखला जाऊ लागला. जवळपास सर्व  निग्रो समाज बुकरला आपला उद्धारकर्ता मानु लागले. अर्थात काही जहाल मताची निग्रो मंडळी होतीच. त्यांना बुकरचे हे समझोत्याचे विचार म्हणजे गोऱ्याचे लांगुलचालन वाटले. त्यांनी बुकरचे विरोधात एक वेगळी संघटना उभारली. दहा विचारवंत या नांवाने ही संघटना ओळखली जायची. हावर्ड विद्यपिठातून ग्रॅजूएट झालेला विल्यम मोनरो ट्रॉटर हा त्यात प्रमुख होता. बुकरचे निग्रो जमातीचे निर्विवाद नेतृत्व त्यांना मान्य नव्हते. निग्रोंना मवाळपणाचे धोरण स्विकरण्यास लाऊन आणि गोऱ्यांचे लांगुलचालन करून बुकर फक्त आपले स्वतःचे महत्वच वाढवत आहे असा त्यांचा समज होता. बुकरच्या काही सभा त्यांनी उधळून लवण्याचा प्रयत्न केला. बुकरच्या जीवावर पण हे लोक उठले होते. हे लोक अगदी मोजकेच होते. बहुसंख्य निग्रो बुकरचेच बाजुने होते.

थोड्याच दिवसात हे दहा विचारवंत होते की नव्हते असे झाले आणि बुकरची निग्रोचा एकमेव नेता ही प्रतीमा अगदी झळाळून उठली. अशा प्रकारे बुकरच्या भाषणावर साद प्रतिसाद येत असताना जॉन हॉकिन्स विद्यालयाचे अध्यक्ष डॉ. गिल्मन यांनी बुकरपुढे एक प्रस्ताव मांडला. अधिवेशनात जे निरनिराळे विभाग होते आणि त्यात ज्या ज्या वस्तु मांडल्या होत्या त्यांच्या करीता एक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्या साठी एक परिक्षकमंडळ स्थापन करावयाचे होते आणि बुकरने त्यात सहभाग घ्यावा. स्पर्धकांमधे गोरे आणि काळे स्पर्धक होते आणि काळा निग्रो असून देखील बुकरला एक परिक्षक म्हणून आमंत्रीत करण्यात आले होते हा बुकरचा मोठा सन्मान आणि संयोजकांच्या मनाचा मोठेपणा होता. बुकरने आनंदाने हा प्रस्ताव मान्य केला. या परिक्षकमंडळात दक्षिणेकडील मान्यवर,कॉलेजचे प्रिन्सिपाल, न्यायमुर्ती असे जवळपास ६० सभासद होते. या मंडळाचे दोन गट पाडण्यात आले. बुकर ज्या गटात काम करीत होता त्याचे मुख्य थॉमस नेल्सन पेज हे होते. त्यांनी बुकरला त्यांचे गटाचे सचिव नेमले.अर्थातच स्पर्धेचा निकाल लिहण्याचे काम बुकर कडे आले. बुकरने ही जबाबदारी अगदी उत्तम प्रकारे पार पाडली. सुमारे महिनाभर या मंडळाचे काम सुरु होते आणि या काळात बुकरला सर्वांनी अगदी आदराने वागवले.

अधिवेशनाचा उद्‌घाटन समारंभ संपल्यानंतर बुकरने आपल्या भाषणाची एक प्रत अमेरिकेचे अध्यक्ष ग्रोवर क्लीवलॅन्ड यांना पाठवली होती. ६ ऑक्टोबरला अध्यक्षांनी स्वतःच्या सहीने उत्तर पाठवून बुकरचा गौरव केला. अध्यक्ष्यांच्या अधिवेशनाच्या भेटीदरम्यान बुकरची आणि त्यांची गाठभेट झाली. बुकरने आणि इतर निग्रो नेत्यांनी अध्यक्षांना निग्रो विभागाला भेट देण्याची विनंती केली. अध्यक्षांनी जवळपास एक तास निग्रोच्या विभागात घालवला आणि सर्व निग्रोंशी मोठ्या आपुलकीने वागले. अध्यक्षांच्या या सह्रदयतेने सर्व भाराऊन गेले. निग्रोंनी केलेल्या प्रगतीचे त्यांनी कौतुक केले आणि सर्व प्रकारची मदत करण्याचे अश्वासन दिले.

अधिवेशनाचे काम संपल्यावर बुकर पुनः टस्कगीच्या कामकाजात गर्क झाला. काही दिवसांनी त्याला प्लायमाऊथ चर्चचे मुख्य आणि आउटलुक मासिकाचे संपादक लीमन ॲबाट यांचे एक पत्र मिळाले . निग्रो चर्चेसच्या कामाचे पद्धतीवर, निग्रो धर्मगुरुंच्या काम करण्याच्या पद्धतीवर

आणि पात्रापात्रतेवर बुकरने एक अहवाल सादर करावा असे लीमन साहेबांनी सुचवले होते. बुकरने मनलाऊन अहवाल तयार केला. हा अहवाल अगदी वस्तुनिष्ठ होता. कोणाचीही भीडमुर्वत ठेवली नव्हती. आपल्या अहवालात बुकरने धर्मगुरुंच्या पात्रतेवर, त्यांचे वर्तनावर अगदी कोरडे ओढले होते. हा अहवाल प्रसिद्ध झाल्यावर एक मोठे वादळच उठले. सर्व निग्रो वर्तमानपत्रांतून बुकरवर टिका होऊ लागली. बुकरचा सर्वत्र निषेध होऊ लागला. बुकर मात्र मुळीच डगमगला नव्हता. त्याने जसे आहे तसेच लिहले होते. लोकांच्या आणि वर्तमानपत्रांच्या टिकेवर त्याने कोणतेही भाष्य करावयाचे नाकारले. काही निग्रों चर्चेसनी निग्रोंनी आपली मुले बुकरच्या टस्कगी शाळेत पाठवू नये असा फतवा पण काढला. हा फतवा काढण्यात ज्याचा मोठा सहभाग होता त्याचा मुलगा मात्र टस्कगीच्याच शाळेत येत होता. त्याने आपल्या मुलाला काही  शाळेतून काढले नाही. हळु हळु लोकांना आणि वर्तमानपत्रांना बुकरच्या अहवालाची सत्यता पटु लागली. बुकरविरोधी भावना मावळु लागली. चर्चेसच्या मुख्यांनी मग शुद्धीकरणाची मोहीम हाती घेतली. अपात्र धर्मगुरुंची हकालपट्टी झाली. निग्रोंच्या चर्चेसच्या कामात खूप सुधारणा झाली आणि याचे सर्व श्रेय मोकळ्यामनाने सर्व लोकांनी आणि वर्तमानपत्रांनी बुकरलाच दिले.

अटलांटा अधिवेशनातील भाषण आणि चर्चसुधारणेतील बुकरचा सहभाग यामुळे बुकरचे धर्मगुरु आणि वर्तमानपत्रांचे संपादक यांच्याशी मैत्रीचे सबंध प्रस्थापित झाले. टस्कगीच्या शाळेला देखील ओघाओघाने याचा फायदाच झाला. मदतीचा एक मोठा ओघ सुरु झाला.

बुकरचे नांव अमेरिकेच्या अध्यक्षांपर्यंत पोहोचले होते. शासनातील उच्चपदस्थांशी बुकरचे सलोख्याचे सबंध होते. निग्रोच्या प्रगतीकरीता याचा फायदा घेण्याचे बुकरने ठरविले. बुकरकडे आता थोडाफार पैसा जमला होता. हळुहळु त्याने एकएका निग्रो वर्तमानपत्रावर आपली पकड मिळवण्यास सुरवात केली. केंद्रातील महत्वाच्या व्यक्तींशी असलेल्या ओळखीचा फायदा काही महत्वाची पदे योग्य अशा निग्रोंना मिळवण्याकरीता करु लागला.दक्षिणेत देखील न्यायालयात प्रविष्ठ असलेल्या प्रकरणात निरापराध आरोपींच्या बचावाकरीता  अप्रत्यक्षपणे मदत करु लागला. केवळ निग्रो आहे म्हणून होणाऱ्या अन्याया पासून निग्रोंना संरक्षण मिळु लागले. अशा प्रकारो दक्षिणेतील राज्ये

आणि केंद्रसरकार या दोन्ही ठीकाणी निग्रोंबद्दल सहानभुती असणारा एक गट निर्माण करण्यात बुकर यशस्वी झाला. बुकर आता आपल्या कारकीर्दीच्या अगदी शिखरावर पोहोचला होता. तरी पण त्याने आपले तडाजोडीचे धोरण सोडले नव्हते. उलट त्याने स्वतःच्या उदाहरणाने दाखवून दिले की आपण स्वत;ची पात्रता सिद्ध केली की कोणतीही संधी आपल्याकडे आपसुक चालून येते. येवढे प्रचंड यश आणि लोकप्रियता मिळवली असून देखील बुकरने कधीही सिनेटचे पद किंवा शासनात एखादी महत्वाची जागा मिळवण्याचे प्रयत्न केले नाहीत की आपली तडजोडीची भुमिका बदलली नाही.

अशा प्रकारे सगळीकडे अगदी आलबेल असताना संपूर्ण अलबामा राज्यावर एक संकट कोसळले. तर हे संकट काही अचानक कोसळले नव्हते. आणि ते ईश्वर निर्मित पण नव्हते.दक्षिणेतील लोकांनी अति हव्यासापोटी ते आपल्यावर ओढावून घेतले होते. सतत कापसाचे पिक घेत गेल्यामुळे दक्षिणेकडील जमिनीचा कस उतरून गेला होता. कितीही प्रयत्न केला तरी जमिनीतून पोटापुरते देखील उत्पन्न मिळेनासे झाले होते. शेतकरी कर्जबाजारी होत होते. दुष्काळ अगदी उंबऱ्याशी येऊन ठेपला होता. बुकरला काय करावे हे सुचत नव्हते. दक्षिणेतील बहुतांश निग्रो हे शेतीवर अवलंबून होते आणि आता शेतीनेच त्यांना दगा दिला होता. निग्रोंची अगदी दयनीय परिस्थीती झाली होती. अशातच कोणीतरी बुकरला मॅसेचुटेस या राज्यातील जॉर्ज वाशिंग्टन कार्व्हर या निग्रो प्राध्यापकाची मदत घेण्याचे सुचवले. कर्व्हर बॉटनीचा प्राध्यापक असून आपल्या क्षेत्रात फार नावाजलेला संशोधक होता. त्याला चांगली मानाची आणि भरपूर पगाराची नोकरी होती. बुकरने कर्व्हरला एक पत्र पाठवले. दक्षिणेतील निग्रो शेतकऱ्यांच्या हलाखीच्या स्थितीचे यथार्थ वर्णन केले आणि निग्रोंच्या मदतीला टस्कगीला येण्याचे आमंत्रण दिले. त्याला मिळणाऱ्या वेतानाच्या आणि सुखसोईंच्या एकशतांश देखील वेतन आणि सुखसोई देऊ शकणार नाही हे स्पष्ट करून केवळ आपल्या समाजाच्या प्रगतीकरीता येण्याचे बुकरने कळकळीचे आवाहन केले. टस्कगीला येऊन नुकत्याच कुठे उठून उभे राहु पहाणाऱ्या निग्रो जमातीला तो विनाशापासून वाचवु शकेल हा विश्वास पण व्यक्त केला. कार्व्हरने बुकरचे नांव ऐकले होते. बुकर करीत असलेल्या कामाची त्याला माहिती होती. बुकरद्दल त्याला खूप आदर होता. त्याला पण आपल्या समाजाकरीता काही करावे असे मनोमन

वाटत होते.तो पण परिस्थितीतून होरपळून निघालेला पूर्वी एक गुलामच होता. कठोर परिश्रमाने आणि अत्यंत हालअपेष्टा भोगून तो या मानाच्या पदावर पोहोचला होता. आलेली ही संधी दवडु नये असे त्याने ठरविले. मागेपुढे न पहाता, पुढील उज्वल भवितव्यावर आणि मिळणाऱ्या भरघोस पगारावर लाथ मारून कार्व्हर टस्कगीला जाण्यास तयार झाला. हातातील सर्व कामे चांगल्या प्रकारे मार्गाला लाऊन सर्व सोबत्यांचा आग्रह मोडून आपण टस्कगीला येत असल्याची तार कार्व्हरने बुकरला पाठवीली.

कार्व्हर टस्कगीला पोहोचला आणि तेथील परिस्थिती पाहून तो चकितच झाला. संशोधनासाठी काहीही साधने उपलब्ध नव्हती. तो निराश मात्र झाला नाही. त्याचे वाक्य होते, जिथे आहात तेथून आणि आहे त्या साधानानीशी सुरवात करा. त्याने तेच केले.इकडेतिकडे हिंडुन टाकून दिलेल्या कंदीलाच्या काचा, डब्बे, भांडी अशा वस्तुपासून त्याने प्रयोगाकरीता लागणारी उपकरणे तयार केली. आपले संशोधन सुरु केले. सतत कापसाचे पिक घेत गेल्यामुळे जमिनीचा कस नष्ट झाला होता. कार्व्हरने शेतकऱ्यांना आलटून पालटून वेगवेगळी पिके घेण्यास सांगीतले. रताळी, बटाटे, भुइमुग यांची पिके शेतकरी घेऊ लागले. या पिकांमुळे जमिनीचा पोत आणि कस सुधारु लागला आणि हळुहळु दुष्काळाचे सावट दूर होऊ लागले. कार्व्हर करीत असलेल्या संशोधनामुळे आणि त्याने शेतीच्या क्षेत्रात घडवून आणलेल्या क्रांतीमुळे सर्व लोक टस्कगीकडे आकृष्ट झाले. कार्व्हरने रताळी, भुइमुग यापासून नानाप्रकारचे खाद्यपदार्थ करून दाखवले. भुइमुग हा तर त्याचा अगदी लाडका पदार्थ होता. शेगदाण्यापासून त्याने तेल, प्रोटिन्स, रंगद्रव्ये काय काय नाही तयार केले. टस्कगीत आढळून येणाऱ्या लाल मातीपासून त्याने नाना रंग तयार केले आणि हे सर्व संशोधन काहीही अडकाठी न ठेवता, कुठल्याही प्रकारचे शुल्क न आकारता सर्वांना उपलब्ध केले. मोठे मोठे उद्योगपती कार्व्हरचा सल्ला घेण्याकरीता टस्कगीला येऊ लागले आणि अशा प्रकारे टस्कगीची प्रसिद्धी सर्व अमेरिकेभर पसरली. बुकर एका काळजीतून मुक्त झाला.

१८९७ च्या सुरवातीला अटलांटा अधिवेशना इतकीच एक चांगली संधी बुकर कडे चालून आली. उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील राज्यांचे युद्ध संपले होते. त्या प्रित्यर्थ या युद्धातील एक नावाजलेला

सेनानी रॉबर्ट गोल्ड शॉ याच्या स्मरणार्थ उभारलेल्या स्मारकाच्या अनावरण प्रसंगी भाषण देण्याकरीता बुकरला आमंत्रित करण्यात आले. शॉ हे कायदेमंडळातील एका सभासदाचे सुपुत्र होते. वर्णद्वेशाविरुद्ध च्या युद्धात लढत असताना काळ्या निग्रोंची पहिली पलटन त्यांनी उभारली होती. हा समारंभ बोस्टनमधील म्युझिक हॉल मधे झाला. सभागृह अगदी तुडुंब भरले होते. बुकरचे भाषण प्रभावी झाले. सर्व वर्तमानपत्रांनी बुकरवर कौतुकाचा वर्षाव केला. स्पॅनीश अमेरिकन युद्ध नुकतेच संपले होते. सर्व अमेरिकेभर आनंदोत्सव सुरु होता. १६ ऑक्टोबरला शिकागो येथील सभेत भाषण देण्याकरीता बुकरला पाचारण करण्यात आले. जवळपास सोळा हजार श्रोते सभेला हजर होते. बुकरचे हेही भाषण नेहमीप्रमाणे खूप गाजले. अमेरिकेचे अध्यक्ष विल्यम मॅककीनले आणि त्यांचे मंत्रीमंडळ मंचावर हजर होते. बुकरच्या भाषणाने अध्यक्ष भाराऊन गेले. बुकरचे भाषण संपताच नेहमीचा रीतरीवाज मोडून अध्यक्ष आपले आसनावरून उठून उभे राहीले आणि टाळ्या वाजवून त्यांनी बुकरचे अभिनंदन केले.

बुकर सतत कामात व्यग्र असे. सतत लांब लाबचा प्रवास करीत असे. सतत भाषणे देत असे. त्याच्या झोपण्याच्या, जेवणाच्या वेळा अनियमित असत तरी पण बुकर आपली प्रकृती अगदी उत्तम ठेवून होता. सामाजिक कार्य करावयाचे असेल तर कार्यकर्त्याने प्रथम आपले शरीरस्वास्थ्य संभाळले पाहिजे हे बुकरचे मत होते. आणि त्या प्रमाणे तो वागत असे. लहानसहान दुखण्याकडेदेखील तो दुर्लक्ष करीत नसे. सर्व दिवसाचे वेळापत्रक आखीव असे. दिवसभराचे ठरविलेले काम त्याच दिवशी संपले पाहिजे यावर त्याचा कटाक्ष होता. त्यामुळे होते काय की दुसऱ्या दिवसाची सुरवात उत्साहाने होते आणि नवीन आव्हाने स्विकारावयाला जोम येतो. बुकरला खेळ वगैरे फारसे आवडत नसत. विरंगुळा म्हणून तो आपल्या खाजगी बाागेत अधून मधून बागकाम करीत असे. कधी कधी आपल्या कुटुंबासह वनभोजनाला जात असे. त्याला कोंबड्या, डुकरे पाळण्याचा नाद होता. डुक्कर हा त्याचा आवडता प्राणी होता. त्याच्या सारखा माणसाला उपयुक्त प्राणी दुसरा नाही असे त्याचे मत होते. त्याने डुकराची अगदी उत्तम प्रकारे पैदास केली होती. कधीकधी तो एकटाच लांबवर फिरायला जात असे. या फिरण्यातून आपण निसर्गाच्या आणि प्रभुच्या अधिक जवळ जातो असे त्याला वाटत असे. कादंबऱ्या वगैरे वाचण्या पेक्षा त्याला महान व्यक्तींची चरित्रे वाचण्याची आवड होती. अब्राहम लिंकन

हा त्याचा अगदी आवडता थोर पुरुष होता. त्याच्या चरित्राची त्याने अनेकदा पारायणे केली. अशा प्रकारे सर्वोतोपरी काळजी घेऊन देखील बुकरला थकवा जाणवु लागला. आतापर्यंत बुकरने एकदिवस देखील सुटी घेतली नव्हती. गुलामीत जन्मलेल्या बुकरने अतोनात परिश्रमाने ,स्वकष्टाने सर्वप्रकारचे मानसन्मान मिळवले होते. अमेरिकेच्या अध्यक्षापासून सर्व थरातील मान्यवर बुकरचे कौतुक करीत होते. अतोनात परिश्रमाने बुकरने हे डोळे दिपवून टाकणारे यश मिळवले होते. पण भोगलेल्या या हालअपेष्टांनी आणि अतोनात श्रमानी बुकरला आता थकवा जाणवू लागला. शेवटी तो देखील एक माणूसच होता. त्याच्या मित्रमंडळींच्या आणि चाहत्यांच्या पण लक्षात ही गोष्ट आली. त्यांनी बुकरला विश्रांती घेण्याचा आग्रह केला. याकरीता त्यांनी बुकरला युरोपचे दौऱ्यावर जाण्याचे सुचवले. बुकर मात्र तयार नव्हता. बुकरला टस्कगीच्या शाळेची काळजी होती. आपल्या अनुपस्थितीत शाळेकडे येणारा मदतीचा ओघ मंदावेल असे त्याला वाटत होते. आपण मारे आनंदात युरोपचे दौऱ्यावर आराम करावा आणि आपल्या सोबत्यांनी इथे कष्ट करीत रहावे हे बुकरला बरोबर वाटत नव्हते. शिवाय लोकोपवादाला पण तो बिचकत होता. उद्या हेच लोक म्हणु लागतील पहा बुकर आता मोठा श्रीमंत माणूस झाला आणि श्रीमंत गोऱ्या लोकांसारखा युरोपच्या दौऱ्यावर वगैरे जाऊ लागला. लोकांना मात्र सांगतो की विनाकारण गोऱ्यालोकांची बरोबरी करण्याचा प्रयत्न करु नका. पण १८९९ च्या वसंत ऋतुत असा एक प्रसंग घडून आला की बुकरला आपला आडमुठे पण सोडून देऊन युरोपचे दौऱ्यावर जावे लागले. बोस्टनमधील काही महिलांनी त्यांच्या महिला मंडळात बुकरचे भाषण ठेवले होते. या समारंभाचे अध्यक्ष होते बिशप लॉरेन्स. पॉल लॉरेन्ह यांनी काव्यगायन केले. श्री बोरीस यांनी श्रोत्यांना बुकरचा परिचय करून दिला. भाषण संपल्यावर एका महिलेने बुकरला विचारले की तो कधी युरोपच्या दौऱ्यावर गेला आहे का. बुकर म्हणाला अशा दौऱ्याकरीता मला वेळच मिळाला नाही. मग त्या महिलेने बुकरला पुनः विचारले की युरोपचे दौऱ्यावर जाण्याची त्याला इच्छा आहे का. बुकर म्हणाला टस्कगीच्या शाळेचे काम करण्याशिवाय मला दुसरी काहीही इच्छा नाही. त्यावेळी तरी तो विषय तेवढ्यावरच संपला असे वाटले. पण ती महिला काही स्वस्थ बसली नव्हती. इतर अनेक दानशूर महिला आणि मान्यवर यांचेशी संपर्क साधून तिने बुकरच्या युरोपच्या दौऱ्याची पूर्ण तयारी केली एवढेच

नव्हे तर बुकरच्या अनुपस्थितीत टस्कगीच्या शाळेकरीता मदतीचा निधी पण जमवून ठेवला. थोड्याच दिवसात बोस्टन मधील एक मान्यवर मि. गॅरीसन यांनी बुकरला कळवले की त्याच्या सर्व कुटुंबाची युरोपच्या दौऱ्याची तयारी पूर्ण झाली आहे.तुमच्या अनुपस्थीती टस्कगीच्या शाळेची काहीही अडचण होणार नाही याची हमी आम्ही घेतली आहे. आता तुम्हाला युरोपचे दौऱ्यावार जाण्यात काही अडचण नाही. अशा प्रकारे सर्व बाजुंनी कोंडीत सापडलेल्या बुकरला दौऱ्यावर जाण्यावाचून दुसरा पर्यायच उरला नाही. मि. गॅरीसन यांनी बुकरच्या दौऱ्याची काटेकोरपणे आखणी केली होते. ज्या ज्या ठिकाणी बुकर जाणार होता त्या ठिकाणच्या मान्यवर लोकांना देण्याकरीता ओळखपत्रे तयार ठेवली होती. बुकरच्या सर्व कुटुंबाकरीता रेड स्टार लाईन या कंपनीच्या फ्रायलँड या बोटीवर आरामशीर जागा राखून ठेवली होती. ९ मे १८९९ रोजी बुकर पत्नीसह न्युयॉर्कला येऊन पोहोचला आणि १० मे रोजी दुपारी त्याने बोटीवर पाय ठेवला. बुकर या अनपेक्षित भाग्याने बावचळून गेला होता. एकतर बोटीवर आपल्याला कशाप्रकारची वगणूक मिळेल याबाबत तो जरा सांशकच होता त्याचबरोबर आपण इतक्या मोठ्या पदावर पोहोचलो म्हणून जरा बावरलाच होता. त्याला त्याचे गुलामीचे दिवस आठवत होते. कुठे रस्त्याच्या कडेला पायरीखाली झोपणारा, फाटकेतुटके कपडे वापरणारा, उपासमार सोसणारा, हॉटेलमधे काम करणारा बुकर आणि आता या आरामशीर बोटीतून प्रवास करणारा बुकर कुठे. बुकरने बोटीवर पाय ठेवताच बोटीच्या कप्तानाने बुकरचे आदराने स्वागत केले. इतर प्रवाशांनी पण बुकरचे स्वागत केले. बुकर आणि त्याच्या पत्नी करीता उत्तम पैकी कॅबीन राखून ठेवली होती. बोटीने किनारा सोडला आणि बुकरला आपल्या खांद्यावरचे एक एक ओझे कमी झाल्यासारखे वाटु लागले. आपल्याला विश्रांतीची खरच गरज होती हे आता त्याला पटले. तो खरच इतका थकला होता की बोटीवर पाय ठेवल्यापासून सतत १५ तास नुसता झोपून होता. अमेरिकेत असताना बुकर सकाळी उठला की एका मागून एक प्रश्न त्याचे समोर उभे रहात असत. कुठली गाडी पकडावी, पैशाची जमवाजमव कशी करावी,एक ना दोन प्रश्न समोर उभे असत. भाषणाची तयारी करायची असे , कोणाची तरी भेट घ्यायची असे हे सर्व कसे जमवावे हेच विचार सतत डोक्यात घोळत असत. आता निव्वळ आराम होता. बोटीवरील सर्व प्रवासी बुकरशी मोठ्या आदराने वागत होते. या विश्रांतीमुळे

बुकरचे तब्बेत सुधरु लागली. या दौऱ्यात बुकरने बेल्जीयम, हॉलंड,पॅरीस, लंडन या ठिकाणांना भेटी दिल्या. पॅरीस मध्ये पॅरीस विश्वविद्यालयात भाषण देण्याकरीता बुकरला आमंत्रित केले गेले. या सभेचे अध्यक्षपद अमेरिकेचे माजी अध्यक्ष बेंजामीन हॅरीसन यांनी भुषवीले होते. आर्यलंडचे आर्चबिशप पण हजर होते. अमेरिकेचे राजदूतांनी बुकर दांपत्याला जेवणाचे आमंत्रण दिले. बुकरच्या पंक्तीला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायुमूर्ती मि. फुलर पण हजर होते. बुकरच्या आयुष्यातील हे अगदी सोनेरी पर्व होते. एक मूळचा गुलाम असलेला बुकर अध्यक्ष, राजदूत, न्यायमूर्ती यांचेबरोबर पंक्तीला बसत होता. पॅरीस मधे असताना बुकरची आणि निग्रो चित्रकार टॅनर यांची भेट झाली. टॅनरची चित्रे लक्झेंबर्ग राजवाड्यात लावली होती. कोणाला सांगीतले असते की एका निग्रो चित्रकाराची चित्रे राजवाड्यात लावली आहेत तर विश्वासच बसला नसता. बुकरचा आपल्या जमातीच्या प्रगतीचा अभिमान वाढीला लागला.

बुकरचे मत होते की माणसाला मिळणारी वागणूक, सन्मान, लौकिक हा कातडीच्या रंगावर अवलंबून नसतो तर तुमच्या कर्तुत्वावर , कार्यकुशलतेवर अवलंबून असतो. गोष्ट कितीही लहान असो ती जर तुम्ही इतरांपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे करून दाखविली तर तुम्हाला मान्यता नक्किच मिळते. म्हणूनच बुकर आपल्या बांधवांना सतत सांगत असे की बाबानो ! अशी काही कारागिरी , असे काही कौशल्य आत्मसात करा की ते इतरांपेक्षा वेगळे आणि अधिक चांगले असेल. यामुळे समाज तुमच्याकडे अपेक्षेने पाहिल आणि तुम्हाला योग्य तो सन्मान आणि आदर मिळेल.एखादी निग्रो मुलगी उत्तम प्रकारे स्वयंपाक करु लागली, उत्तम प्रकारो कपडे शिवु लागली , उत्तम प्रकारे घरांची साफसफाई करु लागली एखादा निग्रो मुलगा उत्तम प्रकारे घोडे संभाळु लागला, रताळी पिकवू लागला, लाकुडकाम करू लागला तर त्यांना समाज योग्य तो सन्मान जरूर देणारच. तुमचे कातडीचा रंग कोणता आहे हे मग कोणी लक्षात घेणार नाही. याचे प्रत्यक्ष उदाहरण बुकरला चित्रकार टॅनरचे स्वरुपात दिसले.

लंडनमधे बुकर जुलैचे सुरवातीला पोहोचला. सार्वजनिक उत्साहाना या ऋतुत उधाण आलेले असते. पार्लमेंटचे अधिवेशन पण सुरु होते. बुकर अनेकदा पार्लमेंटमध्ये गेला. अनेक

ठिकाणाहून बुकरला भाषणाची आमंत्रणे येऊ लागली. बरीचशी त्याने प्रकृती अस्वस्थ्याचे कारण सांगून नाकारली पण इसेक्स हॉलचे आमंत्रण तो नाकारु शकला नाही. अमेरिकेचे इंग्लंडमधील राजदूत या सभेचे अध्यक्षस्थान स्विकारणार होते. राजदूत मि . छोएट यांनी बुकरच्या सन्मानार्थ एक मोठी मेजवानी दिली. या मेजवानीचे प्रसंगी बुकरची आणि सुप्रसिद्ध अमेरिकन लेखक मार्क ट्वेन यांची गाठभेट झाली. इंग्लंडच्या राणीसाहेब व्हिक्टोरीया यांनीपण बुकर दांपत्याला मेजवानीचे आमंत्रण दिले. खरोखर बुकरच्या सर्व आयुष्यातला हा परम भाग्याचा क्षण होता. एक गुलाम राणीचे पंक्तीला बसत होता. एका गुलामाला राजे, राण्या, उमराव , मान्यवर लोक चहापानाला , मेजवानीला बोलावत होते, त्याचे भाषण लक्षपूर्वक ऐकत होते , त्याचा सन्मान करीत होते. पॅरीस मध्ये असतानांच बुकरला चार्लस्टनचे महापौर यांचे एक पत्र मिळाले होते. चार्लस्टनचे नागरिक बुकरचा नागरी सत्कार करणार होते. बुकरने हे आमंत्रण स्विकारावे म्हणून सर्व नागरिकांचे वतीने महापौरांनी विनंती केली होती. चार्लस्टन राजधानी व्हावी म्हणून बुकरने पण प्रयत्न केले होते. बुकरने हे आमंत्रण स्विकारले आणि आपला दौरा आटोपता घेऊन परतीचे प्रवासाला निघाला. सेट लुइ या जहाजाने बुकरचा परतीचा प्रवास होत होता. बोटीवरच्या प्रवाशांनी एकदा बुकरला भाषण देण्याची विनंती केली. भाषणानंतर सर्व सहप्रवाशांनी टस्कगीच्या शाळेला भरघोस देणगी दिली. बुकर चार्लस्टनला येऊन पोहोचला. बुकरचे जंगी स्वागत करण्यात आले. मोठ्या मिरवणुकीने बुकरला सभेच्या ठिकाणी नेण्यात आले. चार्लस्टन गावाजवळील माल्डेन या गावातच बुकरने मिठाच्या भट्टीवर, कोळशाच्या खाणीत काम केले होते. बुकरचे पूर्वीचे काही मालक हजर होते.ज्यांनी बुकरला पूर्वी गुलाम म्हणून बाळगले होते असे काही गोरे पण हजर होते. आज हेच सर्व लोक बुकरचा मोठा सत्कार करणार होते. बुकरला आपले जुने दिवस आठवत होते. बुकर अगदी तृप्त होता. त्याच्या मनात कोणाविषयी कडवटपणा नव्हता. बुकरचे भाषण मनाला चटका लावणारे झाले. लोकांनी वेळोवेळी केलेल्या मदतीचे त्याने आभार मानले. कोणालाही दोष दिला नाही. बुकरच्या मनाचा हा मोठेपणा पाहून उपस्थित श्रोते भाराऊन गेले. इतके खडतर आयुष्य भोगून, अनंत यातना सोसून देखील बुकरचे मनात कोणाबद्दल लहानशी देखील अढी

नव्हती हे पाहून त्यांना कौतुक वाटले. बुकरच्या भाषणामुळे दक्षिणेकडील गोऱ्यांच्या आणि काळ्यांच्या मनोमिलनावर जणु शिक्कामोर्बतच झाले. बुकर अगदी तृप्त होता.

चार्लस्टन हून परतल्यावर बुकरने पुनः आपले टस्कगीचे काम सुरु केले. पण अजून एक आश्चर्य घडावयाचे होते. एकदिवस बुकर आपल्या कुटुंबासह वऱ्हांड्यात गप्पा मारत बसला असताना हावर्ड विद्यापिठाच्या कुलगुरुंचे पत्र हातात पडले. हावर्ड विश्वविद्यालय बुकरला डॉक्टरेटची सन्माननीय पदवी प्रदान करणार होते. बुकरने पदवी स्विकारण्याकरीता २४ जून १८९६ ला हॉवर्डला येण्याची विनंती केली होती. बुकरला कधी स्वप्नात देखील वाटले नव्हते की हावर्ड सारखे अत्यंत श्रेष्ठ आणि रुढीप्रिय विश्वविद्यालय त्याला अशी सन्माननीय पदवी देईल. ही पदवी म्हणजे तो करीत असलेल्या कामाची आणि निग्रो समाजाच्या प्रगतीची एक पावती होती. संपूर्ण निग्रो समाजाने कृतार्थ व्हावे आणि मोठ्या अभिमानाने साऱ्या जगाला ओरडून सांगावे की पहा आम्ही आमच्या कष्टाने, श्रमाने काय मिळवले आहे ते. आज आमच्यातल्याच एका पूर्वाश्रमीच्या गुलामाला हावर्ड सारखे विद्यापिठ डॉक्टरेटची  पदवी सन्मानपूर्वक प्रदान करीत आहे. आम्ही गुलाम होतो. नंतर स्वतंत्र झालो. पण आम्हाला काही शिक्षण नव्हते. काही कसब, हुन्नर, कलाकौशल्य आम्हाला अवगत नव्हते. स्वतःचा संसार देखील चालवण्याची आमची लायकी नव्हती. पण पहा आमच्यातलाच एक काळा निग्रो एके काळचा गुलाम आज ही मोठी पदवी मिळवत आहे. पदवीदान समारंभात बुकरचे भाषण सर्वांच्या ह्रदयाला  जाऊन भिडले. बुकर खूप खुश होता. या त्याच्या खुशीत भर घालण्याकरीताच की काय त्याचे आवडते जनरल आर्मस्ट्रांग बुकरकडे येऊन राहीले. जवळपास सहा महिने ते बुकरकडे होते. अर्धांगवायुने ते हतबल झाले होते. बुकरने मोठ्या आपुलकीने त्यांची सेवा केली. त्यांची सेवा करण्यातच बुकरला धन्यता वाटत होती. त्यांची शिकवण आचरणात आणूनच बुकर या पदाला पोहोचला होता.

१८९८ चे सुमारास बुकरला समजले की अमेरिकेचे अध्यक्ष किनले अटलांटा, जार्जिया या राज्यांना भेट देणार आहेत आणि अटलांट शहरात  एका शांतता मेळाव्याला हजर रहाणार आहेत. बुकर लागलीच वाशिंग्टनला अध्यक्षांच्या कार्यालयात पोहोचला.त्याने पाहिले की अनेक लोक

अध्यक्षांच्या भेटीकरीता ताटकळत बसले आहेत. आपल्याला भेट मिळेल की नाही याची बुकरला शंकाच वाटु लागली. अगोदर ठरवून भेट मागीतली नव्हती. तरी पण बुकरचे भेटपत्र अध्यक्षांचे हातात पडताच त्यांनी बुकरला बोलावून घेतले.अध्यक्ष क्षणाचीही उसंत न घेता सतत लोकांना भेटत होते, त्यांचे बोलणे शांतपणे ऐकून घेत होते तरीही त्यांचे चेहऱ्यावर त्रासाचे कंटाळल्याचे कुठलेही चिन्ह बुकरला दिसले नाही. बुकरला अध्यक्षांचे कौतुक वाटले. अध्यक्षांना बुकरने टस्कगीच्या शाळेच्या कामकाजाची माहिती दिली. आणि अमेरिकेच्या अध्यक्षांनी शाळेला भेट दिली तर विद्यार्थ्यांचे मनोबल कसे वाढेल हे थोडक्यात सांगीतले. अध्यक्षांचा शांतता परिषदेला हजर राहण्याचा कार्यक्रम अद्याप निश्चित झाला नव्हता. त्यांनी बुकरला पुनः एकदोन आठवड्यांनी भेटण्यास सांगीतले. अध्यक्षांचा शांतता परिषदेला हजर राहण्याचा कार्यक्रम निश्चित झाल्याचे बुकरला कळताच तो पुनः अध्यक्षांचे भेटीला गेला. बुकरच्या या भेटीच्या वेळी मि. चार्ल्स हेअर या एका प्रतिष्ठित गोऱ्या गृहस्थांनी बुकरला सोबत करण्याचे मान्य केले. अध्यक्षांनी जर टस्कगीला यावेळी भेट दिली तर दक्षिणेकडील वर्णद्वेष कमी होण्यास कशी मदत होईल हे त्यांनी अध्यक्षांना चांगल्या प्रकारे सांगीतले. या दुसऱ्या भेटीच्या काही काळ आधी दक्षिणेकडील वातावरण जरा तंग होते. निग्रोंवरील अत्याचार वाढले होते आणि निग्रो स्वतःला असुरक्षित समजावयाला लागले होते. अध्यक्ष देखील या बदलेल्या परिस्थितीमुळे जरा संचीत झालेले दिसत होते. जरी बरेच लोक बाहेर भेटीची वाट पहात ताटकळत होते तरी त्यांनी बुकरला थांबवून घेतले आणि दक्षिणेकडील गोऱ्या आणि काळ्यांच्या सद्यस्थितीबद्दल चर्चा करण्यास सुरवात केली. त्यांची चर्चा सुरु असतांनाच एक गोरा सिनेट सभासद खोलीत आला. गुलामगिरीची प्रथा सुरु असतांना त्याने देखील काही गुलाम बाळगले होते. बुकरचे आणि अध्यक्षांचे संभाषण त्याने लक्षपूर्वक ऐकले आणि अध्यक्षांना विनंती केली की अशा बिकट प्रसंगी अध्यक्षांनी टस्कगीला भेट देणे जरुरीचे आहे. यामुळे गोऱ्यांना योग्य तो संदेश दिला जाईल आणि काळ्याचे पण मनोबल उंचावेल. त्याच्या या मताला निग्रो समाजाबद्दल सहानभुती असणारे डॉ. जे.एल. एम. करी यांनी पण दुजोरा दिला. बराच वेळ विचार करून आणि आपल्या मदतनीसानशी चर्चा करून अध्यक्षांनी टस्कगीला भेट देण्याचे निश्चित केले .१६डिसेंबर ही तारीख निश्चित झाली.

अध्यक्षांची भेट निश्चित झाल्याबरोबर दक्षिणेतील सर्व गोऱ्या आणि काळ्या लोकांत एक आनंदाचे वातावरण निर्माण झाले. टस्कगीतील सर्व काळ्या आणि गोऱ्यांनी शहर सुशोभित करण्यास सुरुवात केली. निरनिराळ्या कमिट्या तयार झाल्या आणि कामे वाटून घेण्यात आली. अध्यक्षांचे अगदी अभूतपूर्व असे स्वागत करण्याकरीता सर्व गाव एकजुटीने कामाला लागला . बुकरला कल्पनाही नव्हती की आपल्या कामामुळे त्याने या दोन जमातीत इतका एकोपा निर्माण केला आहे. अध्यक्षांचे या भेटीचे सुमारास अलबामा राज्याच्या विधानमंडळाचे अधिवेशन सुरु होते. एकमताने अधिवेशनाला दोन दिवस सुटी घेऊन सर्व सभासदांनी टस्कगी येथे हजर राहण्याचे ठरविले. या निमित्ताने परदेशी लोक पण टस्कगीला येऊन दाखल होऊ लागले.

१६डिसेंबरला अध्यक्ष मॅककिनले सपत्निक टस्कगीत हजर झाले. बऱ्याच महत्वाच्या व्यक्ती त्यांचे बरोबर आल्या होत्या. नुकत्याच संपलेल्या स्पॅनिश युद्धातून परतलेले जनरल व्हीलर , जनरल शॉफटर यांचा त्यात समावेश होता. अलबामा राज्याच्या सिनेटचे सर्व सभासद, गर्व्हनर, न्यायमुर्ती हे पण हजर होते. टस्कगी रेल्वे स्टेशन पासून ते शाळेपर्यतंचा रस्ता नागरीकांनी सजवला होता. अध्यक्षांचा वेळ वाचवावा आणि अगदी कमी वेळात अध्यक्षांचे दर्शन शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना व्हावे म्हणून शाळेतील विद्यार्थी रस्त्याचे दुतर्फा हातात उसाचा दांडा आणि कापसाचे बोड घेऊन उभे होते. शाळेतील होणाऱ्या कामाचे दर्शन घडवणारे देखावे दुतर्फा मांडले होते. शाळेने शेतीत आणि दुग्धपालानात केलेल्या सुधारणांचे देखावे होते. अध्यक्षांचे नवीनच बांधलेल्या सभागृहात भाषण झाले. अध्यक्षांनी आपल्या भाषणात टस्कगीच्या शाळेतील कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले आणि बुकरच्या कामाची खूप तारीफ केली. आरमाराचे सचीव मि. लाँग यांनी पण बुकरची तारीफ केली. पोस्टमास्टर जनरल स्मिथ यांनी कार्यक्रमाचा समारोप केला आणि असा हा सगळ्यांच्या कायमचा स्मरणात राहणारा कार्यक्रम समाप्त झाला. बुकरच्या आयुष्यातला हा सर्वोच्च आनंदाचा क्षण होता. गेले वीस वर्षे निग्रोंच्या प्रगतीकरीता करत असलेल्या कामाची उभ्या अमेरिकेने दिलेली ती पावती होती. बुकर आज अगदी कृतार्थ झाला होता. एका घोड्याच्या पागेत सुरु केलेल्या शाळेचे रुपांतर आज २३०० एकरावर उभ्या असलेल्या ४० भव्य इमारतीं असलेल्या संकुलात झाले होते.

बुकर आता थकला होता. जन्मापासून भोगलेल्या हालअपेष्टा, अविरत शारीरीक श्रम आता बुकरचे शरीरावर आपला प्रभाव दाखवु लागले होते. बुकरची प्रकृती ढासळु लागली. १९१५ साली निग्रोंचा हा महान नेता अनंतात विलीन झाला.

बुकरची शोकांतीका.

२००० साली मला टस्कगीला भेट देण्याची संधी मिळाली. जेथून बुकरला भरघोस मदत मिळाली आणि प्रेरणा मिळाली त्या मॅसाच्युटेस, फिलाडेल्फिया, अलबामा , व्हर्जिनीया या राज्यात जवळपास दोन महिने हिंडता आले. बुकरचे नांव-निशाण मला कुठेच आढळले नाही. निग्रो जमातीवरच्या पुस्तकांचा अभ्यास करीताना देखील बुकरबद्दल फारसे काही लिहलेले आढळून आले नाही. खुद्द टस्कगीच आता कार्व्हर फाऊंडेशन करता प्रसिद्ध आहे. टस्कगीत बुकरचे राहते घर आणि चौकात असलेला त्याचा भव्य पुतळा याशिवाय बुकरचे आस्तित्व काही जाणवत नाही. बुकर हा एक चांगला रत्नपारखी जरूर होता. कार्व्हर मधील गुणांची योग्य ती पारख करून त्याला जगन्मान्यता मिळवून दिली पण बुकरमध्ये जे सर्वसमावेशक नेतृत्व होते ते काव्हर मध्ये नव्हते. त्यामुळे जरी काव्हरने टस्कगीला अमाप प्रसिद्धि मिळवून दिली तरी निग्रो जमातीचा नेता म्हणून तो काही पुढे येऊ शकला नाही. बुकरला आपला समर्थ वारस निर्माण करता आलाच नाही. त्याच्या हयातीतच त्याच्या सामंजस्याच्या धोरणाचा विरोध करणारी संघटना उभी राहीली होती. पण बुकरचे नेतृत्व इतके ज्वलंत होते की त्याचे हयातीत विरोधी संघटना पाय रोऊ शकली नाही. बुकर गेल्यावर मात्र या विरोधी संघटनेने जोर पकडला आणि सामंजस्याचे धोरण पार गुंडाळून ठेवण्यात आले. गोऱ्यांनी पण काळ्यांच्या राजकीय महत्वाकांक्षेला आपल्या वैयक्तीक फायद्याकरीता खतपाणी घातले. आज कार्व्हर फाऊंडेशन मुळे तो थोडाफार तरी लोकांना माहित आहे पण बुकर मात्र कायमचा  काळाच्या पडद्या आड गेला आहे. आपल्याकडे देखील समाजाच्या उन्नतीकरीता जीवाचे रान करणारे नेते विस्मृतीत गेले आहेत आणि स्वार्थी नेते मिरवत आहेत. विविध प्रलोभनाचे मागे लागून तरुण वर्ग श्रमाची प्रतिष्ठा विसरला आहे. विनाआयास मिळणारा पैसाच सर्वांना हवा आहे. तरुण वर्ग शहरीजीवनाला चटावला

आहे. या सर्व गोष्टीमुळे  बुकरची काम करून शिका, श्रमाची प्रतीष्ठा ही तत्वे पार धुळीला मिळाली आहेत.

तरी देखील बुकरचे महान कार्य आपण विसरु शकत नाही. भले आज टस्कगी कार्व्हरचे नावाने ओळखळी जात असेल तरी ते बुकरचेच एक अजरामर स्मारक आहे.जगतील अनेक महान व्यक्तींचे नांव जरी आज लोक विसरले असतील तरी त्यांचे कार्याने समाजजीवन आमुलाग्र बदले आहे. अशी मोठी माणसे काम करीत राहतात. त्यांना पटलेले योग्य मार्ग स्विकारतात आणि आपल्या कामात मग्न असतात. लोकांनी त्यांचे स्मरण केले किंवा नाही याची त्यांना पर्वा नसते. त्यांचा हा ध्यासच त्यांचे मोठेपण दाखवितो आणि सामान्य श्रेणीतून अलगद वरच्या श्रेणीत पोहोचवतो. इश्र्वरी प्रेरणेनेच जगाची पर्वा न करीता अशी माणसे आपल्या उद्दीष्टापासून ढळत नाहीत आणि कार्यसिद्धी सपन्न करीतात हाच त्यांचा मोठेपणा. अशा या मोठ्या लोकांचे चरित्र वाचताना संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानाची आठवण होते

दुरितांचे तिमिर जावो। ---जो जे वांछिल तो ते पावो.

## संदर्भ ग्रंथ

Booker T. Washington: The making of a Black Leader by Louis R. Harlan New York Oxford University Press 1972

2. Booker T. Washington: The Wizard of Tuskgee by Louis R. Harlan New york, Oxford University Press 1983

3. Up From Slavery by Booker T. Washington New York Airmont Publishing Co. 1967

4. Booker T. Washington : Essays by Louis R. Harlan Oxford University Press

5. The negro in the United States: by E. Franklin Frazier Ph.D. published by The Macmillan Com.

6. The South Since the War by Sidney Andrews published by Boston Houghton Mifflin Co. Boston 1971
Originally the American Negros of 1866